ॐ

# श्रीपात्रकेसरी स्तोत्र,

तथा

# श्रीपुरपार्श्वनाथ स्तोत्र.

मराठी टीकासहित.

वीर निर्वाण सं. २४४७ वि. सं. १९७८

*Published by:—*
*Hirachand Goutamchand Gandhi,*
*at Nimgaon-ketki.*

*Printed by:—*
*Pandit Banshidhar Udyaraj, in his*
*"Shridhar" printing press,*
*Sholapur.*

ॐ

# श्रीपात्रकेसरी--स्तोत्र,

तथा

# श्रीपुरपार्श्वनाथ—स्तोत्र.

**श्रीविद्यानंद स्वामीकृत.**

**मराठी टीकाः—न्यायतीर्थ पं० जिनदास शास्त्रिकृत.**

प्रकाशकः—

श्रीयुत हिराचंद गौतमचंद गांधी, निमगांव–केतकी.

मुद्रकः—

पं० बंशीधर मा० श्रीधर प्रेस, सोलापूर.

सन १९२१.

स्व. सौ. जमनाबाई रावजी दोशी, सोलापूर



जन्म. संवत १९५२ पौष शुद्ध २

मृत्यु. संवत १९७७ वैशाख वद्य ६

धार्मिक, विद्याव्यासंगी व प्रेमळ अशा भगिनीच्या स्मरणार्थ हें धार्मिक पुस्तक प्रसिद्ध करीत आहे.

हिराचंद गोतमचंद गांधी,
केतकी निमगांव.

# प्रस्तावना.

दिगंबर जैनधर्मामध्यें सुप्रसिद्ध असे विद्यानंदि या नांवाचे आचार्य होऊन गेले. हे न्यायशास्त्रांत अत्यंत निष्णात होते. यांनीं न्याय विषयावर मोठ मोठे ग्रंथ लिहिले आहेत. अष्टसहस्री, श्लोकवार्तिक, आप्तपरीक्षा, पत्रपरीक्षा, प्रमाणपरीक्षा युक्त्यनुशासनालंकार इतके ग्रन्थ आजपर्यंत मुद्रित झालेले आहेत. या सर्व ग्रन्थांमध्यें आचार्यांनीं दिगंबर जैनसिद्धांतांचें फार उत्तम वर्णन केलें आहे. नैयायिक, बौद्ध, सांख्य वगैरेचीं मतें जागोजागीं खोडून जैन तत्वांचें सत्यत्व यांनीं सिद्ध केलें आहे. आज जीं दोन ग्रन्थ रत्नें आम्ही वाचकवृन्दापुढें ठेवणार आहोंत: तीं देखील या माहात्म्यांनींच बनविलीं आहेत. पात्रकेसरिस्तोत्र व श्रीपुरपार्श्वनाथस्तोत्र अशीं यांचीं नांवें आहेत. या दोन्ही स्तोत्रांमध्येंहि जैनधर्माच्या तत्वांची ओळख करून दिली आहे व अन्य मतांचें खंडनहि केलें आहे. पात्रकेसरिस्तोत्राला बृहत्पंचनमस्कार असेंहि दुसरें नांव आहे. या स्तोत्रावर एक संस्कृत टीकाहि आहे परंतु ती कोणत्या आचार्यांनीं लिहिली आहे याचा खुलासा टीकेच्या अंतीं मिळत नाहीं. भाषांतर करतांना या टीकेचा आम्हीं आधार घेतला आहे. व या स्तोत्रांत आलेल्या विषयांचें स्पष्टीकरण आप्तपरीक्षा आणि प्रमेयकमलमार्तण्ड या ग्रंथाच्या आधारानें केलें आहे.

ब्रह्म नेमिदत्त या आचार्यांनीं आपल्या आराधना कथाकोश या नांवाच्या ग्रंथामध्यें श्री विद्यानंद आचार्यांची हकीकत लिहिली आहे. आचार्यांनीं ' जिनेंद्र गुणसंस्तुति नांवाचें स्तोत्र लिहिलें आहे असेंहि त्यांनीं एका श्लोकांत म्हटलें आहे. तो श्लोक असा—

कृतोन्यमतविध्वंसी जिनेंद्रगुणसंस्तुतिः ।
संस्तवः परमानंदात्समस्त सुखदायकः ॥ ४९ ॥

तें जिनेंद्र गुणसंस्तुति नांवाचें स्तोत्र पात्रकेसरी स्तोत्रच असावें असें वाटतें. असें वाटण्याचें कारण हें आहे कीं, या पात्रकेसरीस्तोत्रांतील पहिल्या श्लोकाला ' जिनेंद्र गुणसंस्तुतिस्तव मनागपि

प्रस्तुता ' या चरणानें प्रारंभ झाला आहे. देवागम स्तोत्र ' भक्तामर स्तोत्र, कल्याणमंदिरस्तोत्र व एकीभाव स्तोत्र यांनाहि ती ती नांवें पडण्याचें कारण त्या त्या स्तोत्रांतील प्रारंभीं तसे शब्द असणें हें होय. ह्याच कारणावरून या स्तोत्राचें नांव देखील जिनेंद्रगुणसंस्तुति असें पडलें असावें; असें वाटणें साहजिक आहे. विद्यानंदि आचार्यांचें दुसरें नांव पात्रकेसरी असें आहे. यांनीं हें स्तोत्र लिहिलें आहे म्हणून ' पात्रकेसरिस्तोत्र ' असें नांव याला मिळालें आहे.

## श्रीपुरपार्श्वनाथ स्तोत्र.

यांत समाप्तिसूचक एक वाक्य आहे त्यांत या ग्रंथकाराचे गुरु अमरकीर्ति होते असा उल्लेख आहे. तो याप्रमाणें—या स्तोत्राचें कर्तृत्वहि विद्यानंद स्वामीकडेच आहे असें मागें सांगितलें आहे. या स्तोत्राच्या अंतीं ' इति श्रीमदमरकीर्ति यतीश्वर प्रियशिष्य विद्यानंदि स्वामि विरचितं श्रीपुरपार्श्वनाथ स्तोत्रं समाप्तम् ' । विद्यानंद आचार्यांचें गुरु कोण होते हें आजपर्यंत अनिश्चित होतें. हें स्तोत्र विद्यानंद महोदय या ग्रंथाची रचना करण्याकरितां लिहिलें आहे असें या स्तोत्राच्या अंतिम श्लोकांत आचार्यांनीं लिहिलें आहे. आचार्यांनीं विद्यानंद महोदय ग्रंथाचा उल्लेख आप्तपरीक्षा व अष्टसहस्री या दोन ग्रंथामध्यें एकदोन ठिकाणीं केला आहे तो असा—' सति चान्यथानुपपन्नत्वे प्रतिपाद्याशयवशात् प्रयोगपरिपाटी पञ्चावयवादिरपि न निवार्यते इति तत्वार्थालङ्कारे विद्यानंदमहोदये च प्रपञ्चतः प्ररूपितम् ' ॥ अष्टसहस्री पृ. २९०

' न भावनामात्रस्य नियोगमात्रस्य वा वेदार्थवाक्यस्य अन्ययोगव्यवच्छेदेन निर्णयः कर्तुं शक्यते सर्वथा विशेषाभावात् । तत्राक्षेपसमाधानानां समानत्वादिति देवागमालंकृतौ तत्वार्थालंकारे विद्यानंदमहोदये च विस्तरतो निर्णीतं प्रतिपत्तव्यम् '

आप्तपरीक्षा पृ. ५८.

या दोन उल्लेखावरून विद्यानंद महोदय हा ग्रंथ त्याचाच आहे असें ठरतें. परंतु तो अद्यापि कोठेंहि उपलब्ध नाहीं असें दिसतें हा ग्रंथ फार महत्वाचा असावा हें त्याच्या नांवावरून स्पष्ट दिसतें. विद्वान् लोकांनीं या ग्रंथाचा शोध करावा.



पंडित बी शांतिराज न्यायतीर्थ आरा जैनसिद्धांत भुवन यांनीं श्रीपुर पार्श्वनाथ स्तोत्राची एक प्रति पाठविली होती ती बरेच ठिकाणीं अशुद्ध होती. माझ्या अल्प समजुतीला अनुसरून मी ती शुद्ध करून हें भाषांतर केलें आहे. भाषांतर जरी संक्षिप्त झालें आहे तरी श्लोकांतील सर्व सार त्यामध्यें आणण्याचा प्रयत्न केला आहे.

या दोन्ही स्तोत्रांचे भाषांतर करण्याची प्रेरणा श्रीयुत हिराचंद गोतमचंद गांधी यांनीं माझ्या मनांत उत्पन्न केली. त्यांच्या प्रेरणेनें हें भाषांतर मी तडीस नेलें आहे. यांनीच या दोन ग्रंथांचें प्रकाशन करून जैनसमाजावर मोठा उपकार केला आहे. भाषांतरामध्यें चुका राहण्याचा संभव आहे. वाचक वर्गानें ते दोष दाखऊन दिल्यास त्यांचे आभार मानून पुढच्या आवृत्तींत ते सुधारण्याचा प्रयत्न करूं.

श्रीपुर या शब्दाचा अपभ्रंश सिरपुर असा झाला आहे. हें सिरपुर गाव वऱ्हाड प्रांतात अकोला जिल्ह्यांत आहे येथें पार्श्वनाथ तीर्थंकरांची अतिशय प्रतिमा आहे. याच प्रतिमेला अंतरीक्ष पार्श्वनाथ असेंहि म्हणतात. हें नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, ही पार्श्वनाथांची प्रतिमा पूर्वी आकाशांत अधर होती. व अद्यापिहि थोडीशी अधर आहे. या पार्श्वनाथ तीर्थंकरांचे गुणानुवाद या स्तोत्रांत गाइलें आहेत म्हणून या स्तोत्राचें नांव श्रीपुर पार्श्वनाथ स्तोत्र असें आहे.

सोलापूर
आषाढ शु. सप्तमी सोमवार वीर निर्वाण २४४७ विक्रम संवत् १९७६ } जिनदास पार्श्वनाथ फडकुले

# आचार्य पात्रकेसरी अथवा विद्यानंदि स्वामी.

विद्यानंद स्वामींनीं जी जैन धर्माची सेवा केली आहे ती खरोखर अलौकिक आहे. जैनधर्माची प्रभावना करण्यांत जे आचार्य प्रसिद्धिस आले आहेत त्यांपैकीं विद्यानंदि हे एक होत. श्री ब्रह्मनेमिदत्त आचार्यांनीं आराधना कथाकोशांत यांच्याविषयीं जी माहिती दिली आहे ती संक्षेपानें आह्मी वाचकवृंदापुढें मांडतो—

मगध देशांत अहिच्छत्र नांवाचें एक शहर होतें तेथें अवनिपाल नांवाचा एक राजा राज्य करीत होता. त्याच्याजवळ वेदवेदांगामध्यें प्रवीण असे पांचशे विद्वान् ब्राह्मण होते. हे सर्व ब्राह्मण पार्श्वनाथ जिनेश्वराच्या मंदिरांत मौजेनें प्रथम जात असत व तदनंतर ते आपलीं नेहमीचीं कामें करीत असत. एकदां ते सर्व विद्वान् त्या मंदिरांत पार्श्वनाथ जिनास पाहण्यास आले असतां जिनेश्वराच्या प्रतिमेजवळ देवागम स्तोत्राचा पाठ ह्मणत असलेल्या चारित्रभूषण नांवाच्या मुनींना त्यांनीं पाहिलें. त्या सर्व विद्वानांमध्यें मुख्य अशा पात्रकेसरी नांवाच्या विद्वानानें त्या मुनीला विचारलें कीं, महाराजा आपण जें स्तोत्र ह्मणत आहा त्याचा अर्थ आपणास माहित आहे काय? मला या स्तोत्राचा अर्थ समजत नाहीं असें मुनींनीं उत्तर दिलें; तेव्हां त्या विद्वानानें आपण पुनः एकदा हे स्तोत्र सावंत ह्मणा अशी प्रार्थना केली. मुनींनीं त्याच्या प्रार्थनेचा स्वीकार करून शांतपणें सावकाश तें सर्व स्तोत्र त्या विद्वानाला ह्मणून दाखविलें. या विद्वानाची (पात्रकेसरीची) बुद्धि अत्यंत तीव्र असल्यामुळें तें सर्व स्तोत्र त्यांच्या हृदयामध्यें पूर्ण ठसलें व तो त्या स्तोत्राविषयीं मनामध्यें विचार करूं लागला. त्यावेळीं दर्शन मोहनीय कर्माच्या क्षयोपशमामुळें जीवादिक पदार्थांचें जें स्वरूप सांगितलें आहे तेंच खरें आहे अशी त्यांची गाढ श्रद्धा झाली. तदनंतर तो विद्वान् घरीं जाऊन त्या स्तोत्राबद्दल पुनः विशेष विचार करूं लागला.



जीवाजीवादिक पदार्थ प्रमेय आहेत अर्थात् जाणण्यायोग्य आहेत व तत्वज्ञान हें प्रमाण आहे. परंतु अनुमानाचें लक्षण जैनधर्मामध्यें काय सांगितलें असावें असा त्याच्या मनांत संशय उत्पन्न झाला. या संशयानें ग्रस्त होऊन विचार करीत असतां पद्मावती देवता तेथें आली व तिनें त्या विद्वानाला सांगितलें कीं, हें पात्रकेसरिन्! सकाळीं तू जिनमंदिरांत जाऊन पार्श्वनाथ जिनेश्वराचें दर्शन घे ह्मणजे अनुमानाचें लक्षण काय आहे याविषयीं तुझा निश्चय होईल. असें बोलून त्या देवतेनें पार्श्वनाथ तीर्थंकराच्या फणा मंडपावर अनुमान प्रमाणाचा श्लोक लिहिला व ती तेथून निघून स्वस्थळीं गेली. तिनें जो श्लोक लिहिला तो असा—

"अन्यथानुपपन्नत्वं यत्र तत्र त्रयेण किम्।
नान्यथानुपपन्नत्वं यत्र तत्र त्रयेण किम्॥"

तात्पर्यः—जेथें अविनाभाव अर्थात् हेतु साध्याला सोडून राहत नाहीं, तो साध्याचा निश्चय करून देतो त्यास अनुमान ह्मणतात. हेतु आणि साध्य यांच्यामध्यें असा अविनाभाव असणें हेंच अनुमानाचें लक्षण होय. पक्ष, सपक्ष, विपक्ष नसणें हें अनुमानाचें लक्षण नव्हे; कारण, जेथें अविनाभाव नाहीं तेथेंहि हे तीन आढळून येतात. अविनाभाव असला ह्मणजे बस्स आहे. पूर्वोक्त तीन असले काय आणि नसले काय सारखेच.

प्रातःकाळीं हा विद्वान् पार्श्वनाथ तीर्थंकराच्या जिनमंदिरांत जाऊन तेथें त्यानें तो श्लोक पाहिला त्यायोगें त्याला अनुमानाच्या स्वरूपाचा पूर्ण निश्चय झाला. तदनंतर तो विद्वान् दररोज जिनेश्वरांनीं सांगितलेल्या तत्वांचा विचार करूं लागला. त्यावेळीं इतर विद्वान् त्याला ह्मणाले कीं, न्याय इत्यादि दर्शनांचा विचार सोडून जैनमताचा विचार कां करित बसला आहां. हें त्यांचें भाषण ऐकून तो पात्रके-

सरी विद्वान् ह्मणाला अहो पंडितहो हें जैन मत सर्व मतामध्यें अत्युत्तम आहे यास्तव तुह्मी मिथ्यामार्ग सोडून देऊन या धर्माचें ग्रहण करा. तदनंतर त्यानें सर्व अन्यमतीय विद्वानांबरोबर मोठा वाद करून अवनिपाल राजाच्या समक्ष त्यांचा पराभाव केला. सर्व जीवांचें हित करणाऱ्या जैनधर्माची त्यानें मोठी प्रभावना केली. सर्व विद्वान पात्रकेसरीच्या ह्मणण्याप्रमाणें जैन धर्म धारण करिते झालें व अवनिपाल राजानेंहि जैनधर्माचा स्वीकार करून मिथ्यामताचा त्याग केला. याप्रमाणें ब्रह्म नेमिदत्त आचार्यांनीं आपल्या आराधना कथाकोशांत यांची हकीकत दिली आहे.

पद्मावतीनें पात्रकेसरी विद्वानाला साहाय केलें असा उल्लेख मल्लिषेण प्रशस्तीमध्यें हि आला आहे तो असा–

**महिमा स पात्रकेसरिगुरोः परं भवति यस्य भक्त्यासीत् ।**
**पद्मावती सहाया त्रिलक्षणकदर्थनं कर्तुं ॥**

यावरून पद्मावतीनें दर्शन दिलें असें जें नेमिदत्त आचार्यांनीं ह्मटलें त्याला हें एक पुष्टिकारक प्रमाण आहे.

पात्रकेसरींचे गुरु अमरकीर्ति होते हें मागें व्यक्त केलें आहे. त्यांच्याजवळ दीक्षा घेऊन हे दिगंबर यती बनले असावेत असें वाटतें.

भगवान् अकलंक देव, माणिक्यनंदि, विद्यानंद, प्रभाचंद्र जिनसेन स्वामी हे सर्व समकालीन आहेत. जिनसेन स्वामींनीं महापुराणांत पात्रकेसरी आचार्यांचें स्मरण केलें आहे. तें असें—

**भट्टाकलंकश्रीपालपात्रकेसरिणां गुणाः ।**
**विदुषां हृदयारूढा हारायंतेऽतिनिर्मलाः ॥**

अकलंकदेव, श्रीपाल, व पात्रकेसरी यांचे अतिशय निर्मळ गुण विद्वानांच्या हृदयावर आरूढ होऊन हाराप्रमाणें शोभतात.



हे जिनसेनाचार्य विक्रमाच्या ९ व्या शतकांत झाले आहेत. आणि पात्रकेसरीहि तेव्हांच झाले आहेत. अकलंकदेव साहसतुङ्ग राजाच्या सभेमध्यें गेले होते. हा साहसतुंग राजा विक्रम सं. ८१० ते ८३२ पर्यंत राज्य करीत होता असें सिद्ध झालें आहे. प्रभाचंद्राचार्यांनीं आपल्या न्यायकुमुद चंद्रोदय ग्रंथामध्यें ‘ अकलंक देवांच्या चरणाजवळ मी अध्ययन केल्यामुळें मला असें उत्कृष्ट ज्ञान प्राप्त झालें आहे यास्तव लघीयस्त्रयी नांवाच्या त्यांच्या न्यायग्रंथावर ही विस्तृत टीका लिहिण्यास मी समर्थ झालों ’ असें ह्मटलें आहे. यांनींही आपल्या प्रमेयकमल मार्तंड नांवाच्या ग्रंथामध्यें अकलंक, विद्यानंद समंतभद्र यांचें स्मरण केलें आहे. या उल्लेखावरून विद्यानंद हे प्रभाचंद्र व अकलंक यांच्या समकालीन आहेत हें सिद्ध होतें.

पात्रकेसरी व विद्यानंद हे एकच होत याबद्दल सम्यक्त्वप्रकाश नांवाच्या ग्रंथामध्यें असें ह्मटलें आहे. ‘ तथा श्लोकवार्तिके विद्यानंदि अपरनाम पात्रकेसरिस्वामिना यदुक्तं तच्च लिख्यते ।’ यावरून एकाच व्यक्तीचीं हीं दोन नांवें आहेत हें ठरतें.

शिमोगा प्रांतामध्यें हुमचा गांवांत विद्यानंदी स्वामीच्या वर्णनाचा एक शिलालेख संस्कृत भाषेंत लिहिलेला सांपडला आहे. त्यामध्येंहि अनेक राजांच्या सभेमध्यें जाऊन त्यांनीं मोठमोठ्या विद्वानांना पराजित केलें असें लिहिलें आहे. पहा,

( १ ) नजराजपट्टणमहीपतिनंजपरिषदि श्रीमद्विद्यानंदस्वामिना नंदनमल्लिभट्टाभिधो विदग्धो विहितानवद्यविवाद-मर्यादया विजिग्ये ।

( २ ) हृद्यानवद्यपद्यैकप्रभावेण श्रीशतवेन्द्रनरपतिसभायां श्रीविद्यानंदिविभुना निखिलश्रोतारो विस्मयपथमानीताः

( ३ ) शल्वमल्लिभूपतिसंसदि स्वीयामलवचनपाटवपराभूतवादिविद्रुपः क्षमते स्म विद्यानंदिप्रभुः ।

( ४ ) सलूवदेवपृथ्वीपतिपरिषदि नैकविधपरवामंडललपनविनिर्गतसिद्धान्तसंदोहं सिद्धान्ताभासतया अनृतीकृत्याहतमतं प्रभावितम् ।

( ५ ) बिलगीपत्तनमंडननरपतिनरसिंहसंसदि समुद्बोधितः किल प्रभावो जैनमतस्य श्रीमद्विद्यानंदिप्रभुणा ।

( ६ ) कारकलनगरस्थभैरवाचार्यपरिषदि जैनमतगौरवं प्रदर्श्य तत्प्रभावं विजजृम्भे श्रीविद्यानंदिविभुः ।

( ७ ) बिदरीनगरनिवासिभावुकलोकेभ्यः श्रीमद्विद्यानंदिप्रभुणा स्वधर्मज्ञानप्राकर्ष्येण सम्यक्त्वावाप्तिः कारिता ।

( ८ ) यस्य नरसिंहराजात्मजकृष्णराजस्य संसदि नमति स्म नरपतिसहस्रं तस्यां परिषदि हे विद्यानंदिप्रभो त्वया समुद्दीपितो जैनधर्मः पराभूताश्च मत्तपरवादिनः ।

( ९ ) कोप्पनाद्यनेकतीर्थक्षेत्रेषु कारयित्वा द्रव्यवैपुल्यव्ययं हे विद्यानंदिप्रभो त्वयार्हतधर्मः प्रभावितः भूषितश्च श्रवणबेलगुलनगरस्थजैनसंघः कनकवसनादिप्रदापनतः ।

१ श्री विद्यानंद आचार्यांनीं नजराज पट्टणचा राजा नंज याच्या सभेंत जाऊन नंदमल्लि नांवाच्या विद्वानाचा निर्दोष वादानें पराभव केला.

२ श्री शतवेंद्र राजाच्या सभेंतील सर्व श्रोतृगणास श्रीविद्यानंदि प्रभूंनीं एका निर्दोष मनोहर कवितेच्या सामर्थ्यानें आश्चर्यचकित करून सोडिलें.

३ शल्वमल्लि राजाच्या सभेमध्यें आपल्या निर्दोष भाषणांच्या चातुर्यानें अनेक विद्वान वाद्यांचा पराभव करून त्यांना पुनः विद्यानंदि आचार्यांनीं क्षमा केली.

४ सलूवदेव राजाच्या सभेमध्यें अनेक मतांच्या विद्वान् वाद्यांच्या



मुखांतून निघालेल्या सिद्धांताना हे सिद्धांताभास आहेत ह्मणून खोटे आहेत असें सिद्ध करून विद्यानंदि आचार्यांनीं अर्हताच्या मताची फार प्रभावना केली.

५ बिलगी नांवाच्या शहरास अलंकाराप्रमाणें शोभणाऱ्या नरसिंह राजाच्या सभेमध्यें विद्यानंदि आचार्यांनीं जैनमताचा प्रभाव उत्तम रीतीनें प्रगट केला.

६ कारकल नांवाच्या शहरांत भैरवाचार्यांच्या सभेंत जैनमताचा मोठेपणा दाखऊन विद्यानंद आचार्यांनीं त्याचा प्रभाव वृद्धिंगत केला.

७ बिदरी शहरामध्यें राहणाऱ्या भव्यलोकाना विद्यानंद आचार्यांनीं जैन धर्माचें उत्कृष्ट ज्ञान करून दिलें आणि त्यांना सम्यक्ती बनविलें.

८ नरसिंह राजाचा मुलगा जो कृष्ण राजा त्याला सभेमध्यें हजारो राजे नमस्कार करीत असत; त्याच्या सभेंत हे विद्यानंदि महाराज आपण जैनधर्म अत्यंत उज्ज्वल केला व अनेक गर्वोद्धत वाद्यांचा पराभव केला.

कोप्पन वगैरे नाना तीर्थक्षेत्रामध्यें विद्यानंदस्वामींनीं पुष्कळ द्रव्यांचा व्यय करविला आणि जैन धर्माची प्रभावना केली. श्रवण बेळगुळ शहरांतील सर्व जैनसंघाला सोनें व कपडे देवऊन त्यांना अलंकृत केलें. गेरसप्पा शहराजवळ राहत असलेल्या मूनींच्या संघाला विद्यानंद आचार्यांनीं आपले शिष्य बनऊन त्यांना सुशोभित केलें.

गौतम, भद्रबाहु, विशाखाचार्य, उमास्वामी, समंतभद्र, अकलंक वगैरे विद्वानांचा पृथ्वीतलावर सदा विजय होवो.

समंतभद्र स्वामींनीं तत्वार्थ सूत्रावर जे गंधहस्ति नांवाचें भाष्य लिहिलें त्याचें मंगलाचरण स्वरूपी देवागमस्तोत्र आहे. या स्तोत्रावर अकलंक देवांनीं अष्टशती नांवाचें भाष्य लिहिलें आहे. आप्तमीमांसा ग्रंथावर ह्मणजे अष्टशतीवर विद्यानंदि स्वामींनीं अष्टसहस्री ग्रंथ लिहिला आहे.

विद्यानंद या वरच्या पुराव्यावरून कर्नाटक प्रातांत जास्ती प्रसिद्धीस आले हें दिसतें. व ब्रह्म नेमिदत्तांनीं मगध देशांत अहिच्छत्र नांवाच्या गांवांत राहत होते असें ह्मटलें आहे. परंतु आह्मांला असें वाटतें कीं नेमिदत्त आचार्यांनीं पात्रकेसरी ( विद्यानंद ) यांचें गृहस्थावस्थेंतील चरित्र लिहिलें आहे. व जेव्हां त्यांनीं मुनिदीक्षा घेतली तेव्हां ते फिरत फिरत कर्णाटक प्रांतांत आले असावेत. आणि शेवटपर्यंत तेथेंच ते राहिले असावेत. ह्मणून कर्णाटक प्रातांत त्यांचा उल्लेख मिळत असावा. कर्णाटक प्रांतांतच अकलंक माणिक्यनंदि जिनसेन वगैरे मोठमोठे आचार्य होते. यास्तव त्याठिकाणींच तेहि राहिले असावेत. खरोखर त्यावेळीं कर्णाटक प्रांतांत जैनधर्माचें फार महत्व वाढलें होतें. अनेक राजेलोक देखील जैनधर्माच्या उन्नतीला बाधक नसल्यामुळें तेथें त्याचें महत्व वाढणें साहजिक आहे.

याप्रमाणें जैनधर्माची प्रभावना करणाऱ्या विद्यानंदांची हकीकत संक्षेपांत लिहिली आहे.

---



## श्रीपात्रकेसरी स्तोत्रांतील विशेष विषयांची अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ संख्या. |
|---|---|
| अरहंताच्या ठिकाणीं प्रेमद्वेष वगैरे असूनहि ते परमेष्ठि आहेत. | ४ |
| केवलज्ञान कसें असतें. | ८ |
| जिनेंद्राच्या ठिकाणीं परिग्रह असूनहि ते निष्परिग्रही आहेत. | ९ |
| रागद्वेषरहित असूनहि जिनेश निंदा व स्तुति करणाऱ्याला दुःखी व सुखी बनवितात. | ११ |
| जिनेश्वराचें वचन निर्दोष आहे. | १६ |
| वेद पौरुषेय आहे. | २० |
| आत्मा आहे व पृथिव्यादि चार तत्वापासून उत्पन्न होत नाहीं. | २१ |
| सर्वज्ञसिद्धि | २७ |
| कपिल बौद्ध इत्यादिकांचीं वचनें खोटीं आहेत. | ४० |
| केवली कवलाहार करीत नाहीं. | ४८ |
| महादेव व ब्रह्मा वगैरे देवांचीं कृत्यें | ६५ |
| पापबंध कसा होतो. | ७० |
| दान पूजा चैत्यालयें या क्रियांचा उपदेश करणाऱ्या अरहंताला पापबंध कां होत नाहीं ? | ७१ |
| परिग्रह ममत्वाचा सूचक आहे. | ७७ |
| परिग्रहापासून कोणते दोष होतात. | ८० |
| मोक्षाचें स्वरूप अन्य लोकांनीं व जैनांनीं कसें मानिलें आहे तें. | ८४ |

## श्रीपुरपार्श्वनाथ स्तोत्रांतील विषयांची अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ संख्या. |
|---|---|
| पार्श्वनाथ भगवान् सर्वज्ञ आहेत. कपिल बुद्ध वगैरे सर्वज्ञ होऊं शकत नाहीत. | ९० |
| सूक्ष्म पदार्थ ज्यास प्रत्यक्ष होतात तो सर्वज्ञ होऊ शकतो. | ९२ |
| प्रत्यक्ष प्रमाणानें अनेकांत वाद सिद्ध होतो. | ९३ |
| अनेक धर्मात्मक वस्तुच अनेक कार्यें करूं शकते. | ९४ |
| द्रव्य शब्दाची व्याख्या व स्पष्टीकरण | ९५ |
| अपेक्षेनें पदार्थामध्यें अनेक धर्म सिद्ध होतात. | ९६ |
| स्याद्वादाचे सात प्रकार व त्याचें स्वरूप. | ९८ |
| जीव, सुख, दुःख इत्यादिकांची सिद्धि जिनेश्वराच्या मतामध्येंच सिद्ध होते. | १०० |
| वेद किंवा जैमिनी हे सर्वज्ञ नाहींत. | १०२ |
| वेद अपौरुषेय नाहींत. | १०३ |
| ईश्वर जगत्कर्ता आहे असें ह्मणणाऱ्यांचें खंडन. | १०५ |
| बौद्धमताचें खंडन. | १०७ |
| सांख्याच्या मताचा विचार. | १०८ |
| ब्रह्माद्वैताविषयीं विचार | ११० |
| प्रमाण, प्रत्यक्षच आहे, सर्व तत्वें सिद्ध होत नाहींत, तत्वें अवक्तव्य आहेत असें ह्मणणाऱ्यांचें खंडन | ११२ |
| अनेकांताची अनेक प्रकारें सिद्धि. | ११३ |
| पार्श्वनाथ तीर्थकरांची स्तुति व ग्रंथकाराचें शेवटचें वक्तव्य | ११५ |


---

॥ श्रीवीतरागाय नमः ॥

ॐ

# अथ पात्रकेसरिस्तोत्रम् ।

पृथ्वी छन्दः ।

**जिनेन्द्र ! गुणसंस्तुतिस्तव मनागपि प्रस्तुता ।**
**भवत्यखिलकर्मणां प्रहतये परं कारणम् ॥**
**इति व्यवसिता मतिर्मम ततोऽहमत्यादरात् ।**
**स्फुटार्थनयपेशलां सुगत ! संविधास्ये स्तुतिम् ॥१॥**

**अर्थः**—हे गणधरादिमुनींच्या अधिपते जिनेंद्रा ! मन, वाणी व शरीर हीं तिन्हीं शुद्ध ठेऊन अर्थात् या तिहींची एकाग्रता आपल्याकडेच ठेऊन आपल्या केवलज्ञानादि गुणांची थोडीशी देखील केलेली स्तुति सर्व कर्मांचा नाश करण्यास उत्कृष्ट साधन होतें. यामुळें माझी बुद्धि आपली स्तुति करण्याचा प्रयत्न करीत आहे. हे सर्वज्ञ जिनेशा ! मी ( पात्रकेसरी अर्थात् विद्यानंद्याचार्य ) गाढ भक्तीनें प्रेरित होऊन संशय, भ्रम वगैरे दोषांना दूर सारून पदार्थांचें खरें स्वरूप दाखविणाऱ्या नयांनीं सुंदर दिसणारी अशी आपली स्तुति करीन.

**विशेष स्पष्टीकरण**— जिनेंद्र-तीर्थकर, यांनीं चार घाति कर्मांचा नाश केलेला असतो, जिन या शब्दाचा अर्थ गणधर देव तसेंच आचार्य, उपाध्याय व साधु असा होतो. जिन शब्दाचा अर्थ सामान्य

केवली असाही होतो. गणधरांना आपण जिन ह्मणतो याचें कारण हें आहे कीं त्यांनीं देखील एक देशानें घाति कर्मांचा नाश केलेला आहे. त्यांना मति, श्रुति, अवधि व मनः पर्यय अशीं चार ज्ञानें असतात. हीं चार ज्ञानें ज्ञानावरण कर्मांच्या क्षयोपशमानें प्राप्त होतात. व इतर मनुष्यांच्या ज्ञानापेक्षां त्यांचीं हीं ज्ञानें विशिष्ट असतात. मिथ्यात्व कर्मांचा अभाव झाल्यामुळें त्यांना सम्यग्दर्शन प्राप्त झालेलें असतें. अनंतानुबंधि, अप्रत्याख्यान या कषायांचा क्षय झाल्यामुळें व संज्वलन कषायांचा मंद उदय असल्यामुळें त्यांचें चारित्र ही बरेंच निर्मल असतें त्यांची आत्मिक शुद्धता वरचेवर वाढत असल्यामुळें कर्मांची निर्जरा व संवरही प्रतिक्षणीं होत असतो. यामुळें त्यांना देखील जिन ह्मणतां येतें. तसेंच आचार्य, उपाध्याय व साधु यांना ही जिन ह्मणतात. तीर्थकरांनीं चार घाति कर्मांचा नाश केलेला असतो व सामान्य केवलींनीं देखील या कर्मांचा नाश केलेला असतो, तथापि तीर्थकरांना जिनेंद्र ह्मणतात व सामान्य केवलींना जिन ह्मणतात याचें कारण काय असा प्रश्न साहजिकपणें मनांत उभा रहतो, परंतु याचें कारण असें आहे कीं, तीर्थकर नाम कर्मांचा उदय तीर्थकरांनाच होत असतो तो त्या कर्मांचा उदय सामान्य केवलींना नसतो. यामुळें तीर्थकर हे सामान्य केवलीपेक्षाही श्रेष्ट मानले गेल्यामुळें यांना जिनेंद्र ह्मणतात. यावरून जिनेंद्र या शब्दाचें स्पष्टीकरण लक्षांत आलें असेलच. जिनेंद्राला या श्लोकांत आचार्यांनीं ' सुगत ' असें ही ह्मटलें आहे. सुगत या शब्दाचा अर्थ 'चांगलें ज्याचें ज्ञान आहे तो' असा होतो अर्थात् ज्ञानावरणीय कर्मांचा पूर्ण क्षय झाल्यामुळें लोकालोकास प्रकाशित करणाऱ्या ज्ञानाचा धारक असा होतो. ' शोभनं गतं ज्ञानं यस्य स सुगतः ' अशी सुगत या शब्दाची निरुक्ति आहे. हें स्तोत्र ह्मणजे चोवीस तीर्थकरांपैकीं अमुक एकाचेंच आहे असें नाहीं, या स्तोत्रांत जिनेश्वरांचें गुणवर्णन असल्यामुळें तें सर्व जिनेश्वरांचें स्तोत्र आहे असें ह्मटलें



तरी देखील कांहीं हरकत नाहीं. पहिल्या श्लोकांत, जिनेंद्रगुणवर्णनें स्तुति केल्यानें आपणास कोणता फायदा होतो हें दाखविलें आहे. व या फायद्याची प्राप्ति व्हावी ह्मणून स्तुतिकारानें ही स्तुति करण्यास प्रारंभ केला आहे.

पहिल्या श्लोकांत स्तुतिकारानें स्तुतीचें माहात्म्य दाखविलें;
आतां स्तुतिकार स्तुति करण्यास प्रारंभ करितात—

**मतिश्रुतमथावधिश्च सहजं प्रमाण हि ते ।**
**ततः स्वयमबोधि मोक्षपदवीं स्वयम्भूर्भवान् ॥**
**न चैतदिह दिव्यचक्षुरधुनेक्ष्यतेऽस्मादृशाम् ।**
**यथा सुकृतकर्मणां सकलराज्यलक्ष्म्यादयः ॥ २॥**

**अर्थ।**—हे जिनेश मति, श्रुत व अवधि हीं तीन ज्ञानें आपणांस जन्मापासूनच आहेत. या तीन ज्ञानांच्या सहाय्यानें आपण परोपदेश—गुरूच्या उपदेशावांचून रत्नत्रयस्वरूपी मोक्षमार्गाचें स्वरूप जाणिलें. यास्तव आपण स्वयंभू आहांत. अर्थात् गुरूच्या उपदेशावांचून मोक्षमार्गाचें स्वरूप समजून घेऊन व स्वतः रत्नत्रयाची आराधना करून अनंत ज्ञान, दर्शन, सौख्य व शक्ति या अनंतचतुष्टय स्वरूपाची प्राप्ति आपण करून घेतली यास्तव आपण खरोखर स्वयंभू आहांत.

हे जिनेश ! या कलिकालांत या भरतक्षेत्रांत सहा खंडाच्या अधिपतीचें--चक्रवर्तीचें अथवा नारायण प्रतिनारायण यांचें ऐश्वर्य आह्मांस जसें मिळत नाहीं, तसेंच यावेळीं व या क्षेत्रांत सामान्य प्राण्यांना दुर्लभ अशा विशिष्ट तीन ज्ञानांची प्राप्ति होत नाहीं. हीं विशिष्ट तीन ज्ञानें दिव्य नेत्राप्रमाणें आहेत. जसें दिव्य नेत्रानें सूक्ष्म पदार्थाचें स्वरूपही चांगलें स्पष्ट दिसतें तसेंच या तीन दिव्यज्ञानांनीं पदार्थांचें अतिशय सूक्ष्म स्वरूप जाणतां येतें यास्तव या तीन ज्ञानांस दिव्य नेत्राची उपमा दिली आहे. व हा दिव्यनेत्र हे जिनेश आपणांसच आहे.

**विशेष स्पष्टीकरण** — जेव्हां स्वर्गांतून या भूलोकीं श्री जिनेश्वर अवतरतात तेव्हां तीन ज्ञानें त्यांच्या बरोबरच असतात. गर्भामध्यें असतांना ही हीं तीन ज्ञानें त्यांना सोडून देत नाहींत. यामुळें ते सर्व जगाचे गुरु आहेत. त्यांना उपदेश देण्यास कोण समर्थ आहे? त्यांना उपदेश देण्याचें धाडस करणें हें मोराच्या मस्तकावरील सुंदर तुर्यास जास्ती शोभा आणण्याचा हट्ट करण्यासारखें आहे, किंवा हंसाच्या सुंदर गतीला अधिक सुंदर बनविण्याचा प्रयत्न करण्यासारखें हास्यास्पद आहे. श्री जिनेश्वर जगद्गुरु असल्यामुळें स्वतः मोक्षमार्गाचें स्वरूप जाणून त्याची त्यांनीं प्राप्ति करून घेतली व भव्यांनांही मोक्षप्राप्तीचा रस्ता दाखविला. यास्तव त्यांना स्वयंभू ह्मणण्यास कोणती हरकत आहे? आह्मांस जिनेश्वरासारखें विशिष्ट ज्ञान नसल्यामुळें ते आह्मापेक्षां श्रेष्ठ आहेत यास्तव आह्मी त्यांची स्तुति करावी हें योग्य आहे.

श्रीजिनेश्वराचें कांहीं गोष्टीमध्यें प्रेम दिसून येतें व कांहींमध्यें द्वेष आढळून येतो यामुळें त्यांच्या परमेष्ठिपणास बाधा येत असेल या शंकेचें निरसन आचार्य या श्लोकांत करितात.

**व्रतेषु परिरज्यसे निरुपमेच सौख्ये स्पृहा ।**
**बिभेष्यपि च संसृतेरसुभृतां वधं द्वेक्ष्यपि ॥**
**कदाचिददयोदयो विगतचित्तकोऽप्यंजसा ।**
**तथापि गुरुरिष्यसे त्रिभुवनैकबंधुर्जिनः ॥ ३ ॥**

अर्थः—हे जिनेश ! आपण अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य व परिग्रह त्याग या पांच व्रतामध्यें दृढ प्रेम करतां व ज्याला जगांत कोणत्याही पदार्थाची उपमा देतां येत नाहीं अशा मोक्षसुखाची इच्छा बाळगता. आपण संसारापासून भ्यालेले आहांत, प्राण्यांच्या हिंसेचा आपण निषेध करीत असतां. असें असतांही एखाद्यावेळेस कषाय व इंद्रियांच्या स्वाधीन झाल्यामुळें हिंसा ही होते. तथापि आपण भाव



मन नसल्यामुळें अमनस्क आहांत. हे जिनेश आपल्यामध्यें रागद्वेष भरलेले असून ही आपण परमात्मा आहांत. आपणांस सर्व जग गुरु मानतें, आपण सर्व कर्मांचा नाश करून टाकला आहे व सर्व जगाचें कल्याण करणारे अद्वितीय मित्र आहांत.

**विशेष स्पष्टीकरण**—वरच्या श्लोकामध्यें जिनेश्वरामध्यें प्रेम, इच्छा भीति द्वेष वगैरे दोष आहेत असें प्रतिपादन केलें व पुनः हे दोष असूनही ते गुरु आहेत, जगन्मित्र आहेत, व कर्मांचा नाश त्यांनीं केला आहे असें प्रतिपादन केल्यानें स्पष्ट विरोध उत्पन्न होतो. कारण जे दोषी आहेत त्यांच्या अंगीं गुण कसे असणार ? व गुणपरिपूर्ण व्यक्तींच्या अंगीं दोष कसे असणार ? याचप्रमाणें जिनेश्वरामध्यें जर आपण गुणपरिपूर्णता मानीत असाल तर ते निर्दोष आहेत असें ह्मणणें शोभेल. व ते दोषी असतील तर त्यांच्या अंगीं गुण मानणें अयुक्त आहे. व गुण आणि दोष या उभयतांचा त्यांच्या ठिकाणीं समावेश मानल्यास हें प्रतिपादन अवश्य विरुद्ध आहे असें ह्मणण्यास काय हरकत आहे अशी मनामध्यें शंका उत्पन्न होणें साहजिक आहे. परंतु या शंकेचें उत्तर असें आहे—

श्लोकांत विरोधी दिसणारें प्रतिपादन आचार्यांनीं केलें आहे, अशा तऱ्हेचें विरुद्ध दिसणारें पण सुरुद्ध असलेलें प्रतिपादन श्रोत्यांच्या मनामध्यें व वाचकांच्या मनामध्य प्रथमतः घोटाळा तदनंतर आश्चर्य व आनंद उत्पन्न करितें. असलें प्रतिपादन साहित्यची शोभा देखील वाढवितें हें कोणीही बुद्धिमान मनुष्य निःसंशय कबल करील. वास्तविक पाहिलें असतां अहिंसादिक व्रतें हीं आत्म्याचे गुण आहेत हीं पांचही व्रतें चारित्ररूप आहेत. व चारित्र हा आत्म्याचा गुण असल्यानें त्या चारित्राची जिनेश्वरांनीं पूर्ण जोपासना केली यांत प्रेम कसलें व हा दोष तरी कसा समजावा ? व्रतें पाळणें, चारित्र संरक्षण करणें हें दोषावह नाहीं. परिग्रहावर जें प्रेम उत्पन्न होतें त्या प्रेमास

दोष ह्मणूं शकूं परंतु जिनेंद्र निर्मोही आहेत यामुळें त्यांच्या ठिकाणीं प्रेम उत्पन्न होत नाहीं. परिग्रहावर प्रेम करीत गेल्यानें आत्मिक शुद्धतेचा ऱ्हास होतो व लोभ कषायाची मात्रा वाढत जाते. परंतु ज्ञान, दर्शन, चारित्राची वरचेवर वृद्धि; आत्मिक शुद्धता वाढत चालल्यानें होते. यामुळें तेथें प्रेम असू शकत नाहीं. आपण परिग्रहाचा त्याग करूं शकतो, परंतु ज्ञान, दर्शनचारित्र यांचा त्याग करतां येत नाहीं कारण ते आत्मिक गुण आहेत. ते आत्म्याचे स्वभाव आहेत. यामुळें त्यांना परिग्रह ह्मणतां येत नाहीं व ज्या अर्थी त्यांना परिग्रह ह्मणतां येत नाहीं त्या अर्थीं त्यांचीं वाढ प्रेमास उत्पन्न करूं शकत नाहीं. रागादिक दोषामध्यें हे माझे आहेत असा संकल्प उत्पन्न होणें यास प्रेम ह्मणतात व हें प्रेम मात्र दोष स्वरूप आहे. व्रतें, दर्शन, ज्ञान यामध्यें जिनेश्वरांचें प्रेम आहे असें ह्मणणें विनोदाचें आहे व ते प्रथमतः विरोधी दिसावें एवढ्याचसाठीं आचार्यांनीं असें ह्मटलें आहे. जिनेंद्रांना मोक्षसुखाची इच्छा आहे असें ह्मणणें ही याचप्रमाणें समजावें. इच्छा हा मोह कर्माचा एक भेद आहे व मोह कर्माचा जिनेशांनीं नाश केला आहे ह्मणून ती त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होत नाहीं.

जिनेश्वरांनीं संसाराचा त्याग केला कारण ते भ्याड होते. येथें भीति हा एक गुणच आहे असें ह्मणतां येईल. कारण या ठिकाणीं ' भीति ' या शब्दाचा अर्थ शूरता असा होऊं शकेल. वाईट कामासून भिणें ह्मणजे शूरता नव्हे काय ? व्यसनास बळी न पडतां त्यापासून भिऊन पळणाऱ्या मनुष्यास आपण शूर ह्मणत नाहीं काय ?

संसारपाशाला पाहून दुरूनच भीतीनें पळत सुटलेल्या जिनेश्वरास आह्मी तर शूरच ह्मणूं आचार्य त्यांना खुशाल भित्रे ह्मणोत. जिनेश्वरांनीं मोह कर्माचा अभाव केल्यामुळें खरोखरच ते शूर आहेत.



ते हिंसेचा द्वेष करितात वास्तव हा द्वेष गुणच समजला पाहिजे. जिनेश्वरांना मन नाहीं ह्मणून त्यांना कोणी असंज्ञी ह्मणण्याचें धाडस करूं नये कारण वीर्यांतराय कर्म व नो इंद्रियावरण कर्माचा क्षयोपशम झाल्यानें भाव मन उत्पन्न होतें ह्मणजे आत्म्याच्या ज्या प्रदेशांवर वर सांगितलेल्या कर्माचा क्षयोपशम झाला असेल त्या आत्मप्रदेशांस भावमन ह्मणतात. परंतु जिनेश्वरांनी जेव्हां ज्ञानावरण व अंतराय कर्मांचा नाश केला त्यावेळेस या कर्मांचा क्षयोपशम रहात नसल्यामुळें भावमन कोठून राहणार ? वास्तव त्यांना ' विगतचित्तक ' असें आचार्यांनीं ह्मटलें हें योग्यच आहे.

जिनेश्वरांना भावमनच नसतें असें नाहीं तर भावेंद्रियें ही नाहींत अर्थात् पांच भावेंद्रियें व भावमन हीं जिनेश्वरांना नाहींत. वीर्यांतराय कर्म व स्पर्शनादि इंद्रियावरणाचा क्षयोपशम आत्म्याच्या ज्या प्रदेशांवर झाला त्या आत्मप्रदेशांस स्पर्शनादि भावेंद्रियें ह्मणतात. परंतु ज्ञानावरण व अंतराय कर्माचा जिनेंद्रांनीं क्षय केल्यामुळें हीं भावेंद्रियें देखील नाहींत वास्तव जिनेन्द्रांना भावेंद्रिय रहित असें ह्मटलें असतां हरकत नाहीं जिनेश्वराच्या ठिकाणीं प्रेम वगैरे दोष आहेत असें ह्मटलें होतें तें या विवेचनावरून नाहींत असें झालें व जिनेश्वर केवळ गुणांचा पुंज आहेत असें सिद्ध झालें. ज्या अर्थी जिनेश्वर गुणसमुद्र आहेत त्या अर्थी ते जगद्गुरु, त्रिभुवनहितैषी, कर्मशत्रुविदारक आहेत हें ठरलें.

आतां जिनेश्वरास कोणत्या अवस्थेंत केवलज्ञान उत्पन्न झालें तें सांगतात.

**तपः परमुपाश्रितस्य भवतोऽभवत्केवलं ।**
**समस्तविषयं निरक्षमपुनश्च्युति स्वात्मजम् ॥**
**निरावरणमक्रमं व्यतिकरादपेतात्मकं ।**
**तदेव पुरुषार्थसारमभिसम्मतं योगिनाम् ॥ ४ ॥**

**अर्थः**—हे जिनेश ! आपण एकत्ववितर्क नांवाच्या शुक्लध्यानाचा आश्रय केल्यानें आपणांस केवलज्ञान उत्पन्न झालें. आपलें केवलज्ञान संपूर्ण पदार्थांना जाणतें. तें अतींद्रिय आहे अर्थात् त्याची उत्पत्ति इंद्रियांपासून नाहीं. तें केव्हांही नाश पावत नाहीं, अर्थात् तें सादि व अनिधन आहे. तें इंद्रियांची आपल्या उत्पत्तीमध्यें अपेक्षा ठेवीत नाहीं तें फक्त आत्म्यापासून उत्पन्न होतें. ज्ञानावरण कर्मांचा नाश झाल्यामुळें शुद्ध झालेल्या आत्म्याचा तें गुण आहे यास्तव केवल ज्ञान निरावरण आहे. केवलज्ञान अतींद्रिय असल्यामुळें संपूर्ण पदार्थांना एकदम जाणतें. पदार्थांचें जें स्वरूप असेल तेंच स्वरूप केवलज्ञानामध्यें झळकतें. जसें कावीळ झालेल्या मनुष्यास पांढरे पदार्थ देखील पिवळे दिसतात असें केवलज्ञानांत होत नाहीं. तें केवलज्ञान संशय, विपर्यय व अनध्यवसाय या दोषांनीं रहित असतें व तें केवलज्ञानच योगिजनांनीं पुरुषार्थाचें सार मानलें आहे. अर्थात् केवलज्ञान मोक्षाची प्राप्ति करून देण्यास मुख्य कारण मानिलें आहे.

जर श्रीजिनेश्वरास केवलज्ञान उत्पन्न झालें आहे तर एकच पदार्थ अस्तित्व व नास्तित्व या दोन गुणांना धारण करतो असें कसें त्यांनीं सांगितलें. ? असें त्यांचें सांगणें प्रत्यक्ष विरुद्ध दिसतें.? या शंकेचें उत्तर आचार्य देतात.

**परस्परविरोधवद्विविधभंगशाखाकुलं ।**
**पृथग्जनसुदुर्गमं तव निरर्थकं शासनम् ॥**
**तथापि जिन ! सम्मतं सुविदुषां न चात्यद्भुतं ।**
**भवन्ति हि महात्मनां दुरुदितान्यपि ख्यातये ॥५॥**

**अर्थः**—हे जिनेश ! आपलें वचन सर्वथा वस्तु सद्रूपच आहे किंवा असद्रूपच आहे अशा एकान्त अर्थानें रहित आहे ह्मणजे आपलें वचन अनेकांतात्मक आहे. परस्पर विरुद्ध असलेल्या अस्ति, नास्तित्वादि नानातऱ्हेच्या विकल्परूपी शाखांनीं तें व्याप्त आहे. ग्राह्य कोणतें व



अग्राह्य कोणतें याचा विचार करण्यास असमर्थ असलेल्या मनुष्यांना आपलें वचन कळणें अशक्य आहे. तरी देखील अनेकांत वादाचें रहस्य जाणणाऱ्या विद्वान लोकांना आपलें वचन मान्य आहे याच्यांत कांहीं आश्चर्य नाहीं; कारण जे मोठे ज्ञानी असतात त्यांच्या परस्पर विरुद्ध वचनांची देखील जगांत प्रसिद्ध होते.

**तात्पर्यः**—श्रीजिनेश्वराचे भाषण परस्पर विरुद्ध असून देखील सुसंगत आहे. आपणांस तें विरुद्ध वाटतें परंतु अपेक्षांच्या आश्रयानें युक्त तें असल्यामुळें त्यांत विरोध नाहीं श्रीजिनाचें भाषण सार्थक आहे ह्मणजे ते एकांतरूप अर्थाचें वर्णन करीत नाहीं तें पदार्थामध्यें अनेक धर्म आहेत असें वर्णन करतें. यामुळें श्रीजिनाचें वचन विरुद्ध नाहीं हें ठरतें आणि ह्मणूनच विद्वज्जनांना मान्य आहे.

आतां जिनेश्वराजवळ परिग्रह आहे व ते निःपरिग्रहीही आहेत हें परस्पर विरुद्ध दिसतें, या शंकेचें उत्तर आचार्य सांगतात.

**सुरेन्द्रपरिकल्पितं बृहदनर्घ्यं सिंहासनं ।**
**तथातपनिवारणत्रयमथोल्लसच्चामरम् ॥**
**वशं च भुवनत्रयं निरुपमा च निःसंगता ।**
**न संगतमिदं द्वयं त्वयि तथापि संगच्छते ॥६॥**

**अर्थः**—हे जिनेश ! देवेंद्रांनीं रचलेलें, मोठें व अमूल्य असें आपलें सिंहासन आहे. आपल्याजवळ अमूल्य अशीं तीन छत्रें आहेत व शोभणारीं चौसष्ट चामरें आहेत. सर्व जगत् आपल्या आज्ञेंत आहे. तथापि आपण पूर्ण निःसंग आहांत, परिग्रह रहित आहात. वर सांगितलेलें हें ऐश्वर्य व निःसंगता ही परस्पर विरुद्ध असूनही आपल्या ठिकाणीं हें सर्व सुसंगत दिसतें. यावरून आपलें माहात्म्य अचिन्त्य आहे.

**तात्पर्यः**—श्लोकांत वर्णन केलेलें ऐश्वर्य जरी प्रभूजवळ आहे तथापि त्या ऐश्वर्यावर परमाणुमात्रही त्यांची प्रीति नसल्यामुळें ते परि-

ग्रहवान् आहेत असें ह्मणता येत नाहीं. कारण 'मूर्च्छा परिग्रहः' असें परिग्रहाचें लक्षण आहे. आत्म्याच्या ममत्वरूप परिणामाला-विचाराला परिग्रह ह्मणतात. श्रीजिनाचें असे परिणाम नसल्यामुळें त्यांना परिग्रहवान् ह्मणता येत नाहीं जवळ परिग्रह नसून देखील ज्याचे ममत्वरूप परिणाम असतील तो अवश्य परिग्रहवान् समजावा. यावरून जिनेश्वर निष्परिग्रही आहेत. जिनेश परिग्रहसहित व निष्परिग्रही ही आहेत असें आचार्यांनीं विरोधी वचन दिले तें केवळ वरूनच विरोधी दिसतें. वास्तविक विरोधी नाहीं असें समजावें.

मागें सांगितलेला विरोध देखील भगवंताचें ठिकाणीं सुसंगत दिसतो हें दाखवितात.

त्वमिन्द्रियविनिग्रहप्रवणनिष्ठुरं भाषसे ।
तपस्यपि च यातयस्यनघ दुष्करे संश्रितान् ॥
अनन्यपरिदृष्टया षडसुकायसंरक्षया ।
स्वनुग्रहपरोऽप्यहो त्रिभुवनात्मनां नापरः ॥ ७ ॥

**अर्थः**—हे भगवंता, आपण आपआपल्या विषयामध्यें उत्पन्न होणाऱ्या इंद्रियाच्या प्रवृत्तीला रोकण्यास समर्थ असलेलें असें कठोर भाषण हमेशा बोलत असतां हे निष्पाप जिनेशा ! आपण आपल्या शिष्य जनाकडून दुष्कर तपश्चरण करविता. अशा कृत्यामुळें आपण निर्दय आहात. परंतु आपण षट्काय जीवांचें संरक्षण करीत असता व त्या जीवांचें रक्षण आपण जसें करूं शकता तसें हरिहरादिक करूं शकत नाहीं यावरून आपण त्रैलोक्यामध्यें अनुग्रह करणाऱ्या—कल्याण करणाऱ्या लोकामध्यें अद्वितीय आहात.

**तात्पर्यः**—जिनेश्वराचें भाषण इंद्रिय दमन करणारें असल्यामुळें विषयासक्त प्राण्यांना तें कठोर वाटत असतें तथापि अशा भाषणानेंच आत्मिक कल्याण होत असतें. ह्मणून तें दयापूर्ण आहे असेंच ह्मटलें पाहिजे. जरी जिनेश्वरानें शिष्यांना कठिन तप करावयास लावलें तरी



त्यापासून शिष्यांच्या आत्म्याची वरचेवर शुद्धता होत जाते ह्मणून जिनेश्वरांचा शिष्य मंडळीवर हा मोठा अनुग्रहच आहे असें समजलें पाहिजे. यावरून जिनेश्वराशिवाय दुसरा कोण आपला अनुग्रह करूं शकेल ?

हरिहरादिक स्तुति करणाऱ्याला सुखी करतात व ती न करणाऱ्याला हमेशा दुःख देतात. परंतु भगवंताच्या ठिकाणीं रागद्वेषांचा अभाव असूनही ते स्तुति व द्वेष करणाऱ्याला सुखी व दुःखी करतात असें अचिंत्य सामर्थ्य त्यांच्यांत आहे हें आचार्य या श्लोकांत सांगतात.

ददास्यनुपमं सुखं स्तुतिपरेष्वतुष्यन्नपि ।
क्षिपस्यकुपितोऽपि च ध्रुवमसूयकान् दुर्गतौ ॥
न चेश परमेष्ठिता तव विरुध्यते यद्भवान् ।
न कुप्यति न तुष्यति प्रकृतिमाश्रितो मध्यमाम् ॥८॥

हे जिनेश ! स्तुति करणाऱ्यावर आपण प्रसन्न होत नसून देखील त्यांना उत्कृष्ट सुखाची प्राप्ति करून देता. व आपण क्रोधरहित असून देखील आपल्या गुणांची निंदा करणाऱ्यांस दुर्गतीमध्यें—नरकादि नीच व दुःखद गतीमध्यें ढकलून देता. तथापि आपण पूज्यच आहात. अशा कृत्यांनीं देखील आपली पूज्यता लवमात्रही कमी होत नाहीं. हे जिनेश ! आपण रागावत नाहीं व संतुष्टही होत नाहीं. आपण पूर्ण समतेचा आश्रय केला आहे.

**विशेष स्पष्टीकरणः**—श्रीजिन हे आह्मी पाप व पुण्य उपार्जन करतो त्यास निमित्त कारण आहेत. आह्मी ज्यावेळेस भक्तिवश होऊन त्यांचे गुणगान करतो त्यावेळेस आह्मांस पुण्यबंध होतो व तो आह्मांस सुख देतो. परंतु त्या सुखाची प्राप्ति होण्यास जिनेश्वर निमित्त कारण आहेत. यास्तव जिनेश आह्मांस सुख देतात असें आह्मी ह्मणू शकतो. तसेंच आह्मी द्वेषपर होऊन त्यांची निंदा करतो त्यावेळेस

आह्मांस पापबंध होतो. व त्यामुळें आह्मांस नरकादि गतीमध्यें दुःखें भोगावीं लागतात. यास्तव जिनेश, आह्मांस नरकादि दुर्गतीमध्यें लोटतात असें ह्मणता येतें. वास्तविक ते आह्मांस सुखदुःख देत नाहींत कारण त्यांच्या ठिकाणीं पूर्ण माध्यस्थ भाव विंबला आहे. अशा तऱ्हेचे उद्गार धनंजय कवीनेंही आपल्या विषापहार स्तोत्रामध्यें काढले आहेत ते असें—

उपैति भक्त्या सुमुखः सुखानि ।
त्वयि स्वभावाद्विमुखश्च दुःखम् ॥
सदावदातद्युतिरेकरूप-
स्तयोस्त्वमादर्श इवावभासि ॥ १ ॥

हे जिनेश ! जो उन्मुख होऊन आपली स्तुति करतो त्याला सुखें प्राप्त होतात. व जे सदा विमुख असतात अर्थात् आपली सर्वदा निंदा करतात त्यांना स्वभावतः दुःखेंच प्राप्त होतात. हे जिनेश ! आपण शुद्ध व एक स्वरूपाचें आहात, पूर्ण समतेनें भरलेले आहात. यास्तव आपण दर्पणाप्रमाणें आहात. दर्पणामध्यें सुरूप मनुष्यानें आपलें तोंड पाहिलें असतां त्याला तें सुंदर दिसतें. व एखाद्या कुरूप मनुष्यानें आपलें तोंड पाहिलें असतां तें त्याला कुरूपच दिसणार. दर्पण एखाद्याचें तोंड सुंदर बनवितो व एखाद्याचें कुरूप बनवितो काय. तद्वतच जिनेश कोणाला सुख देत नाहींत किंवा कोणाला दुःखी करीत नाहींत. सर्व जण आपआपल्या शुभाशुभ विचारांनीं सुख किंवा दुःखाचें भागीदार होत असतात. दर्पण जसा चांगलें वाईट तोंडाचें प्रतिबिंब दाखविण्याला कारण होतो तद्वत् जिनेशही सुखदुःखास कारण होतात असें समजावें.

आतां सयोग केवलीच्या अवस्थेंत असलेल्या जिनाच्या हरिहरादिकांच्या ठिकाणीं न संभवणाऱ्या असाधारण गुणांचें वर्णन आचार्य करतात.



परिक्षपितकर्मणस्तव न जातु रागादयो ।
न चेंद्रियविवृत्तयो न च मनस्कृता व्यावृतिः ॥
तथापि सकलं जगद्युगपदंजसा वेत्सि च ।
प्रपश्यसि च केवलाभ्युदितदिव्यसच्चक्षुषा ॥ ९ ॥

**अर्थः**—आत्म्याच्या सर्व प्रदेशांतून चार घातिकर्मांना ज्यानें हाकालून दिलें आहे अशा हे जिना तुला रागादिक दोष बिलकुल नाहींत. हे जिन ! तुझीं स्पर्शनादि इन्द्रियें आपआपल्या विषयास जाणण्याचा प्रयत्न करीत नाहींत ह्मणजे डोळ्याच्या पापण्या लवत नाहींत व बुबुळें फिरत नाहींत, तसेंच तुझा दिव्यध्वनि होतो त्यावेळीं देखील ओठ हलत नाहींत, जीभ तोंडामध्यें इकडे तिकडे फिरत नाहीं. यामुळें तुझीं इंद्रियें पदार्थांचें स्वरूप जाणीत नाहींत; तीं निरुत्सुक आहेत. मनःपूर्वकही तुझे कोणतेही व्यापार होत नाहीं. ( केवली अमनस्क असतात. मागें सांगितलें आहे. ) असें असूनही अर्थात् इंद्रियें व मन यांच्यापासून आपणांस कोणतेंही ज्ञान होत नसूनही ज्ञानावरणादि चार कर्मांचा पूर्ण नाश झाल्यामुळें उत्पन्न झालेल्या ज्ञानानें सर्व जगत् हे जिना, तूं एकदम परमार्थ रीतीनें जाणतोस आणि केवल दर्शनरूपी डोळ्यानें सर्व पदार्थांस एकदम तूं पाहतोस.

**तात्पर्यः**—श्री जिनेश्वरास इन्द्रियापासून ज्ञान होत नाहीं. त्याचें ज्ञान अतींद्रिय आहे. तें फक्त आत्म्यापासून उत्पन्न होतें. त्या ज्ञानामध्यें सर्व जगत् जाणण्याचें सामर्थ्य आहे.

कर्मांचा नाश झाल्यामुळें जिनेश्वरास काय प्राप्त झालें हें दाखवितात.

क्षयाच्च रतिरागमोहभयकारिणां कर्मणां ।
कषायरिपुनिर्जयः सकलतत्त्वविद्योदयः ॥
अनन्यसदृशं सुखं त्रिभुवनाधिपत्यं च ते ।
सुनिश्चितमिदं विभो सुमुनिसम्प्रदायादिभिः ॥ १० ॥

**अर्थः**—हे जिनेश ! प्रेम, लोभ, मोह, भीति ही उत्पन्न कारणाऱ्या कर्मांचा नाश झाल्यामुळें क्रोधादिकांचा जे शत्रूप्रमाणें आत्म्यास दुःख देत असत त्यांचा तूं पराभव केलास. तुला संपूर्ण जीवादि तत्वांचें ज्ञान झालें. व तुझें सुख इन्द्रियापासून उत्पन्न झालें नाहीं तें आत्म्यापासून झाले आहे व तुझी त्रैलोक्यावर अप्रतिहत सत्ता गाजते. या सर्व गोष्टींचा निर्णय गणधर देवाच्या उपदेशानें, मोठमोठ्या आचार्यांनीं लिहिलेल्या शास्त्रांच्या द्वारें व अनुमानादि प्रमाणांनीं झालेला आहे'

वास्तव हे जिनेशा ! तूंच या विशिष्ट गुणाला धारण करीत असल्यामुळें त्रैलोक्यपूज्य स्थानीं विराजमान झाला आहेस. तुझी वाणी ही सामान्य जनापेक्षां गुणांनीं विशिष्ट असल्यामुळें तूच सर्व जनवन्दनीय पदाला धारण करतोस. हें स्तुतिकार दाखवितात.

**न हीन्द्रियधिया विरोधि न च लिंगबुद्ध्या वचो ।**
**न चाप्यनुमतेन ते सुनयसप्तधा योजितम् ॥**
**व्यपेतपरिशंकनं वितथकारणादर्शना-**
**दतोऽपि भगवँस्त्वमेव परमेष्ठितायाः पदम् ॥११॥**

**अर्थः**—हे भगवन् ! आपलें वचन प्रत्यक्ष प्रमाणानें बाधित होत नाहीं. व आपल्या वचनास अनुमान विरोध करीत नाहीं. आगम देखील आपल्या वचनाचा तिरस्कार करीत नाहीं, तें देखील अनुकूलच आहे. हे विभो ! सात सुनयांनीं गर्भित आपलें भाषण आहे. आपलें भाषण नैगमसंग्रहादि सात नयांची अपेक्षा ठेवणारें आहे. भाषणामध्यें असत्यपणा आणणाऱ्या रागद्वेषमोहांचा आपण नाश केला आहे यास्तव आपल्या भाषणांत संशयाचें नांव देखील मिळत नाहीं. हे जिनेश ! आपलें ज्ञान इन्द्रादिकांकडून पूज्य झालें आहे, यास्तव परमात्मपदाची प्राप्ति आपल्याशिवाय दुसऱ्या कोणांस झाली नाहीं.



परंतु भाषणामध्यें असत्यता उत्पन्न करणारे, राग, द्वेष, मोह वगैरे विकार माझ्यामध्यें नाहींत हें तूं कसें जाणलेंस ? असा भगवंतांनीं प्रश्न केल्याप्रमाणें आचार्य भगवंताचें भाषण कसें खरें आहे हें दाखवितात.

**न लुब्ध इति गम्यसे सकलसंगसंन्यासतो ।**
**न चापि तव मूढता विगतदोषवाग्यद्भवान् ॥**
**अनेकविधरक्षणादसुभृतां नच द्वेषिता ।**
**निरायुधतयाऽपि च व्यपगतं तथा ते भयम् ॥ १२ ॥**

**अर्थः**—हे जिनेशा ! तूं संपूर्ण परिग्रहांचा त्याग केला आहेस यास्तव तूं लोभी नाहींस हें दिसून येतें. हे विभो ! तूं अज्ञ नाहींस कारण तुझें वचन पूर्वापर विरोध रहित आहे, संशय, विपरीतपणा या दोषांचा अभाव तुझ्या ठिकाणीं दिसून येतो तेव्हां तूं अज्ञानी कसा ! व्रत, समिति, गुप्ति, दश धर्म यांचें निर्दोषपणें तूं पालन करतोस यावरून तुझा प्राणिमात्रांशीं द्वेष नाहीं. व तूं पूर्ण समता धारण केली आहेस हें सिद्ध होतें. हे ईशा ! तूं स्वतः जवळ कोणतेंही शस्त्र ठेवलें नाहींस यावरून भयाला आपल्या हृदयांत तुजकडून आश्रय मिळाला नाहीं हें दिसतें.

**तात्पर्यः**—लोभ, अज्ञान, द्वेष व भीति या विकारांमुळें भाषणांत खोटेपणा उत्पन्न होत असतो. परंतु जिनेंद्राच्या ठिकाणीं हे विकार नाहींत हें आचार्यांनीं सिद्ध केल्यामुळें जिनेश्वर असत्यवादी नाहीं हें सिद्ध झालें.

माझें वचन निर्दोष कसें आहे अशी शंका भगवंतानीं स्तुतिकाराच्या बुद्धीची परीक्षा करावी म्हणून विचारल्याप्रमाणेंच कीं काय स्तुतिकार भगवंताच्या शंकेचे निराकरण करतात.

**यदि त्वमपि भाषसे वितथमेवमाप्तोऽपि सन् ।**
**परेषु जिन का कथा प्रकृतिलुब्धमुग्धादिषु ॥**

**न चाप्यकृतकात्मिका वचनसंहतिर्दृश्यते ।**
**पुनर्जननमप्यहो नहि विरुध्यते युक्तिभिः ॥ १२ ॥**

**अर्थः**—हे जिनेश ! आपण वीतरागत्व, सर्वज्ञपणा इत्यादि गुणांचे धारक आहात ह्मणून आपणांस आप्त–अर्थात् सत्यवक्ता असें ह्मणतात. आपणही जर खोटेंच भाषण करता तर जगामध्यें सत्यवक्ता कोणास ह्मणावें? कारण आह्मी स्वभावानेंच लोभी, अज्ञानी, भ्याड व द्वेषी आहोत. आमच्या ठिकाणीं सत्य भाषण कसें असूं शकेल ? अर्थात् असू शकणार नाहीं. आपणच खरोखर सत्य भाषण करणरे आहात. आपण सर्वज्ञ असल्यानें आगमाचें कर्तृत्व आपणाकडेच आहे. आपल्या दिव्यध्वनीतूनच आगम बाहेर पडला आहे. आगम हा अपौरुषेय नाहीं. अर्थात् आगमाचा कर्ता कोणी नाहीं हें ह्मणणें अयोग्य आहे. आगम पौरुषेय अर्थात् पुरुषानें लिहिला–रचला आहे असें मानल्यास बरेच दोष येतात असें ह्मणणें अयोग्य आहे. कारण पुष्कळशा युक्तींनीं आगम पौरुषेय आहे व त्याचा कर्ता सर्वज्ञ आहे हें सिद्ध करतां येतें. यास्तव हे जिनेश ! आपणच सत्यवक्ते आहांत, सर्वज्ञ आहात व आगमाची रचना आपणच केली आहे. अज्ञ मनुष्याचे द्वारें आगमाची रचना होऊ शकत नाहीं.

**विशेष स्पष्टीकरणः**—मीमांसक वेदाला आगम असें ह्मणतात. ते वेदाचा कर्ता मानीत नाहींत. ते वेद नित्य आहे असें मानतात व तो अपौरुषेय आहे असें ते समजतात. परंतु वेदाला सर्वथा नित्य व अपौरुषेय मानले तर बरेच दोष उत्पन्न होतात.

वेदाच्या कर्त्याचें स्मरण होत नसल्यामुळें जर त्यास अपौरुषेय मानीत असाल तर असे पुष्कळ ग्रंथ आहेत ज्यांचा कर्ता कोण आहे याचें स्मरण होत नाहीं. ह्मणून त्या ग्रंथांनाही अपौरुषेय मानावें लागेल. ‘ वटे वटे वैश्रवणः ’ ‘ वडाच्या झाडामध्यें यक्ष असतो ’ अशा प्रकारच्या वाक्यांचा प्रचार पुष्कळ ठिकाणीं आढळून येतो, तसेंच



पुष्कळसे श्लोक प्राचीन ह्मणून आढळून येतात व त्या सर्वांचा कर्ता कोण असावा याचा निर्णय होत नाहीं ह्मणून ते श्लोक, ग्रंथ, व ह्मणी हे सर्व अपौरुषेय मानावे लागतील. जंगलामध्यें देखील आपणांस विहीर किंवा एखादी जुनाट इमारत आढळून येते व ती बांधून काढली कोणी याचा निर्णय लागत नाहीं. ह्मणून ती जर आपण अपौरुषेय मानू लागलों तर तें मानणें मूर्खपणाचें होईल. मीमांसक जरी वेदास अपौरुषेय मानीत असले तथापि वेदाला मानणारे सर्वच लोक वेद अपौरुषेय आहे असें मानीत नाहींत.

पौराणिक वेदाचें कर्तृत्व ब्रह्मदेवाकडे देतात. ‘ वक्त्रेभ्यो वेदास्तस्य विनिःसृताः ’ ब्रह्मदेवाच्या चार मुखांतून वेद उत्पन्न झाले. ‘ प्रतिमन्वन्तरं चैव श्रुतिरन्या विधीयते ’ प्रत्येक मन्वन्तरामध्यें नवीन नवीन वेद ब्रह्मदेव रचतो, तसेंच वेदामध्यें ‘ यो वेदांश्च प्रहिणोति ’ वगैरे पुष्कळ वाक्यें आहेत त्यावरून देखील वेदाचा कर्ता कोणी तरी अवश्य असला पाहिजे. हें सिद्ध होतें. कालासुरानें वेदांची रचना केली असें जैन मानतात. या सर्व प्रमाणावरून वेद अपौरुषेय नाहींत असें सिद्ध होतें. वेदाचा कर्ता कोण आहे याचें विस्मरण फक्त मीमांसकालाच होतें कां सर्वांना होतें ? सर्वांना होतें असें ह्मणणें अयुक्त आहे सर्वांना होतें असें ह्मणणारा सर्वांचे अभिप्राय जाणतो असें सिद्ध होईल. आणि जर मीमांसकाला वेदाच्या कर्त्याचें विस्मरण आहे ह्मणून वेद अपौरुषेय आहे, असें ह्मणाल तर ज्याचा कर्ता कोण आहे हें माहीत नाहीं तें सर्व अपौरुषेय मानावें लागेल. यास्तव भारत, मनुस्मृति वगैरे ग्रंथ जसे कर्त्यावांचून उत्पन्न झाले नाहीत तसेंच वेद देखील समजावेत. वेद अपौरुषेय आहेत ह्मणून ते प्रमाण मानावेत असें मीमांसक ह्मणतात. परंतु त्यांचें ह्मणणें अयोग्य आहे. हिंसा चोरी, लबाडी इत्यादिकांचा उपदेश जगांत कोणी दिला आहे यांचें आपणांस स्मरण होत नाहीं ह्मणून ते उपदेश प्रमाण मानावे लागतील.

यास्तव वेद अपौरुषेय नाहींत हें सिद्ध झालें.

जैन द्वादशांगश्रुत ज्ञानाला आगम असें ह्मणतात. व तो सादि सनिधन व अनादि अनिधन आहे असें मानतात.

जसा अंकुर बीजापासून उत्पन्न होतो ह्मणून तो सादि आहे व अंकुरापासून बीज व बीजापासून अंकुर उत्पन्न होतो अशी परंपरा घेतल्यास अंकुर अनादि निधन ह्मणजे अंकुरास आदि व शेवट नाहीं असें ठरतें. याचप्रमाणें श्रुतज्ञान अनादि निधन आहे. याची अमुक पुरुषानें अमुक वेळेस रचना केली असें सांगतां येत नाहीं यास्तव द्रव्यार्थिक नयानें तें अपौरुषेय आहे व पर्यायार्थिक नयानें तें अनेक वेळेस नाश पावलें व त्याची पुनः पुनः तीर्थकरांनीं रचना केली ह्मणून तें सादिसान्त आहे. आणि तें पौरुषेय आहे असें मानावयासही कांहीं हरकत नाहीं. सर्वज्ञ व आगम यांची परंपरा अनादिकालापासून आहे, ती आजकालची नाहीं. पूर्व सर्वज्ञानें आगमाचा प्रकाश केला ह्मणजे तो प्रगट केला व त्या आगमापासून पुनः उत्तर सर्वज्ञाला केवलज्ञान झालें, उत्तर सर्वज्ञानें पुनः आगमाचा जगांत प्रचार केला व त्या आगमाच्या साहाय्यानें पुढच्या सर्वज्ञाची उत्पत्ति झाली, याप्रमाणें आगम व सर्वज्ञ यांचीही परंपरा अनादिकालापासून चालत आलेली आहे व ती अनंतकालापर्यंत अव्याहत चालू राहील. सर्वज्ञानें आगमाची रचना केली ह्मणजे तें नवीन उत्पन्न केलें असा अर्थ नाहीं तर तो लुप्त झालेला पुनः प्रकाशित केला, कारण द्रव्यार्थिक नयानें सर्वच पदार्थ अनादि व अविनाशी आहेत. तसेंच पर्यायार्थिक दृष्टीनें पाहिलें ह्मणजे त्याची उत्पत्ति सर्वज्ञांनीं केली आहे असें ह्मणतां येतें. यावरून आगम कथंचित्पौरुषेय व कथंचिदपौरुषेय आहे. या आगमाचे पुष्कळ भेद होतात व या आगमाचें व्याख्यान केवलींनीं, श्रुतकेवलींनीं व अलिकडच्या आचार्यांनीं केलेलें आहे. सर्वज्ञ तीर्थकरांनीं आपल्या दिव्यध्वनींत आगमाचा उपदेश केला, सर्वज्ञ हे प्रत्यक्षदर्शी व निर्दोष असल्यामुळें त्यांनीं वर्णन केलेला आगम प्रमाण होय. त्या सर्वज्ञाचेच साक्षात् शिष्य गणधर हे विशाल बुद्धिचे असल्यामुळें व ते श्रुतकेवलि होते ह्मणून त्यांनीं द्वादशांगाची रचना ग्रंथरूपानें केली यास्तव तो द्वादशांगरूप आगम ही प्रमाण आहे कारण, श्री जिनेश्वरांनीं सांगितलेल्या आगमाच्या आधारानें गणधरादि श्रुतकेवलींनीं द्वादशांगची रचना केली आहे. तसेंच काल दोषामुळें आयुष्य, बुद्धि शक्तिही ज्यांची कमी झाली आहे अशा शिष्यावर अनुग्रह करण्यासाठीं दशवैकालिक वगैरे ग्रंथांची रचना अलिकडच्या आचार्यांनीं केली आहे तीहि प्रमाण आहे कारण त्यांनीं तो आगम सारांशरूपानें शिष्यांना सांगितला आहे तसेंच त्यांना गणधरांनीं लिहिलेल्या आगमाचें पाठबळ होते. त्यांनीं स्वेच्छेनें भलतेंच कांहीं न लिहिल्यामुळें तें अप्रमाण मानतां येत नाहीं. याप्रमाणें जैनांनीं आगमास पौरुषेय मानावें कां अपौरुषेय मानावें यांचें वर्णन केलें.



मीमांसकांनीं आगमाला अपौरुषेय मानिलें आहे परंतु तें मानणें अयोग्य आहे असें वर सांगितलें आहे त्यांनीं वेदाला अपौरुषेय मानल्यामुळें सर्वज्ञास रजा दिली आहे ह्मणजे वेदापासूनच आह्मांस सर्व ज्ञान होतें यास्तव सर्वज्ञ मानण्याची जरूरत नाहीं असें ते ह्मणतात. धर्मे चोदनैव प्रमाणम्' धर्माचें ज्ञान करून घेण्यासाठीं वेदासच प्रमाण मानिलें पाहिजे. सूक्ष्म, देशांतरित, कालांतरित पदार्थांचें ज्ञानही वेदापासूनच होतें असें ते मानतात. आत्मा सर्वज्ञ होऊं शकत नाहीं असें त्यांचें ह्मणणें आहे. [ आत्मा सर्वज्ञ होऊ शकतो हें पुढें सिद्ध करूं ] अपौरुषेय वेदापासून धर्मादि सूक्ष्म पदार्थांचा निश्चय होत नाही. वेद स्वतः माझ्या शब्दाचा व वाक्याचा अमुक अर्थ आहे व अमुक नाहीं असें सांगत नाहीं. व यामुळें वेदाचा व्याख्याता अवश्य मानावा लागेल. व तो व्याख्याता रागी द्वेषी असेल तर तो वेदाचा सत्य अर्थ सांगेल असें वाटत नाहीं. कारण प्रीतीनें, द्वेषानें, अथवा अज्ञानपणामुळें खोटें देखील सांगितलें जाण्याचा संभव आहे. तेव्हां तो वेदार्थ खरा सांगेल

किंवा खोटा सांगेल याचा निश्चय होत नाहीं. गुरुपरंपरेनें वेदाचा अर्थ सांगणारे व्याख्याते खोटा अर्थ कशाला सांगतील हेंही ह्मणणें योग्य नाहीं कारण ते जर रागीद्वेषी असतील तर यथार्थ निर्णय होणें शक्य नाहीं. यास्तव अतीन्द्रियार्थदर्शी जर वेदाचा व्याख्याता मानला तर सर्वज्ञाचा आपण निषेध करिता तो व्यर्थ होईल. ह्मणून वेद सर्वथा अपौरुषेय नाहींत हें सिद्ध होतें.

वेद अपौरुषेय नाहीं, तो पौरुषेय आहे हें आचार्य या श्लोकांत दाखवितात.

**सजन्ममरणर्षिगोत्रचरणादिनामश्रुते-**
**रनेकपदसंहतिप्रतिनियामसंदर्शनात् ॥**
**फलार्थिपुरुषप्रवृत्तिविनिवृत्तिहेत्वात्मनाम् ।**
**श्रुतेश्च मनुसूत्रवत्पुरुषकर्तृकैव श्रुतिः ॥१४॥**

**अर्थः**—वेदामध्यें ऋषीचें जन्म, मरण, ऋषींचीं नांवें त्यांचें गोत्र त्यांचें आचरण इत्यादिकांचे वर्णन आढळून येतें. ह्मणून वेद पुरुषांनीं केलेला आहे तो अपौरुषेय नाहीं. अनेक शब्दांची रचना ज्यामध्यें केली आहे अशा ऋचांनीं तो भरला आहे. अर्थात् जसें अनुष्टुप् वसंततिलक यां-ध्यामध्यें नियमित अक्षरें असतात, तद्वत् ऋचामध्येंहि नियमित पद रचना असल्यामुळें वेद अनादि नाहीं. स्वर्गादिसुखें मिळावीं अशी इच्छा करणाऱ्या मनुष्यांनीं कोणतीं कृत्यें करावींत व कोणतीं कृत्यें करूं नयेत यांचें वर्णन यामध्यें आढळून येतें तसेंच यज्ञाचें वर्णन आढळून येतें. यास्तव मनुस्मृति ही जशी मनूनें बनविली आहे ह्मणून पुरुषकृत आहे तसाच वेद देखील पुरुषकृतच आहे असें समजावें.

**तात्पर्यः**—वेद जर अनादि असता तर अलिकडे झालेल्या ऋ-षींचीं नांवें त्यांत दिसलीं नसतीं. अमुक ऋषीचें अमुक गोत्र होतें, तो अमुकवेळीं जन्मला, अमुकवेळीं मेला हें वर्णन त्यामध्यें कसें येणार ? तसेंच कण्वऋषीनें केलेल्या वेदाच्या भागाला काण्व असें ह्मणतात,



कांहीं वेदाच्या भागांना माध्यन्दिन, तैत्तिरीय इत्यादि नांवें आढळून ये-तात. हीं नांवें त्या त्या ऋषींनीं ते ते वेदाचे भाग बनविल्यामुळें पडलीं आहेत ऋषींनीं इन्द्राची प्रार्थना केली, सूर्याची प्रार्थना केली, इत्यादि पुष्कळशा गोष्टींनीं वेदाचा कर्ता कोणी तरी असला पाहिजे हें सिद्ध होतें.

चार्वाक आत्म्याचें अस्तित्व कबूल करीत नाहीं. तो आत्मा मानीत नसल्यामुळें आत्मा सर्वज्ञ होऊ शकतो, तो आगमाचा कर्ता बनू शकतो इत्यादि गोष्टी मानीत नाहीं. आत्म्याची सिद्धि करणारे प्रमाण जगांत कोणतेंही दिसत नाहीं असें तो ह्मणतो. यास्तव याचें ह्मणणें आचार्य या श्लोकानें खोडून टाकतात. व आत्मा आहे हें सिद्ध करितात.

**स्मृतिश्च परजन्मनः स्फुटमिहेक्ष्यते कस्यचि-**
**त्तथाप्तवचनान्तरात्प्रसृतलोकवादादपि ।**
**न चाप्यसत उद्भवो न च सतो निर्मूलात्क्षयः ॥**
**कथं हि परलोकिनामसुभृतामसत्त्वोद्यते ॥१५॥**

**अर्थः**—निःसंशय पूर्वजन्माची आठवण कोणा कोणाला होत असलेली आढळून येते. ' जीवो अणाइणिहणो ' जीव अनादि निधन आहे. अर्थात् जीव अनादि आहे व अविनाशी आहे असा आगमामध्यें उल्लेख मिळतो ' या प्राण्यांनीं पूर्व जन्मीं पुण्य केलें यामुळें या भवा-मध्यें यांना सुख होत आहे; हे सुखी आहेत. व या प्राण्यांनीं पूर्वजन्मीं कांहीं पाप केलें यामुळें आतां याजन्मीं यांना दुःख भोगावें लागत आहे. असें हमेशा लोक ह्मणत असतांना आगांस आढळतात. या सर्व गोष्टीवरून आत्मा हा एक पदार्थ आहे. तो जन्मल्यापासून मरे-तोपर्यंतच असतो पुढें त्याचा नाश होतो असेंही नाहीं तो मागेंही होता व पुढेंही राहणार. अर्थात् आत्म्याला पूर्वजन्म आहे. व पुढेंही आत्म्याला जन्म घ्यावे लागतात. यास्तव चार्वाकांचें आत्मा नाहीं असें ह्मणणें किंवा जन्मल्यापासून मरेपर्यंतच आत्म्याचें अस्तित्व आहे असें ह्मणणें

अयुक्तियुक्त आहे असें ठरतें. तसेंच आत्मा पूर्वी नव्हता तदनंतर तो उत्पन्न झाला असें ह्मणणें ही योग्य नाहीं कारण सर्वथा असत् पदार्थाची उत्पत्ति होत नाहीं तसें होऊ लागलें तर आकाश पुष्प, गाढवाचें शिंग, वंध्येचा मुलगा हींहि उत्पन्न होतील. जो पदार्थ आहे त्याचा सर्वथा नाश केव्हांहीं होत नाहीं. जर पदार्थांचा सर्वथा नाश होऊ लागला तर जग शून्य होईल. यास्तव आत्मा हा सत् पदार्थ आहे त्याला पुनर्जन्म आहे. व त्याचा अत्यंत नाश केव्हांच होत नाहीं. त्याचे पर्याय बदलत असतात. तो मनुष्य असेल तर तो कालांतरानें पुढच्या जन्मीं देव होईल, नारकी किंवा तिर्यंच होईल. परंतु त्याचा समूळ नाश होणें केव्हांहीं शक्य नाही. इत्यादि प्रमाणांनीं आत्म्याची सिद्धि होत असतां आत्मा नाहीं असें ह्मणण्याचें धाडस चार्वाक कां करितात बरें ?

चैतन्य, पृथ्वी, पाणी, अग्नि व वायु या चार तत्वापासून बनतें व तें या तत्वापासून व्यक्त होतें असें चार्वाक ह्मणतात.

त्यांच्या या दोन मुद्द्यांचें खंडन आचार्य या श्लोकांत करितात.

**न चाप्यसदुदीयते न च सदेव वा व्यज्यते ।**
**सुरांगमदवत्तथा शिखिकलापवैचित्र्यवत् ॥**
**क्वचिन्मृतकरन्धनार्थपिठरादिके नेक्ष्यते ।**
**कथं क्षितिजलादिसंघगुण इष्यते चेतना ॥१६॥**

**अर्थः**—पृथ्वी, पाणी, अग्नि व वायू या चार तत्वापासून चैतन्य उत्पन्न होतें व तें चैतन्य पूर्वी त्यामध्यें नव्हतें परंतु हीं चार तत्वें एकत्र झाल्यानें पूर्वी नसलेलें चैतन्य उत्पन्न झालें. ह्मणून असत् चैतन्य उत्पन्न होतें यास उदाहरण असें कीं गूळ, तांदळाचें पीठ पाणी व धायटीचीं फुलें यांच्या संयोगानें पूर्वी नसलेली मादक शक्ति उत्पन्न होतें. व ती असत् आहे तेव्हां असत् पदार्थांची उत्पत्ति होतें. परंतु हें ह्मणणें योग्य नाहीं कारण गूळ,पीठ,पाणी व धायटीचीं फुलें यांच्या संयोगानें जी मदजनकशक्ति उत्पन्न



होते ती या पदार्थांत पूर्वी द्रव्यरूपानें होती व तिला हीं सर्व कारणें मिळालीं यामुळें ती प्रगट झाली ह्मणून मदशक्ति सर्वथा असत् नाहीं हें ठरतें. याचप्रमाणें चैतन्य हेंही द्रव्यरूपानें आहे. व पर्यायरूपानें नाहीं ह्मणून हीं शरीराकार बनलेलीं पृथिव्यादि कारणें मिळालीं ह्मणजे त्या चैतन्यास नरनारकादि आकार मिळतात. तें चैतन्य या शरीराकार बनलेल्या चार भूतापासून उत्पन्न झालें नाहीं. चैतन्य या चार भूतापासून वेगळेच एक पांचवें तत्त्व आहे. व चैतन्य हें पूर्वीपासूनच आहे व ते या भूताच्या समुदायानें अभिव्यक्त होतें. जसें मोराच्या पिसाऱ्यामध्यें जे नानारंग असतात ते पूर्वीपासून असतात. परंतु हें ह्मणणेंही योग्य नाहीं. चैतन्य हें सर्वथा सत् नाहीं, तें कथंचित् सत् आहे द्रव्यार्थिक नयानें तें कथंचित सत् आहे व पर्यायार्थिक नयानें कथंचित असत् आहे. द्रव्यार्थिक नयानें चैतन्य अनादिकालापासून अनंतकालापर्यंत टिकून राहते व पर्यायार्थिक नयानें त्याचें प्रतिसमयीं पर्याय बदलत असतात. ह्मणून पर्यायार्थिक नयानें तें असत् आहे व हें भूतचतुष्टय त्यास व्यक्त करण्यास कारण होतें. यावरून चैतन्य हें निराळें तत्त्व आहे हें सिद्ध होतें. जर चार्वाक या चार भूतापासून चैतन्य उत्पन्न होतें असें ह्मणतो तर मेलेल्या प्राण्याच्या शरीरामध्यें या चार भूतांचा समुदाय असूनही चैतन्य कां उत्पन्न होत नाहीं बरें ? अथवा ज्याच्यांत आपण भात शिजवितो अशा भांड्यामध्यें पाणी, हवा, अग्नि व पृथ्वी ही चार भूतें असूनही तेथें चैतन्य कां उत्पन्न होत नाहीं बरें ? यास्तव चैतन्य या चार भूताच्या समुदायाचा गुण आहे असें चार्वाक कसें मानतो. अर्थात् त्याचें हें मानणें चुकीचें आहे असें ठरतें.

**विशेष स्पष्टीकरण**—चार्वाक या चार भूताशिवाय चैतन्य हें निराळें तत्व मानीत नाहींत. चार्वाकांचेहि दोन भेद आहेत, एक अभिव्यक्तिवादी व दुसरा कार्यवादी, अभिव्यक्तिवादी चार भूतामध्येंच चैतन्य व्यक्त होण्याची शक्ति मानितात. व या चार भूतांचा समुदाय चैतन्य

व्यक्त करितो असें ते ह्मणतात. व कार्यवादी चार्वाक या चार भूतापासून चैतन्य उत्पन्न होतें असें मानितात. तें चैतन्य पूर्वी भूतचतुष्टयामध्यें नसतें व तें मागाहून उत्पन्न होतें. असें त्यांचें ह्मणणें आहे परंतु चैतन्य आत्म्याचा गुण आहे व तें आत्मद्रव्य स्वतंत्र निराळें तत्व आहे. चारभूतेंहीं चैतन्यास उत्पन्न करितात असें चार्वाक ह्मणतात त्यांस आह्मी असे विचारितो कीं चारभूतें हीं चैतन्याहून वेगळे गुणधर्म धारण करितात? ह्मणजे हीं विजातीय आहेत किंवा चैतन्याच्या जातीचीं आहेत ? जर आपण सजातीय मानीत असल्यास आत्मा व चार भूतें हीं एकाच स्वभावाचीं आहेत असें मानले पाहिजे. आणि चैतन्यापासून हीं भिन्न धर्माना धारण करणारीं आहेत अर्थात् विजातीय आहेत असें मानल्यास विजातीयापासून या चैतन्याची उत्पत्ति होईल व तसें मानल्यास पाण्यापासून अग्नि वगैरे भूतांची देखील उत्पत्ति होईल. आणि चार्वाकोंनीं पृथ्वी, पाणी वगैरे जीं चार तत्वें मानलीं तीं त्यांना मानतां आलीं नसतीं कारण एकच तत्व मानून यापासून चारभूतें उत्पन्न होतात असें मानलें असतें तरी चाललें असते. यावरून भूतचतुष्टय हे चैतन्याच्या उत्पत्तीचें उपादान कारण नाहीं हें सिद्ध होते. चैतन्याचे उपादान कारण आत्मा आहे. चैतन्य ह्मणजे ज्ञान व दर्शन. आणि ज्ञान व दर्शन हीं आत्म्याशिवाय इतर ठिकाणीं आढळून येत नाहींत. यास्तव आत्म्याचें लक्षण ज्ञान व दर्शन हें आहे. व भूतचतुष्टयाचें लक्षण याहून भिन्न आहे. पृथ्वीचें लक्षण वस्तूंना धारण करणें, वायूचें वाहणें जलाचे द्रवरूप असणें व अग्नीचें उष्ण असणें हें लक्षण आहे. व हीं लक्षणें आत्म्याचीं नाहींत. तसें प्रत्येक आत्मतत्वामध्यें मी सुखी आहे व दुःखी आहे हा अनुभव इतर इंद्रियापासून येत नाहीं तो खुद्द आत्म्यापासूनच येतो, मी गोरा आहे. मी काळा आहे मी अशक्त आहे अशा तऱ्हेचा जो अनुभव येतो तो शरीराच्या आश्रयानें येतो व आपली शरीरावर अत्यंत प्रीती असल्यामुळें शरीर व आपला आत्मा एक आहे अशी कल्पना करून



मी गोरा आहे काळा आहे असें आपण ह्मणतो. जसें अत्यंत उपकार करणाऱ्या नोकराला मालक ‘ हा आणि मी ’ वेगळा नाहीं असें मानतो. यावरून मी काळा आहे वगैरे अनुभव शरीरद्वारें उत्पन्न होतो हें सिद्ध आहे. अतिशय दाट अंधकारामध्यें आपण उभा राहिल्यावर आपणांस ‘ अहं ’ असा जो अनुभव येतो तो शरीराच्या अपेक्षेनें येत नाहीं. कारण त्यावेळीं स्थूलत्वादि धर्मानीं युक्त असें शरीर दिसत नाहीं. यास्तव ‘ अहं ’ या अनुभवाचा विषय आत्म्याशिवाय अन्य होऊं शकत नाहीं. इंद्रियें हीं आपआपल्या विषयामध्यें प्रवृत्त होतात याचें कारण आत्मा सर्व शरीरामध्यें व्यापून राहिलेला आहे, व त्याच्या प्रेरणेनें तीं आपआपल्या विषयाकडे प्रवृत्ति करतात. चार्वाक, चैतन्य हें शरीर, इंद्रियें व मन यांचा गुण आहे, असें ह्मणतात. परंतु हें त्यांचें ह्मणणें योग्य वाटत नाहीं जर चैतन्य शरीराचा गुण मानला तर शरीर येथेंच रहातें व चैतन्य शरीरांतून नाहींसें झालेलें आपण पाहतो, हें कसें ? कारण गुणाचा नाश झाल्यावर गुणीचा देखील अवश्य नाश झाला पाहिजे. चैतन्य निघून गेल्यावर शरीर देखील एकदम नाहींसें झालें पाहिजे. यावरून चैतन्य हें शरीराचा गुण नाहीं हें सिद्ध होतें रूपादिक हे शरीराचे गुण आहेत व ते मात्र शरीरामध्यें दृष्टीस पडतात. चैतन्य इंद्रियांचा गुण आहे असें मानल्यास इंद्रियांचा नाश झाल्यावर चैतन्याचाही नाश झाला असतां. इंद्रियांचा नाश झाला तरी स्मरण वगैरे अनुभव हे असतातच. त्यांचा नाश होत नाहीं. यास्तव चैतन्य इंद्रियांचा गुण नव्हे. या विवेचनावरून आत्म्याचा चैतन्य गुण आहे हे सिद्ध होतें. स्मरण, ज्ञान, रागद्वेषादिक विकार हे सर्व इतर पदार्थांत दिसत नाहींत हे फक्त आत्म्यामध्येंच दिसून येतात.

तदहर्जस्तनेहातो रक्षोदृष्टेर्भवस्मृतेः ।
भूतानन्वयनात्सिद्धः प्रकृतिज्ञः सनातनः ॥

मूल जन्मल्याबरोबर स्तन पान कोणी न शिकविता फक्त लागते

हे पूर्व संस्काराचें कार्य आहे व यावरून देखील अशा तऱ्हेच्या संस्काराचा धारक आत्माच आहे हें सिद्ध होतें. तसेंच राक्षस, पिशाच हे दृष्टीस पडतात; पूर्वभवाचें स्मरण होतें, व चार भूतांचें स्वरूप यामध्यें दिसून येत नाहीं यावरून आत्मा हा अनादिनिधन आहे.

याप्रमाणें आत्मतत्वाची सिद्धि झाल्यावर त्याच्या ठिकाणीं सर्वज्ञता वीतरागता वगैरे गुणांची सिद्धि करतां येतें.

आतां भगवन्ताच्या, रागद्वेषाचा पूर्ण अभाव दाखविणाऱ्या शरीराचें, आचार्य, वर्णन करतात.

प्रशान्तकरणं वपुर्विगतभूषणं चापि ते ।
समस्तजनचित्तनेत्रपरमोत्सवत्वं गतम् ॥
विनायुधपरिग्रहाज्जिन ! जितास्त्वया दुर्जयाः ।
कषायरिपवः परैर्न तु गृहीतशस्त्रैरपि ॥ १७ ॥

हे जिनेश ! तुझें शरीर आपआपल्या विषयापासून विरक्त झालेल्या इंद्रियांनीं युक्त आहे व भूषणांनीं रहित आहे, तथापि सर्व लोकांच्या अंतःकरणास व डोळ्यांस अतिशय आनंदित करतें. हे जिनेश ! तुजकडून दुर्जय असे देखील कषायशत्रु शस्त्रें हातात न घेतां जिंकले गेले. व हातांत शस्त्रें घेऊन देखील हरिहरादिकांकडून हे कषायशत्रू जिंकले गेले नाहींत.

श्री जिनांनीं कषायांना जिंकलें याचें वर्णन आचार्यांनीं केलें. आतां श्री जिनेश्वरांस केवलज्ञान कसें प्राप्त झालें याचें वर्णन करतात.

धियान्तरतमार्थवद्गतिसमन्वयान्वीक्षणा—
द्भवेत्खपरिमाणवत्कचिदिह प्रतिष्ठा परा ॥
प्रहाणमपि दृश्यते क्षयवतो निमूलात्कचित् ।
तथायमपि युज्यते ज्वलनवत्कषायक्षयः ॥ १८ ॥

अर्थः— परमाणूपासून परिमाणाची वाढ होण्यास आरंभ होतो व



परिमाणाची कल्पना आकाशापर्यंत होते. अर्थात् परमाणु हा अतिशय सूक्ष्म पदार्थ आहे. पुढें द्व्यणुक, त्र्यणुक, चतुरणुक, याप्रकारें परिमाणाचें क्षेत्र विस्तृत होत जातें व तें आकाशामध्यें संपते. कारण आकाशापेक्षां दुसरी मोठी वस्तु नसल्यामुळें परिमाणाची कल्पना येथेंच थांबते. तेव्हां परिमाण जसें वाढत जातें याचप्रमाणें बुद्धिमध्यें देखील तरतमभाव वाढत जातो. ज्ञान हें स्थावर जीवांमध्यें अतिशय कमी असतें त्यांच्यापेक्षां द्वींद्रिय जीवामध्यें जास्ती असतें. याप्रमाणें तें वाढत वाढत केवलीच्या ठिकाणीं त्याची पूर्णता होतें. कारण केवलींच्या ज्ञानावरणीय कर्माचा पूर्ण नाश होत असतो त्यामुळें, मेघ नाहींसे झाल्यामुळें सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें, त्यांचें तें ज्ञान वस्तूंना प्रकाशित करीत असतें.

जसें सोनें अग्नींत घातलें असतां पहिल्यावेळीं त्याचा मळ थोडासा नाहींसा होतो व पुनः पुनः तें अग्नींत घातल्यानें प्रत्येकवेळीं त्याचा मळ निघून गेल्यानें शेवटीं तें इतकें निर्मल होतें कीं, त्यांच्यात मळ लवमात्रही आपल्याला दिसून येत नाहीं; याचप्रमाणें कषायांचा जसजसा नाश होतो तसतसें आत्म्याचें शुद्ध स्वरूप प्रगट होत जातें. जसें पाण्याच्या प्रवाहानें प्रचंड अग्नि देखील नाहीसा होतो तद्वत् सम्यग्दर्शनादिकांच्या योगें कषायाचा अभाव होत असतो. व अशा रीतीनें ज्ञानावरणादि चार कर्मांचा अभाव होऊन केवलज्ञान उत्पन्न होत असतें.

**विशेष स्पष्टीकरणः**—आत्मतत्वाची सिद्धि मागल्या श्लोकांत केली आहे. आत्मा सर्वज्ञ होऊ शकत नाहीं असें मीमांसक व चार्वाक ह्मणतात. परंतु त्यांचें ह्मणणें योग्य नाहीं. प्रथमतः आत्मा सर्वज्ञ होऊ शकत नाहीं याबद्दल यांचे विचार वाचकापुढें ठेऊन तदनंतर त्या विचारांचें समर्पक उत्तर देऊन आह्मी आत्मा सर्वज्ञ होऊ शकतो हें सिद्ध करणार आहोत.

मीमांसक असें ह्मणतात कीं, जगांत कोणताही आत्मा सर्वज्ञ हो-

ण्यास अयोग्य आहे. कारण त्यास परमाणूंचे व फार दूरच्या पदार्थांचें, पूर्वी होऊन गेलेल्या रामरावण वगैरे व्यक्तींचें प्रत्यक्षज्ञान होत नाहीं, गिधाडाला लांबचा पदार्थ दिसतो, डुकराला लांबचा ध्वनि ऐकता येतो. मुंगीला लांबच्या पदार्थांचें ज्ञान नाकानें होतें. तथापि यांना देखील अतिशय लांबच्या पदार्थांचें ज्ञान होत नाहीं. मनुष्य हा बुद्धिमान् प्राणी आहे, व मनुष्य जातीमध्यें एकापेक्षां दुसरा अधिक बुद्धिमान्, त्याहीपेक्षां तिसरा अधिक बुद्धिमान असें दिसून येतें. याप्रमाणें बुद्धीचा पूर्ण विकास ज्याच्या ठिकाणीं झाला आहे असा मनुष्य सर्व पदार्थांना जाणूं शकेल हें ह्मणणें योग्य नाहीं. मनुष्याच्या बुद्धिमध्यें तरतमभाव आढळून येईल परंतु तो सर्वज्ञ होऊ शकेल हें ह्मणणें जुळत नाहीं; कारण कोणत्याही मनुष्यास अतींद्रिय पदार्थाचें ज्ञान झालें आहे असें आपण पाहिलें नाहीं. जगामध्यें इंद्रियज्ञानालाच प्रत्यक्ष ह्मणतात व तें ज्ञान मर्यादितच असणार व त्या ज्ञानाची तरतमता आपल्या मर्यादेपर्यंत दिसून येतें. कारण प्रत्येक इंद्रियापासून जें ज्ञान होतें तेंही मर्यादितच असतें. आपली मर्यादा तें केव्हांही उल्लंघित नाहीं. आपणांस डोळ्यानें पाहतां येतें परंतु डोळ्यानें ऐकतां येत नाहीं. अर्थात् डोळ्यानें आपली मर्यादा उल्लंघिली नाहीं हें सिद्ध होतें. जर डोळा जसा पाहतो तसेंच त्याला ऐकूंही येतें असें मानलें तर निरनिराळ्या विषयांचें ज्ञान होण्यासाठीं आपणांस या पांच इंद्रियांची जरूरत पडणार नाहीं. कोणत्याही एका इंद्रियानें सर्व विषयांचें ज्ञान होऊ शकेल. परंतु वस्तुस्थिति अशी दिसत नाहीं. यावरून इंद्रियामध्यें आपआपल्या विषयास जाणण्याचेंच सामर्थ्य असतें व तें सामर्थ्य मर्यादित असतें हें सिद्ध होतें. एखादा मनुष्य जसा शास्त्रांतील सूक्ष्म विषयांची माहिती सांगणारा आढळून येतो तसेंच तो अतींद्रिय पदार्थांना देखील प्रत्यक्षपणें जाणण्यास कां समर्थ होणार नाहीं, कारण ज्ञान एवढेंच असतें याहीपेक्षां जास्ती तें असत नाहीं अशी मर्यादा बांधतां येत नाहीं; असें कित्येक ह्मणतील परंतु हें त्यांचें



ह्मणणें योग्य वाटत नाहीं.

कोणत्याही विषयाचें ज्ञान घ्या. तें आपला विषय सोडून इतर विषयांस ग्रहण करीत नाहीं असाच जगाचा आतांपर्यंतचा अनुभव आहे. जें ज्ञान ज्या पदार्थांना जाणतें तें त्या पदार्थांना कमीजास्ती प्रमाणानें जाणूं शकेल परंतु सर्व पदार्थांना तें जाणण्यास असमर्थ आहे. जसें एखादा मनुष्य व्याकरण फार उत्तम जाणीत आहे. ह्मणून त्यास नक्षत्रांच्या उदयास्तांचें ज्ञान, तिथींचें ज्ञान व ग्रहणाचें ज्ञानही आहे -तो ज्योतिषही उत्तम जाणतो असें ह्मणणें चुकीचें आहे. कारण तो इतर व्याकरणज्ञांना आपल्या व्याकरणाच्या अगाध ज्ञानानें मागें टाकूं शकेल परंतु ज्योतिर्विद्येमध्यें नैपुण्य मिळविलेल्या विद्वानांना तो मागें टाकूं शकणार नाहीं. तसेंच एखाद्या मनुष्यानें लांब उडी मारण्याचा सतत अभ्यास चालू ठेवला तर तो कांहीं दिवसांनीं १० हात किंवा १२ हात उडी मारूं शकेल. परंतु त्यानें कितीही प्रयत्न केला तथापि हजारों हाताच्या अंतरावर त्याला उडी मारता येणार नाहीं. यावरून मनुष्य एखाद्या विषयांत निष्णांत असूं शकेल परंतु सर्व विषयांचें ज्ञान त्याला असूं शकणार नाहीं. यावरून जगांत सर्वज्ञ कोणी होऊं शकत नाहीं. असें सिद्ध होतें. सर्वज्ञपणा मनुष्यास प्राप्त होतो असें जरी क्षणभर मानलें तरी त्या मानण्यामध्यें बरेच दोष आढळून येतील. पहिला दोष असा कीं सर्वज्ञानें पहिल्या क्षणींच जगांतील सर्व पदार्थ जाणले; दुसऱ्याक्षणीं त्यास जाणण्यास कांहीं राहिलें नसल्यामुळें तो अज्ञानी होईल. सर्वज्ञ सर्व पदार्थांना जाणतो किंवा मुख्य मुख्य पदार्थांना जाणतो ? तो एकदम जाणतो किंवा क्रमाक्रमानें जाणतो ? क्रमानें पदार्थांना तो जाणूं लागल्यास पदार्थ अनंत असल्यामुळें पुष्कळ काळ लोटला तरी सर्व पदार्थांचें ज्ञान त्याला होणार नाहीं व तो अज्ञच राहणार. एकदम सर्व पदार्थांनाही तो जाणूं शकत नाहीं कारण असें पहा कीं परस्पर विरुद्ध असें शीत उष्ण वगैरे पदार्थांचें

स्वरूप एका ज्ञानामध्यें झळकणें असंभवनीय आहे. एका ज्ञानामध्यें या विरुद्ध पदार्थांचा भास होतो असें मानलें तर प्रत्येक पदार्थांचें स्वरूप भिन्न आहे असा जो अनुभव येतो तो आला नसता. सर्वज्ञ हा सर्व पदार्थांचा जाणता असल्यानें इतर जीवांच्या ठिकाणीं असलेल्या रागद्वेष मोह इत्यादि विकारांचा त्याला साक्षात्कार होईल. व असें झाल्यानें सर्वज्ञ देखील रागादि विकारानें भरलेला आहे असें ह्मणावयास कोणती हरकत आहे ? कांहीं ठळक ठळक पदार्थांना तो जाणतो ह्मणून त्यास सर्वज्ञ ह्मणत असाल तरी देखील अमुक पदार्थ ठळक अर्थात् मुख्य आहेत व अमुक पदार्थ तुच्छ आहेत असें दोन्हीं तऱ्हेचें त्याला ज्ञान असेल तरच तो सर्वज्ञ आहे असें ह्मणता येईल. परंतु असें ज्ञान कोणाला नसतें हें आह्मीं मागें सिद्ध केलेंच आहे.

सर्वज्ञ भूतकालीन पदार्थ व भविष्यत्कालीन पदार्थांना कसें जाणू शकेल. व जरी त्यानें जाणलें तथापि त्याचे ज्ञान खरें आहे असें ह्मणतां येणार नाहीं. कारण ते पदार्थ सध्या नसल्यामुळें असत् आहेत व त्यांना यानें जाणल्यामुळें याच्या ज्ञानांत प्रामाणिकपणा कोठून येणार ? जसें ज्याला तैमिरिक रोग झाला आहे अशा मनुष्यास आकाशांत एक चंद्र असला तरी त्यास दोन दिसतात. व तें त्याचें ज्ञान खरें नव्हे. तद्वत् सर्वज्ञाचें भूतभविष्यत्कालीन पदार्थांचें ज्ञान अप्रमाण आहे. जसें वर्तमानकालीन पदार्थ आहेत ह्मणून आपणांस त्याचें ज्ञान होतें याचप्रमाणें तेही पदार्थ आहेत असें मानल्यास वर्तमानकालीन पदार्थ व भूतभविष्यत्कालीन पदार्थ यामध्यें काय अंतर राहिलें ? व वर्तमानकालीन पदार्थांप्रमाणेंच त्यांनाही तसेंच सर्वज्ञानें जाणल्यास त्याचें ज्ञान खरें आहे असें मानणें चुकीचें होईल. इत्यादि अनेक दोष उत्पन्न होतात यास्तव सर्वज्ञ कोणी नाहीं हें सिद्ध होतें.

मीमांसकांनीं याप्रमाणें बरीच प्रमाणें देऊन सर्वज्ञ कोणास होता येत नाहीं असा आपला पक्ष सिद्ध केला. परंतु त्याचें ह्मणणें योग्य



नाहीं व सर्वज्ञ मनुष्यांस होता येतें हें आतां आह्मीं त्याच्या पक्षाचें खंडन करून सिद्ध करणार आहोत.

प्रथम मीमांसकांनीं प्रत्यक्षरूपानें पाप, पुण्य, परमाणु इत्यादि अतींद्रिय पदार्थांचें ज्ञान होत नाहीं असें ह्मटलें आहे. येथें त्यास आह्मी असें विचारू शकतो कीं आपण प्रत्यक्षाचें लक्षण काय करता ? इंद्रियापासून जें ज्ञान होतें तें प्रत्यक्ष ह्मणत असाल तर आह्मी ज्याला प्रत्यक्ष समजतो तें याहून भिन्न आहे, व तें प्रत्यक्ष ज्ञान धर्मादि सूक्ष्म पदार्थांना जाणतें. जें इंद्रियप्रत्यक्ष आहे तें धर्मादि सूक्ष्म पदार्थांचा निश्चय करू शकणार नाहीं परंतु याच्या उलट असलेलें व सर्व पदार्थांना स्पष्ट जाणणारें जिनेश्वराचें प्रत्यक्ष ज्ञान धर्म अधर्म, परमाणु, रामरावण वगैरे पदार्थांना जाणतें. जरी इंद्रियज्ञान व अतींद्रिय ज्ञान यांचें वर्णन ‘ प्रत्यक्ष ’ या शब्दानें करता येते व शब्दसाम्य येथें दिसून येतें तथापि इंद्रियज्ञान असा अर्थ ज्याचा होतो तो प्रत्यक्ष शब्द व अतींद्रिय ज्ञान असा अर्थ ज्याचा होतो तो प्रत्यक्ष शब्द हे वेगळाले आहेत असें समजावें. जसे गोशब्द अनेक आहेत व त्या शब्दांचें अनेक अर्थ आहेत. वाणी-भाषेला गो असा शब्द आहे व गाईलाही गो ह्मणतात. जसें गो शब्दसाम्य दिसतें तसेंच वर देखील समजावें. जर गोशब्द हा एकच असतां तर त्याचें अनेक अर्थ झाले नसते. एका शब्दाचा एकच अर्थ असतो. यावरून ‘प्रत्यक्ष ’ शब्द दोन प्रकारचा आहे व तो अर्थभेदामुळें भिन्न आहे हें सिद्ध होतें. अतींद्रिय ज्ञान असा ज्या प्रत्यक्ष-शब्दाचा अर्थ होतो त्या शब्दाची निरुक्ति अशी आहे. ‘ अक्ष्णोति व्याप्नोति जानातीत्यक्ष आत्मा, तमेव प्रतिगतं ’ अक्ष धातूपासून अक्ष असा शब्द बनला आहे. अक्ष धातूचा अर्थ व्यापणें, जाणणें. असा आहे. अर्थात् जो जाणतो, व्यापतो तो अक्ष-आत्मा होय. आत्मा सर्व पदार्थांना जाणतो ह्मणून त्यास अक्ष असें ह्मणतात. तो सर्व पदार्थांना व्यापतो

म्हणजे आत्मा व्यापक आहे असें मात्र समजू नये. कारण संसारी आत्म्याला जसें लहान मोठें शरीर मिळतें तेवढ्या प्रमाणाचा तो होऊन राहतो व मुक्त जीवाचा आकार ज्या शरीरानें त्यानें मोक्षप्राप्ति करून घेतली त्या शरीरापेक्षा कांहीं कमी प्रमाणाचा असतो यावरून तो व्यापक नाहीं तर मग सर्व पदार्थांना आत्मा व्यापून टाकतो या म्हणण्याचा अर्थ काय असा प्रश्न आपल्या मनामध्यें उठेल त्याचें उत्तर असें आहे कीं आत्म्यामध्यें संपूर्ण पदार्थांना जाणण्याची शक्ति आहे व या दृष्टीनें आपण आत्म्यास व्यापक म्हटलें असतां कांहीं हरकत नाहीं. आत्म्याचें ज्ञान व्यापक आहे म्हणजे तें सर्व पदार्थांकडे जात नाहीं परंतु तें आत्म्यामध्येंच राहून सर्व पदार्थांना जाणतें म्हणून व्यापक म्हटलें आहे. जसें डोळा आपल्या ठिकाणींच राहून पदार्थांचें स्वरूप जाणतें तो पदार्थांना जाणण्यासाठीं जेथें पदार्थ असतात तेथें जात नाहीं यांचप्रमाणें आत्म्यामध्येंच ज्ञान राहून तें सर्व पदार्थांना जाणथें तथापि त्यास व्यापक म्हटल्यास कांहीं दोष नाहीं. व्यापक व ज्ञाता अशा आत्म्याचा ज्यानें आश्रय केला आहे अशा ज्ञानाला प्रत्यक्ष प्रमाण म्हणतात असें येथें समजलें पाहिजे वास्तव अशा तऱ्हेचें ज्ञान अरहन्ताचें आहे यालाच मुख्य प्रत्यक्ष असें म्हणतात. या प्रत्यक्ष ज्ञानाच्या तडाख्यांतून एकही पदार्थ सुटत नाहीं. संपूर्ण पदार्थ व त्यांचें गुण आणि पर्याय या सर्वांना हें जाणतें. परंतु आमचें इंद्रियप्रत्यक्ष ज्ञान सर्व पदार्थांना जाणत नाहीं यामुळें त्यास ' मुख्य प्रत्यक्ष ' या शब्दानें संबोधिता येत नाहीं. अरहन्ताचें ज्ञान संपूर्ण पदार्थांना एकदम जाणतें म्हणून त्या ज्ञानांत क्रम नाहीं जें ज्ञान क्रमाक्रमानें पदार्थांना जाणतें त्यांत सर्व पदार्थांना जाणण्याची शक्ति नसते. अशा ज्ञानामध्यें जो क्रम दिसून येतो याचें कारण हें आहे कीं तें ज्ञान मन व इंद्रियें यांच्यापासून उत्पन्न होतें. त्यास परतंत्रता प्राप्त झाल्यामुळें तें पदार्थांना क्रमानें जाणतें. परंतु जेव्हां ही



परतंत्रता तें झुगारून देतें व आपलें खरें स्वरूप प्राप्त करून घेतें; त्यावेळेस तें क्रम सोडून एकदम सर्व पदार्थांना जाणतें. व असें स्वरूप जेव्हां प्राप्त होतें, तेव्हांच अरहंतावस्था आपल्यास प्राप्त झाली असें समजावें. ही अरहंतावस्था प्राप्त होण्यास मोहनीय, ज्ञानावरणीय, दर्शनावरणीय व वीर्यांतराय या कर्मांचा नाश झाला पाहिजे. या कर्मांच्यायोगें आमच्या ठिकाणीं मोह, अज्ञान, अदर्शन व अशक्तता—हीं प्राप्त झालीं आहेत. यामुळें आमच्या ज्ञानामध्यें अशा तऱ्हेचा मळकटपणा घुसल्यामुळें तें कमकुवत झालें आहे; म्हणून त्यास इंद्रियप्रत्यक्ष असें म्हणतात. अरहंतानें वर सांगितलेल्या कर्मांचा नाश करण्यासाठीं जीं साधनें गोळा केलीं होतीं; तीं साधनें या कर्मांहून भिन्न स्वभावाचीं होतीं, यामुळें या साधनांनीं अरहंतास या कर्मांचा सूड उगविता आला. जसें डोळ्यामध्यें एखादा रोग झाला असतां तो औषधानें आपणास घालवितां येतो. कारण, औषध हें त्या रोगाचा शत्रू आहे, त्या औषधाचा त्या रोगावर जसा जसा परिणाम होतो तसा तसा तो रोग तेथून निघण्याचा प्रयत्न करतो व जेव्हां पूर्ण रीतीनें औषधाचा त्याच्यावर अंमल बसतो तेव्हां त्या रोगाचा समूळ नाश होतो. याचप्रमाणें या चार कर्मांचा नाश होण्याला तशी नाशक सामग्री मिळाली म्हणजे हां हां म्हणतां यांचा नाश होतो. या कर्मांची आत्म्यामध्यें वाढ होण्याला मिथ्यादर्शन, मिथ्याज्ञान व मिथ्याचारित्र हीं कारणें होत. जसें ज्वरामध्यें दहीं सपाटून खाल्लें असतां श्लेष्मा फार वाढतो; तद्वत हीं साधनें या कर्मांना पुष्टीनजबुनी आगीत असतात. या मिथ्यादर्शनादि त्रयींचें प्रतिपक्षी सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र हे होत. यांची वाढ होऊं लागली म्हणजे या मिथ्यादर्शनादिकांचा ऱ्हास होऊं लागतो व जसें परमाणूपासून परिमाणाला आरंभ होऊन तें परिमाण आकाशामध्यें पूर्णपणाला पोहोचतें. तसेंच या रत्नत्रयांची वाढ होता होता तें पूर्ण दशेला पोहोचतें; जसजसी रत्नत्रयामध्यें वाढ होऊं

लागते तसतशी मिथ्यात्वादिकांची हानि होत जातें; व शेवटीं हीं पूर्ण नाश पावतात. रत्नत्रयाची वृद्धि झाली ह्मणजे मिथ्यादर्शनादि त्रयीचा नाश होतो व मिथ्यादर्शनादित्रयीचा नाश झाला ह्मणजे ज्ञानावरणादि चार घाति कर्मांचा नाश होतो व ज्ञानावरणादि चार घाति कर्मांचा नाश झाल्यामुळें या कर्मांच्या असण्यानें आत्म्यामध्यें मोह, अज्ञान, अदर्शन व अशक्तता हे जे दोष उत्पन्न होत असत, यांचाही नाश होतो. अरहंत या कर्मांचा अशा रीतीनें नाश करून मुख्य प्रत्यक्ष ज्ञानाची प्राप्ति करून घेतात. यामुळें त्यांना धर्मादि सूक्ष्म पदार्थांचें ज्ञान होतें, व ते सर्वज्ञ होतात. मुख्य प्रत्यक्षज्ञान अमर्याद आहे व इंद्रियजन्य ज्ञान मर्यादित आहे यामुळें मीमांसकांनीं इंद्रियजन्य ज्ञानानें धर्मादि सूक्ष्म पदार्थांचें ज्ञान होत नाहीं असें जें ह्मटलें तें योग्यच आहे. त्यांचें हें ह्मणणें आह्मीही कबूल करतो; परंतु सर्वज्ञ कोणीही होऊं शकत नाहीं, असें ह्मणणें मात्र अयोग्य आहे असें या विवेचनावरून सिद्ध होतें.

सर्वज्ञ क्रमानें पदार्थ जाणतो असें मानल्यास त्याला सर्व पदार्थांचें ज्ञान होणार नाहीं, असें आपण ह्मणतां तें आह्मांस मान्य आहे. आह्मीं सर्वज्ञ एकदम सर्व पदार्थांना जाणतो असेंच ह्मणतो. सूर्यामध्यें सर्व पदार्थ प्रकाशित करण्याचा धर्म आहे तद्वत् सर्वज्ञाचें ज्ञान संपूर्ण पदार्थांना एकदम जाणीत असतें.

परस्पर विरुद्ध पदार्थांचें एकदम ज्ञान होणें अशक्य आहे हें ह्मणणें अयोग्य आहे. परस्पर विरुद्ध अंधार व प्रकाश या दोन पदार्थांचा अनुभव एकदम येऊं शकतो. परस्परविरुद्ध पदार्थ देखील कोठें कोठें एकत्र रहात असलेलें आढळून येतात. दुपारतीच्या वरच्या भागामध्यें उष्णता व खालच्या भागांत थंडी असते; हें विरुद्ध पदार्थ एके ठिकाणीं जसें आढळून येतात; याचप्रमाणें ज्ञानामध्येंही अशा विरुद्ध पदार्थांचा अनुभव येण्यास कोणती अडचण आहे. तसेंच अशा विरुद्ध पदार्थांचें स्वरूप ज्ञानामध्यें स्पष्ट दिसतें व त्यांचें गुणधर्म हेही वेगळे आहेत असा



अनुभव येतो. वस्तुव्यवस्थेंत कांहीं हरकत उत्पन्न होत नाहीं.

पहिल्या क्षणींच सर्व पदार्थांना जाणल्यावर सर्वज्ञास दुसऱ्या क्षणीं जाणण्यास पदार्थ न उरल्यामुळें तो अज्ञ होईल असें ह्मणणें अयोग्य आहे. जर दुसऱ्या क्षणीं पदार्थांचा नाश किंवा ज्ञानाचा नाश होईल तर त्यास अज्ञ ह्मणण्यास हरकत नव्हती; परन्तु सर्वज्ञाचें ज्ञानही अनन्त आहे व पदार्थही अनन्त आहेत यामुळें सर्वज्ञाच्याठिकाणीं अज्ञानपणाचा वास होऊं शकत नाहीं.

पुढें उत्पन्न होणाऱ्या पदार्थांना सर्वज्ञानें हे पदार्थ उत्पन्न होणार आहेत अशा रीतीनें जाणलें. हे पदार्थ उत्पन्न झाले किंवा उत्पन्न होत आहेत अशा रीतीनें त्यानें जाणलें नाहीं. जे पदार्थ उत्पन्न होऊन चुकले त्या पदार्थांना हे पदार्थ उत्पन्न होऊन चुकलें असेंच जाणलें, भूतकालीन पदार्थांना उत्पन्न होतील अशा रीतीनें त्यानें जाणले नाहीं. ज्यावेळेस जी वस्तु ज्या गुण धर्मानें युक्त आहे, त्यावेळेस ती वस्तु सर्वज्ञाच्या ज्ञानामध्यें तशीच प्रतिबिंबित झाली आहे. यामुळें सर्वज्ञाच्या ठिकाणीं अज्ञता येऊं पहात नाहीं हें सिद्ध होतें. जी वस्तु जशी आहे ती वस्तु तशीच जाणली गेली नसती तर सर्वज्ञाचें ज्ञान भ्रांत, संशय युक्त आहे असे आपण ह्मणूं शकलों असतो. व सर्वज्ञाच्या ज्ञानाला अप्रामाण्य आलें असतें.

सर्वज्ञाला सर्व पदार्थांचा साक्षात्कार होत असल्यामुळें अपवित्र पदार्थांतील रसाचा स्वादही त्याला येत असेल व त्या पदार्थांतील दुर्गंध देखील त्याच्याकडून हुंगला जात असेल. यामुळें असले पदार्थ खाण्याचा त्याला दोष लागणार, अग्नि वगैरे उष्ण पदार्थांच्या साक्षात्करणानें त्याला दाह उत्पन्न होत असेल. व सुंदर पदार्थांच्या अनुभवानें ते पदार्थ सतत भोगण्याची अभिलाषाही होत असेल. वाईट पदार्थांच्या अनुभवानें द्वेष व भयानक पदार्थांच्या ज्ञानानें भीति उत्पन्न होऊन तो मूर्च्छित होऊन पडणेंहि संभवनीय आहे. अशा तऱ्हेचे

दोष सर्वज्ञ मानला असतां उत्पन्न होतील असें ह्मणणेंही योग्य नाहीं.

जर अपवित्र पदार्थांच्या रसाचा व गंधाचा संबंध जिव्हा व नाक या इंद्रियांशीं होईल तर खाणें व हुंगणें यांच्यायोगें दोष उत्पन्न होईल. अग्नीसारख्या उष्ण पदार्थांचा स्पर्श झाला तर स्पर्शनेंद्रियामध्यें दाह उत्पन्न होईल. परंतु रूप जसें आपल्या लांबूनच दिसतें याच-प्रमाणें रस, गंध, स्पर्श यांचें ज्ञान सर्वज्ञाला अतींद्रिय ज्ञानानें होतें. यामुळें वर सांगितलेल्या दोषापासून तो अलिप्त राहिला आहे.

तसेंच अनुकूल प्रतिकूल भयानक वगैरे पदार्थांच्या साक्षात्कारानें सर्वज्ञाच्या ठिकाणीं सुख, दुःख, द्वेष, अभिलाष मोह वगैरे विकार उ-त्पन्न होतील हें ह्मणणेंहि शोभत नाहीं; केवळ पदार्थांचा अनुभव हा सुख, दुःख, द्वेष, मोह वगैरे विकार उत्पन्न करण्यास असमर्थ आहे. हे विकार उत्पन्न करण्यास पदार्थांचा अनुभव कारण मानला तर एका पुरुषास एखाद्या पदार्थापासून सुख, दुःख, अभिलाषा द्वेष वगैरे विकार उत्पन्न होतात, तसेच सर्व पुरुषांना तेच विकार उत्पन्न व्हा-वयाला पाहिजेत परंतु असें दिसून येत नाहीं. एका स्त्रीविषयीं एका मनुष्याच्या मनामध्यें अनुराग उत्पन्न होतो व दुसऱ्याला ती डोळ्या-पुढें उभी राहूं नये असें वाटतें. तिचा तो द्वेष करतो. उंटाला निंबाची पानें खावीशीं वाटतात व आह्मास निंबाचीं पानें खाल्यानें कसेसेंच होतें सुंठीमध्यें उत्पन्न झालेल्या किड्याला सुंटीचा रस प्रिय होतो व तो रस आह्मांस अप्रिय वाटतो. चंदनाचा सुगंध आह्मांला प्रिय वा-टतो परंतु माश्या, डांस यांना तो अप्रिय होतो. भित्र्या मनुष्याला भयानक रूप दिसलें की भयानें त्याची गाळण उडते परंतु धीर म-नुष्यावर त्या भीतीचा कांहींच परिणाम होत नाहीं. निर्दयी मनुष्याला प्राणिहिंसा होत असलेली पाहून आनंद होतो व दयार्द्र मनुष्याच्या अंगावर शहारे येतात; त्याचें कोमल अंतःकरण दयेनें ओलें चिंब होतें. एका मनुष्याचा उत्कर्ष होत असलेला पाहून दुसऱ्याचें पोट दुखत



असतें. तिसऱ्यास आनंदाच्या उकळ्या फुटत असतात व चौथा बिल-कुल उदासीन असतो. या सर्व उदाहरणावरून केवळ पदार्थांचा अनु-भव हा सुखदुःख द्वेष मोह इत्यादि विकार उत्पन्न करण्यास कारण नाहीं. हे सर्व विकार मोहनीय कर्मांच्या उदयानें जीवांच्या ठिकाणीं होत असतात. परन्तु श्रीसर्वज्ञ जिनेश्वरानें या कर्म शत्रूला मातीचे दिवे खावयास लावल्यामुळें हे विकार त्याच्यामध्यें बिलकुल नाहींत; यास्तव जिनेश्वर सर्व पदार्थांना जाणून देखील उदासीनच असतात. आह्मांस पदार्थांचें जें ज्ञान होतें तें या वरच्या विकारांनीं मिसळलेलें असतें; तस-लेंच ज्ञान जिनेश्वरासही होतें हें ह्मणणें चुकीचें आहे.

भूतकालीन व भविष्यत्कालीन पदार्थांचें ज्ञान सर्वज्ञाला होऊं शक-णार नाहीं व झालें तरी तें प्रमाण मानतां येणार नाहीं; कारण ते पदार्थ सध्या नसल्यामुळें त्या पदार्थांचें ज्ञान मिथ्या समजलें जाईल. हें ह्मणणें योग्य दिसत नाहीं.

भूतकालीन व भविष्यत्कालीन पदार्थ आपआपल्या कालांत अस-तातच. वर्तमानकालीन वस्तु सध्या जशी असते तद्वत भूतभविष्यत्कालीन वस्तु त्या कालीं होत्या व असतील. वर्तमानकालीं त्या वस्तु नाहींत ह्मणून त्यांचा अभाव मानीत असाल तर तें आह्मीही कबूल करतोच. अतीत पदार्थांचें व भविष्यत्कालाच्या पदार्थांचें सध्या अस्तित्व नाहीं. असें असतां सर्वज्ञ त्या पदार्थांना कसें जाणतो ? याचे उत्तर असें आहे कीं, आपण सर्व जगांतील धूर व अग्नि यांच्यामध्यें कार्यकारण संबंध आहे असें एके ठिकाणीं आपण धूर व अग्नि यांना पाहून ह्मणतो आपण जगांत जितके धूर व अग्नि आहेत ते सर्व पाहिले आहेत काय ? पाहिले नसूनही आपण सर्व धूर व अग्नि यांचा व्याप्तिज्ञानानें निश्चय करतो. व तो अगदीं खरा आहे, याचप्रमाणें येथेंही समजावें; व सर्वज्ञाचें ज्ञान प्रमाण आहे असें मानावें, न मानल्यास तुमचें व्याप्तिज्ञानही खोटें ठरेल.

इत्यादि युक्तींनीं जिनेश्वर हे सर्वज्ञ आहेत हें सिद्ध होतें व जिने-

श्वरानें सर्वज्ञ होण्याचा जो मार्ग स्वीकारिला त्या मार्गानें आपण गेल्यास आपणास ही सर्वज्ञता प्राप्त होणें कठिण नाहीं. याप्रमाणें मीमांसकाच्या मताचें खण्डन करून जैन मतानें सर्वज्ञाची सिद्धि कशी करतां येते हें दाखविलें.

सर्वज्ञतेची प्राप्ति होणें अतिशय कठिण आहे असें असतां
श्री जिनेंद्रास हें सर्वज्ञपद कसें प्राप्त झालें या शंकेचें
निराकरण आचार्य या श्लोकांत करतात.

**अशेषविदिहेक्ष्यते सदसदात्मसामान्यवित्**
**जिन ! प्रकृतिमानुषोऽपि किमुताखिलज्ञानवान् ॥**
**कदाचिदिह कस्यचित्क्वचिदपेतरागादिता ।**
**स्फुटं समुपलभ्यते किमुत ते व्यपेतैनसः ॥१९॥**

**अर्थः**— हे जिनेश ! पदार्थांतील सत् असत् धर्माचें ज्याला ज्ञान झालें आहे अशा साधारण मनुष्यास देखील लोक सर्वज्ञ ह्मणतात. आपण तर सर्व जगताला स्पष्टपणें जाणता मग आपण सर्वज्ञ कां होणार नाहीं अर्थात् आपण निःसंशय सर्वज्ञ आहात.

एखाद्या मनुष्याच्या ठिकाणी एखाद्या विषयांत उपेक्षा दिसून येते, तो एकाद्या पदार्थाबद्दल रागद्वेष रहित असतो. असें दिसून येते. याचें कारण त्या मनुष्याचे कषाय मंद झालेले असतात. असे जर आहे तर श्रीजिनेशांनीं तर कषायाचा पूर्ण नाश केला आहे व ते निष्पाप आहेत यावरून त्यांच्या ठिकाणीं रागद्वेष बिलकुल नाहींत व सर्व पदार्थांमध्यें पूर्ण उपेक्षा ते धारण करितात.

तात्पर्य — सर्व मनुष्य रागद्वेषानें भरले आहेत व कोणी सर्वज्ञ नाहींत असें कित्येकांचें ह्मणणें आहे त्यांना या श्लोकांत आचार्यांनीं उत्तर दिलें आहे. विशेष जाणत्या मनुष्यालाहि लोक सर्वज्ञ असें ह्मणतात तेव्हां ज्यांच्या ठिकाणीं ज्ञानगुण पूर्ण विकसित झाला आहे अशा जिनेशाला सर्वज्ञ समजणें अगदीं उचित आहे. तसेंच कित्येक माण-



सांच्या ठिकाणीं उदासीनताहि दिसून येते कषायांचा पूर्ण निःपात जिनेशानें केला आहे यावरून तेच पूर्ण वीतराग आहेत हें सिद्ध होतें.

श्रीजिनेश सर्वज्ञ आहेत हें आह्मी कसें ओळखावें याचे उत्तर
हें आहे कीं, त्यांचें वक्तृत्व युक्ति व आगम यांना विरोध
आणणारें नाहीं; व हेंच सर्वज्ञपणाचें चिन्ह आहे;
असें आचार्य या श्लोकांत सांगतात.

**अशेषपुरुषादितत्वगतदेशनाकौशलं ।**
**त्वदन्यपुरुषान्तरानुचितमाप्ततालाञ्छनम् ॥**
**कणादकपिलाक्षपादमुनिशाक्यपुत्रोक्तयः**
**स्खलन्ति हि सुचक्षुरादिपरिनिश्चितार्थेष्वपि ॥**

**अर्थः**-संपूर्ण जीवादि पदार्थांचें वर्णन करण्याचें चातुर्य हे जिनेश आपल्यामध्यें जसें दिसून येतें तसें अन्य ईश्वर, कपिल, जैमिनि वगैरे मध्यें बिलकुल दिसून येत नाही यास्तव हे जिनेश आपणास आप्त ह्मणणें योग्य आहे. आपणासच आप्त हें नांव शोभतें. इतरांना आप्त ह्मणणें योग्य नाहीं कारण त्यांनीं आप्त या शब्दाला कलंकित केलें आहे. कणाद, कपिल, अक्षपाद व बुद्ध यांचीं वचनें अप्रमाण आहेत. कारण इंद्रियांनीं ज्या पदार्थांचा निश्चय करतां येतो अशाही पदार्थांचें वर्णन त्यांना निर्दोषपणें करता आलें नाहीं मग अतीन्द्रिय पदार्थांचें वर्णन ते निर्दोषपणें कसचें करूं शकतील. यास्तव त्यांची वचनें अप्रमाण आहेत ह्मणून ते आप्त नव्हेत.

आतां येथून ईश्वर, कपिल, बुद्ध इत्यादिकांचीं वचनें असत्य कशी आहेत हें आचार्य दाखविणार आहेत. प्रथमतः आत्म तत्वाची कल्पना यांच्या मतें कशी आहे हें सांगून त्याच्यांतील दोष आचार्य या श्लोकांत दाखवितात.

**परैरपरिणामकः पुरुष इष्यते सर्वथा**
**प्रमाणविषयादितत्वपरिलोपनं स्यात्ततः ॥**

कषायविरहान्नचास्य विनिबन्धनं कर्मभिः ॥
कुतश्च परिनिर्वृतिः क्षणिक रूपतायां तथा ॥२१ ॥

अर्थः—वैशेषिक, नैयायिक सांख्य इत्यादिकांनीं आत्मतत्व सर्वथा नित्य मानलें आहे. यामुळें त्या आत्मतत्वांत कोणताही विकार उत्पन्न होत नसल्यामुळें जें त्याचें स्वरूप आहे त्यामध्यें केव्हांही बदल होणें शक्य नाहीं. व तें आत्मतत्व प्रमाण रूप किंवा प्रमेय रूप होऊं शकणार नाहीं. तसेंच आत्मतत्व सर्वथा नित्य मानल्यामुळें त्यामध्यें कषाय उत्पन्न होणार नाहींत. आणि कषायांच्या अभावीं कर्मांचा संबंध तरी या आत्मतत्वाशी कसा होणार. व कर्मांचा सम्बन्ध न झाल्यामुळें आत्म्यास मोक्ष प्राप्ति होणार नाहीं. आत्मतत्त्व नित्य मानल्यामुळें हे दोष उत्पन्न होतात यास्तव आत्मा जर सर्वथा अनित्यही मानला तरी हेच दोष येतात.

**विशेष स्पष्टी करण**—आत्मा सर्वथा नित्य मानल्यास आत्म्यामध्यें अनेक तऱ्हेचें भिन्न भिन्न परिणमन होणार नाहीं. जो आत्मा ज्या अवस्थेंत आहे तो हमेशा त्याच अवस्थेंत राहील. व दुसरी अवस्था त्याला प्राप्त झाल्यास त्याच्यांत परिणमन झालें असें ह्मणावें लागेल व त्याचा नित्यपणा नष्ट होईल. व सर्वथा नित्य मानल्यास एकही क्रिया तो करूं शकणार नाहीं. पाप, पुण्य, जन्म मरण, बन्ध, मोक्ष या क्रिया बिलकुल होणार नाहींत. तसेंच आत्मा प्रमाता व प्रमेयही होणार नाहीं. तो एखाद्या पदार्थास जाणण्याचा प्रयत्न जेव्हां करील त्यावेळींच त्याला प्रमाता ह्मणता येईल; त्याच्या पूर्वी तो अप्रमाता होता हें सिद्ध होतें. यास्तव अप्रमातृत्व स्वभाव सोडून जर तो प्रमाता होईल तर त्याला नित्य कसें ह्मणावें. जर तो सर्वथा प्रमाताच राहील तर तो प्रमेय केव्हांहीं होणार नाहीं प्रमेय ह्मणजे जाणण्याला योग्य अशी वस्तु आत्म्याचें स्वरूप दुसऱ्या आत्म्याकडून जर जाणलें गेलें नाहीं तर पहिला आत्मा प्रमेय धर्माला धारण करीत नाहीं असें होईल. परन्तु सर्वथा



आत्मा हा दुसऱ्या आत्म्याकडून जाणला जातो यास्तव तो प्रमेय आहे अर्थात् तो जसा प्रमाता आहे तसाच तो प्रमेय ही आहे परंतु सर्वथ आत्मा नित्य मानला तर एकदा तो प्रमाता व एकेवेळीं तो प्रमेय असा बदल होणार नाहीं; यास्तव आत्मतत्व सर्वथा नित्य मानणें चुकीचें आहे. कदाचित् आत्मा नित्य मानल्यानें हे दोष उत्पन्न होतात ह्मणून अनित्य पक्षाचा स्वीकार केला तर तो पक्षही सदोषच आहे. कारण सर्वथा अनित्य आत्मा मानावा लागल्यानें देखील पुण्य, पाप, बन्ध, मोक्ष इहलोक परलोक यांची सिद्धि होणार नाहीं. ज्यानें पुण्य केलें असा आत्मा नष्ट झाल्यावर त्या पुण्याचें फल कोणास मिळणार? ज्यानें पातक केलें त्याचा नाश झाल्यावर पातकापासून उत्पन्न होणाऱ्या नरकादिगतींत कोण जाणार? जर आत्मा सर्वथा क्षणिक मानला तर इहलोक व परलोक याचीही कल्पना जुळणार नाहीं.

कारण पुनर्जन्म मानल्यानें इहपरलोकाची कल्पना अवश्य मानावी लागते. व सर्वथा आत्मा अनित्य मानल्यानें पुनर्जन्माची सिद्धि करता येणे अशक्य आहे. यामुळें इहपरलोक मानणें हें वेडेपणाचें होईल. तसेंच जो पदार्थ मी काल पाहिला तोच आज मी पुनः पहात आहे असें जें ज्ञान आह्मांस नित्य होतें तें झालें नसतें. कारण आत्मा क्षणिक असल्यानें त्याला असें जोडरूप ज्ञान झालें नसतें तसेंच मागल्या गोष्टींचें स्मरण झालें नसतें. यास्तव आत्मा सर्वथा क्षणिक आहे असें मानूं नये. नित्य पक्षाप्रमाणें अनित्य पक्षही सदोष आहे हें सिद्ध झाल्यावर आत्मतत्व कथंचित् नित्य आहे व कथंचित् अनित्य आहे असें मानणें अवश्य प्राप्त होतें. कारण आचार्यांनीं एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे ' सर्वं स्यादविरुद्धं तत्पूर्वं तद्विना विरुद्धं स्यात् ' सर्वथा शब्दाचा त्याग करून कथंचित् शब्दानें वस्तूच्या स्वभावांचें वर्णन केल्यास कोणताहि दोष येत नाहीं व कथंचित् शब्दास सोडून सर्वथा शब्दाचा आश्रय घेतला तर आपण केलेलें वस्तुचें वर्णन पदोपदीं

सदोष आहे असें आढळून येईल. यावरून आत्मा कथंचित् नित्यानित्यात्मक मानणें योग्य आहे, हें ठरतें.

आतां आचार्य सांख्य मतांत आत्म्याचें स्वरूप कसें मानतात
हें दाखवून तें मत सदोष आहे हें सिद्ध करतात.

मनो विपरिणामकं यदिह संसृतिं चाश्नुते ।
तदेव च विमुच्यते पुरुषकल्पना स्याद्वृथा ॥
न चास्य मनसो विकार उपपद्यते सर्वथा ।
श्रुतं तदिति हीष्यते जितविवादिता कोपिनी ॥२२॥

अर्थः—जर मन हें नाना विकारांना धारण करितें व संसारामध्यें त्यालाच नाना अवस्था धारण कराव्या लागतात व तेंच संसाराचा नाश करून मोक्षप्राप्ति करून घेतें; तर आत्मा मानण्याची आवश्यकताच राहिली नाहीं. मग सांख्यांनीं आत्मा व मन अशीं दोन तत्वें कां मानलीं. या दोन तत्वांपैकीं एक मन हेंच तत्व मानणें योग्य आहे व दुसरें आत्मतत्व त्यांनीं व्यर्थ मानिलें असें सिद्ध होतें. सांख्यांनीं मनालाच संसारावस्था प्राप्त होतें व तेंच मुक्त होतें असें मानलें परंतु तें मन नित्य आहे असें पुनः ते ह्मणतात. व सांख्यांनीं मनाला नित्य मानल्यामुळें संसार मोक्षाची प्रक्रिया ते संगतवार दाखविण्यास समर्थ होणार नाहींत. कारण मनाला सर्वथा नित्य मानल्यावर कोणताही विकार त्यांत होणें अशक्य आहे; यामुळें तें कर्मबंधनबद्धहि होऊं शकणार नाहीं व मुक्तहि होऊं शकणार नाहीं. बरें, मनालाच मोक्ष व संसार मानल्यास आत्म्याचा काय फायदा व काय नुकसान झालें. आत्मतत्व मानणें हें व्यर्थ आहे. वास्तव आत्म्यालाच संसार व मोक्ष हें मानिलें पाहिजेत. मनापासून आत्म्याची सुटका होणें ह्मणजे मोक्ष होय; व मनानें आत्मा बद्ध होणें ह्मणजे संसार होय असें यांनीं मानिलें ह्मणजे आत्मतत्वाची व्यर्थता दूर होईल. सांख्य ज्याला मन ह्मणतात त्यालाच आपण कर्म ह्मणूं शकतो. तसेंच त्यांनीं मनाला कथंचित् नित्य व अनित्य मानिलें



तरच आत्म्याची मनापासून सुटका होईल किंवा बन्ध होईल व आत्म्यासहि त्यांनीं कथंचित नित्यानित्य मानिलें पाहिजे; आणि असें झालें ह्मणजे पुण्य, पाप, बंध मोक्ष इहलोक परलोक वगैरे प्रक्रिया उत्तम रीतीनें जुळेल. अन्यथा ती कधींही जुळणार नाहीं. कदाचित एकदम सर्वथा नित्यहि मन आहे व सर्वथा अनित्यहि तें आहे असें मानणें बिलकुल विरुद्ध आहे. एकवेळेस सर्वथा नित्य व सर्वथा अनित्य मानणें हें जिचें लग्न झालें आहे अशा स्त्रीला कुमारी व सुवासिनीही मानण्याइतकें विरुद्ध आहे. वास्तव मन हें कथंचित् नित्यानित्यात्मक मानिलें पाहिजे.

आतां बुद्धाचा उपदेश परस्पर विरुद्ध कसा आहे हें या
श्लोकांत आचार्य दाखवितात.

पृथग्जनमनोनुकूलमपरैःकृतं शासनं ।
सुखेन सुखमाप्यते न तपसेत्यवश्येन्द्रियैः ॥
प्रतिक्षणविभंगुरं सकलसंस्कृतं चोच्यते ।
ननु स्वमतलोकलिंगपरोक्षविरोधव्याहतम् ॥ २३ ॥

अर्थः—रागद्वेषांनीं भरलेल्या लोकांचें अंतःकरणास पटेल असें शास्त्र बौद्धांनीं लिहिलें आहे ते ह्मणतात ‘ तपश्चरण, संयम, व्रतें हीं पाळल्यानें परलोकीं सुखाची प्राप्ति होत नाहीं. तपश्चरणादिकांपासून शरीराला व आत्म्याला फार कष्ट भोगावें लागतात. वास्तव या लोकीं सुखाचा यथेच्छ उपभोग घेतल्यानें परलोकीं सुख मिळतें; परंतु तप, संयमादिकांनीं हें मिळत नाहीं. असला हा उपदेश अज्ञ लोकांना तेव्हांच पटतो. सर्व पदार्थ क्षणिक आहेत–प्रतिक्षणीं सर्व पदार्थांचा नाश होतो’. असला हा उपदेश इंद्रिय लंपट बौद्धांनीं केला आहे. परंतु हा त्यांचा उपदेश त्यांच्याचमतानें विरुद्ध आहे, एवढेंच नव्हे तर लोकांच्या दृष्टीनें व अनुमानानेंही विरुद्ध आहे हें आह्मी सिद्ध करून दाखवितो. तपश्चरणानें सुख मिळत नाहीं असें आपल्या तोंडानें आपणच

ते ह्मणतात व पुनः मस्तक मुण्डन, ब्रह्मचर्य व व्रतें ह्या क्रिया कां करितात. ह्या सर्व क्रियाच त्यांचा वरचा उपदेश खोटा आहे हें सिद्ध करितात. हा स्वमतविरोध होय,

**यद्दूरं यदुराराध्यं यच्च दूरे व्यवस्थितम् ।**
**तत्सर्वं तपसा साध्यं तपो हि दुरतिक्रमम् ॥**

जें अतिशय दूर आहे व जें साधण्यास महान् प्रयास पडतात, आणि जें कालांतरानें मिळणारें असतें तें सर्व तपश्चरणानें साध्य होतें व तें तपश्चरण करणें फार कठिण आहे. अशी लोकोक्ति आहे यावरून तपश्चरणानें सौख्य मिळत नाहीं, हें ह्मणणें विरुद्ध आहे हें ठरतें. हा लोकविरोध होय.

'सर्व पदार्थ कथंचिन्नित्य आहेत कारण जें मीं काल पाहिलें तेंच मी आज पहात आहे असें ज्ञान होतें; यावरून पदार्थांच्या अवस्था बदलत असूनहि अशी एक खुबी पदार्थांमध्यें दिसून येते कीं जिच्या योगें पदार्थ आह्मांस ओळखता येतात. अर्थात् पदार्थांच्या एका अवस्थेचा नाश व दुसरी अवस्था उत्पन्न होऊनहि पदार्थामध्यें स्थिरता दिसून येते. तसेंच पूर्वावस्थेची सदृशताहि पण दिसते यामुळें तोच हा पदार्थ असें आह्मांस चटकन् ओळखतां येतें. या युक्तीनेंहि पदार्थ कथंचिन्नित्य आहेत; ते सर्वथा विनाशिक नाहींत हें सिद्ध होतें, यामुळें बौद्धमत युक्तिविरुद्धहि पण आहे. अशा तीन विरोधांनीं तें दूषित असल्यामुळें विद्वानांच्या आदरास तें पात्र नाहीं.

आतां संतानामध्यें प्रत्यभिज्ञान स्मृति, अनुमान वगैरे प्रमाणांची प्रवृत्ति होते यास्तव युक्तिविरोध नाहीं असें ह्मणणें अयोग्य आहे हें दाखवितात.

**न संततिरनश्वरी नहि च नश्वरी नो द्विधा ।**
**वनादिवदभाव एव यत इष्यते तत्वतः ॥**



**वृथैव कृषिदानशीलमुनिवंदनादिक्रियाः ।**
**कथंचिदविनश्वरी यदि भवेत्प्रतिज्ञाक्षतिः ॥ २२ ॥**

**अर्थः**—संतति अर्थात् कार्य कारणांची परंपरा ही सर्वथा नित्य नाहीं, अनित्य नाहीं व नित्यानित्यही नाहीं. यास्तव बौद्धांनीं वन, नगर इत्यादिकांप्रमाणें संततीचा सर्वथा तत्वरूपानें अभावच मानिला आहे. हें जंगल आहे, हें शहर आहे हा व्यवहार खरा नव्हे, तत्वरूपाचा नव्हे असें बौद्धाचें मत आहे; कारण निंब, बाभूळ, खैर वगैरे विविध झाडाशिवाय जंगल वेगळें आढळत नाहीं. घरें, वाडे याशिवाय शहर दुसरें असूं शकत नाहीं असें बौद्ध ह्मणतात. ह्मणून शहर, जंगल इत्यादिकांचा ते अभाव मानतात. याचप्रमाणें कार्य कारणांच्या परंपरेला संतति ह्मणतात. प्रत्येक कार्य व कारण हेंच खरें आहे त्यांची परंपरा असत्य आहे. परंतु हें ह्मणणें असत्य आहे, कार्यकारण परंपरा मानिली पाहिजे व ती न मानिली तर तत्वसिद्धि होणार नाहीं. जीवाच्या देव, नारकी, मनुष्य इत्यादिक अनेक पर्याय परंपरा न मानल्यास जीवसिद्धि होणार नाहीं. जीवद्रव्य हें खरें आहे व त्याचे पर्याय नाहींत असें मानणें खोटें आहे. जर पर्यायपरंपरा न मानली तर कार्यकारणभाव सिद्ध होणार नाहीं. व कार्यकारण भाव पदार्थांमध्यें मानावयाचा असल्यास पदार्थांना त्यांच्या पर्यायापासून सर्वथा भिन्न मानणें योग्य होणार नाहीं. किंवा सर्वथा पर्यायच मानून ते सर्व पर्याय परस्परापासून भिन्न मानणें योग्य नाहीं. मूल द्रव्य न मानलें तर पर्याय परंपरा तरी कशी उत्पन्न होईल. व अमूक मनुष्य देव झाला असें ह्मणतां येणार नाहीं कारण देवपर्यायापासून मनुष्य पर्याय हा सर्वथा भिन्न आहे, यामुळें कार्यकारण संबंध सिद्ध होणार नाहीं. तसेंच या दोन पर्यायांचें उपादान कारण जीवद्रव्य न मानलें तर देव मनुष्यादि पर्यायांची

योग्य संगति कशी लागेल. यास्तव जीवद्रव्य व त्याचे पर्याय या उभयतामध्ये कथंचित् एकत्व मानिले पाहिजे व अशा रीतीनें जीवद्रव्याची पर्यायपरंपरा—अर्थात संतति ही सिद्ध होते. व अशी संतति मानणें हें अयोग्य नाहीं. बौद्धांनीं प्रत्येक पर्यायव्यक्तिच खरी आहे असें मानिले आहे व त्यांची संतति वास्तविक नाहीं असें ते समजतात. परंतु या पर्यायसमूहामध्यें सर्वथा भिन्नपणा मानल्यास व द्रव्य आणि पर्याय यामध्यें एकत्व न मानल्यास संतति केव्हांहि सिद्ध होणार नाहीं. वास्तविक पाहिलें असतां त्यांनीं संतति मानिली नाहीं यामुळें ते संतति नित्य आहे किंवा अनित्य आहे अथवा नित्यानित्य आहे? असे प्रश्न करून तिचें ते खंडन करण्याचा प्रयत्न करतात. परंतु संतति न मानल्यास कार्य कारणभाव जुळणार नाहीं हें आम्ही सिद्ध केलें आहे. सर्वथा पदार्थ क्षणिकच मानले तर शेतकी, दान, शील, मुनिवंदन इत्यादि क्रिया व्यर्थ होतील. कारण, पदार्थ क्षणिक मानल्यामुळें त्यांची संततिही क्षणिकच मानावी लागेल. यामुळें ज्यानें शेत नांगरलें, ज्यानें दान दिलें, ज्यानें मुनिवंदना केली, ज्यानें शील पाळलें तो तत्क्षणींच नाश पावल्यामुळें या क्रिया केल्यापासून उत्पन्न होणाऱ्या फलांचा भोक्ता कोणीच नाहीं असें मानावें लागेल. यामुळें संतति सर्वथा क्षणिक आहे असें मानू नये. कदाचित संतति कथंचित् नित्य मानिल्यास 'सर्व पदार्थ क्षणिक आहेत' असें म्हणणाऱ्या बौद्ध सिद्धांतास त्यांनीं स्वतःच काजळ फासलें असें होईल. यास्तव बौद्धांनीं संततीचा अपलाप करूं नये व ती खरी आहे असें मानावें. असें मानिल्यानें वर सांगितलेल्या शेतकी वगैरे सर्व क्रिया सफल होतील.

आतां केवली कवलाहार करितो कारण तो दीर्घ काल वाचणारा मनुष्य आहे. उदाहरण—जसा भोगभूमिज मनुष्य. भोगभूमी-



तील मनुष्य कवलाहार करितो म्हणून तो पुष्कळ दिवस टिकून राहतो. याचप्रमाणें केवलीही कवलाहार करीत असल्यामुळें तो टिकून राहतो असें श्वेतांबर म्हणतात. परंतु त्यांचें हें म्हणणें अयोग्य आहे हें या श्लोकांत आचार्य सिद्ध करतात.

**अनन्यपुरुषोत्तमो मनुजतामतीतोऽपि स**
**मनुष्य इति शस्यसे त्वमधुना नरैर्बालिशैः ।**
**क ते मनुज गर्भिता क च विरागसर्वज्ञता--**
**न जन्ममरणात्मता हि तव विद्यते तत्वतः ॥२५॥**

अर्थः—हे जिनेश ! आपणच पुरुषश्रेष्ठ आहांत, यास्तव आपणांस सर्व जन पुरुषोत्तम म्हणतात. आपणाहून श्रेष्ठ अशी व्यक्ति नसल्यामुळें आपणांस अनन्य पुरुषोत्तम म्हणतात. आपण मनुष्य प्रकृतीस उलंघिलें आहे, आपण देवाधिदेव आहात. असें असूनही आपणांस कित्येक मूर्ख माणसें आपण मनुष्य आहांत असें म्हणतात. परंतु त्यांचें हें म्हणणें योग्य नाहीं. आपण जर इतर मनुष्याप्रमाणेंच असतां तर आपल्या ठिकाणीं इतर मनुष्याप्रमाणें वीतरागता नसावयास पाहिजे होती; आपण इतर मनुष्याप्रमाणें सर्वज्ञही नसतां. इतर माणसें गर्भांत आलीं असतां तीं त्यावेळेस ज्या स्थितींत राहतात तशी स्थिती आपणांसहि प्राप्त झाली असती. परंतु आपण सर्वज्ञ आहांत वीतराग आहात, तसेंच आपली गर्भावस्थाहि इतर मनुष्यापेक्षां विलक्षण असल्यामुळें आपण मनुष्य नाहींत हें सिद्ध होतें. खरें पाहिलें असतां आपणांस जन्म नाहीं मरण नाहीं. आपण एकाच जन्मामध्यें कर्मांचा नाश करितां; यामुळें आपणांस दुसरा जन्म घ्यावा लागत नाहीं. व ज्याअर्थी आपणांस जन्म घ्यावा लागत नाहीं त्याअर्थी आपणांस मृत्युही नाहीं, व यावरूनहि आपण मनुष्य प्रकृतीस उलंघिलें आहे असें सिद्ध होतें.

**विशेष स्पष्टीकरणः**—कित्येक लोक श्रीजिनास मनुष्य समजतात. श्वेतांबर देखील श्रीजिनास मनुष्यच समजतात. कारण ते कवलाहार करितात असें त्यांचें ह्मणणें आहे. वास्तविक श्रीजिन हे कवलाहार करीत नाहींत व यामुळें ते मनुष्य नाहींत, ते देवाधिदेव आहेत हें आह्मी सिद्ध करणार आहोंत. येथें श्रीजिन हे कवलाहार कां करीत नाहींत याचें सविस्तर वर्णन करण्याचें आह्मी योजिलें आहे तें असें—

' जे जीवन्मुक्तावस्थेंत आत्म्याला कवलाहार मानतात त्यांच्या मतांत आत्म्याचा अनंतचतुष्टय स्वभाव राहूं शकणार नाहीं, कारण अनंत सुखाचा अभाव होईल. व तो भुकेच्या पीडेपासून आत्मा पीडित झाल्यानें स्पष्ट दिसून येईल. भुकेच्या पीडेनें सर्व माणसें कवलाहार ग्रहण करण्याचा प्रयत्न करितात. ही गोष्ट सर्वजनप्रसिद्ध आहे कीं भोजनापासून सुख होतें ह्मणून भोजन केल्यापासून सुख होत नाहीं असें ह्मणणें अयोग्य आहे आणि ह्मणूनच श्रीजिन कवलाहार ग्रहण करीत असूनहि त्यांच्या अनंत सुखाचा अभाव होत नाहीं, ज्यावेळेस आह्मी भुकेनें दुःखी होतो व अशक्त होतो त्यावेळेस आह्मी जेवतो, व त्यामुळें आह्मांस सुख व शक्ति हे उत्पन्न होतात असें दिसून येतें. असें श्वेतांबराचें ह्मणणें अयोग्य आहे. कारण आमचें सुख कादाचित्क आहे—अर्थात् तें कधीं कधीं उत्पन्न होतें व तें पंचेंद्रिय विषयापासून उत्पन्न होतें. भगवंताचें सुख देखील कादाचित्क व विषयापासून उत्पन्न होतें असें मानल्यास त्यांच्या अनंत चतुष्टयांचा अभाव मानावा लागेल.

भुकेनें ज्याचें पोट खोल गेलें आहे जो शक्तिहीन झाला आहे असा श्रीजिनेश्वर जेव्हां आहार घेण्यास प्रवृत्त होईल तेव्हां लागलीच त्याच्या सुखाचा व शक्तीचा नाश झाल्यानें त्याच्या ठिकाणीं अनंत सुख व अनंत शक्ति कोठून संभवेल ? श्रीजिनेश्वर रागद्वेष रहित असल्यामुळें आहार ग्रहण करण्याचा प्रयत्न त्यांच्या हातून होणें शक्य नाहीं.



हा विषय अनुमान प्रमाणानेंही सिद्ध करता येतो. ' केवली भोजन करीत नाहींत कारण रागद्वेषाचा पूर्ण अभाव झाल्यानें अनंत वीर्याची त्यांना प्राप्ति झाली आहे. मित्र व शत्रु यांना समान मानणारे साधु रागद्वेष रहित असतात तरीहि ते भोजन करतात असें आढळून येतें, यामुळें आपलें वरचें कथन अयोग्य आहे, असें आपण कदाचित ह्मणाल परंतु आपलें हें ह्मणणें अनुचित आहे. मोहनीय कर्माच्या सद्भावामुळें भोजनादि क्रिया करणाऱ्या साधूंचा रागद्वेष वास्तविक नष्ट झाला नसतो व ते प्रमत्त गुणस्थानांत राहतात. परंतु श्रीजिनेश कवलाहार ग्रहण करूं लागले तर ते सरागी होतील. याबद्दल अनुमानहि आहे. जो जो कवलाहार ग्रहण करितो तो तो सरागी समजावा जसें रस्त्यानें जाणारा मनुष्य, आपले ( श्वेतांबराचे ) जिनेश कवलाहार ग्रहण करतात, यास्तव त्यांना सराग ह्मणावयास हरकत कोणती ? जेव्हां स्मरण होतें व जेवण्याची अभिलाषा उत्पन्न होते तेव्हां आपण जेवतो. आकंठ जेवल्यानें तृप्ति होतें, तदनंतर अरुचीनें आपण जेवणापासून परावृत्त होतो. यास्तव आपले जिनेश्वर जेवणाच्या अभिलाषानें भोजन करितात आणि पोट भरल्यानंतर अरुचीनें त्याचा त्याग करतात यामुळें ते अवश्य सराग आहेत. सराग असल्यामुळें त्यांना आप्त कसें ह्मणतां येईल ? अभिलाषा नसूनही ते आहार घेतात; हा एक त्याचा महिमा आहे असें जर आपण मानता तर ते आकाशांतून अधर गमन करितात हा जसा अतिशय मानता व ते अनंत गुणपरिपूर्ण आहेत असें ह्मणता याचप्रमाणें ते आहार घेत नाहींत हा एक अतिशय आपण कां मानीत नाहीं ?

केवलींनीं आहार घेतला नाहीं तर त्यांचें शरीर कसें टिकून राहील ? यास्तव ते आहार घेतातच व हें आमचें ह्मणणें आह्मी या प्रकारानें सिद्ध करितो. जसें आमचें शरीर आहाराच्यायोगें टिकतें, तसेंच केवलींचें शरीरही आहार घेण्यानेंच टिकून राहतें. कारण आ-

र्भचें व त्यांचें शरीर एकाच तऱ्हेचें आहे. ' हें त्यांचें ह्मणणें अयोग्य आहे. त्यांस आह्मी असें विचारतों कीं, या वरच्या गोष्टीनें आपण केवलींना आहार मात्र सिद्ध करता ? किंवा केवली कवलाहार घेतात हें सिद्ध करता ? आहार मात्र घेतात असें जर ह्मणत असाल तर तें आह्मांस मान्य आहे. कारण पहिल्या गुणस्थानापासून तेराव्या गुणस्थानापर्यंत असलेले सर्व जीव आहार घेतात असें आगमांत ह्मटलें आहे. यामुळें कवलाहार न घेतांही कर्म नोकर्माचें ग्रहण केल्यामुळें केवलींना ते आहार घेतात असें ह्मणता येईल. आगमामध्यें आहार सहा तऱ्हेचा वर्णिलेला आहे तो असा—

णोकम्म कम्महारो कवलाहारो य लेप्पमाहारो ।
ओज मणो वि य कमसो आहारो छव्विहो णेयो ॥

अर्थ—नोकर्म आहार, कर्माहार, कवलहार, लेप्याहार, ओजाहार व मानसिक आहार असें आहाराचे सहा भेद आहेत.

परंतु प्राणिमात्र कवलाहारच करतात असें समजूं नये. तसें मानल्यानें एकेंद्रिय जीव, अंड्यांत असलेले जीव, देव व उपवासी तिर्यंच व मनुष्यें यांना कोणताही आहार नाहीं असें ह्मणावें लागेल. परंतु असें नाहीं. कारण आहारी व अनाहारी जीव कोणते आहेत याबद्दल परमागमांत असें सांगितलें आहे.

विग्गहगइमावण्णा केवलिणो समुहदो अजोगीय ।
सिद्धा य अणाहरा सेसा आहारिणो जीवा ॥२॥

अर्थः—विग्रह गतीला प्राप्त झालेले, दण्डकपाट समुद्घात करणारे केवली ( तेरावे गुणस्थानांतील जीव ) अयोग केवली ( चौदाव्या गुणस्थानांतील जीव ) व सिद्ध हे अनाहारक असतात. याशिवाय बाकी राहिलेले सगळे जीव आहारक समजावेत. या विवेचनावरून केवली कर्मनोकर्म आहार घेतात व तोच श्रीजिनेशाचा आहार आहे असें आपलें ह्मणणें असेल तर वाद संपलाच ह्मणावयाचें; कारण आ-



पलें हें ह्मणणें आह्मांस मान्य आहे. केवली कवलाहार करतात व त्यायोगानेंच त्यांचें शरीर पोषण होतें असें ह्मणत असाल तर तें अयोग्य आहे. देव हे जेवीत नाहींत तथापि त्यांचीं शरीरें सागरावधि वर्षें टिकतात, यामुळें कवलाहाराशिवाय शरीर टिकून राहत नाहीं असें आपलें ह्मणणें विफल आहे. " औदारिक शरीर मात्र कवलाहाराच्या अभावीं शेंकडो वर्षें टिकून राहत नाहीं. देवांचें वैक्रियिक शरीर असल्यानें तें औदारिक शरीराहून वेगळें आहे व तें कवलाहाराशिवायही राहूं शकतें यास्तव तुह्मीं दिलेला दोष अविचारितरम्य आहे. त्या दोषापासून आमचें साध्य बाधित होत नाहीं. जें जें औदारिक शरीर टिकून राहतें तें तें कवलाहार केल्यानें टिकून राहतें; जसें आमचें शरीर केवलींचेंही शरीर औदारिकच आहे यास्तव तेंही कवलाहाराच्या अभावीं टिकून रहात नाहीं यास्तव केवलीही कवलाहार घेतात हें सिद्ध होतें " परंतु हें आपलें ह्मणणें निःसार आहे. कारण केवलींचें शरीर यद्यपि औदारिकच आहे तथापि त्यांचें शरीर आमच्या शरीरापेक्षां फारच विलक्षण आहे. त्यांच्या शरीराला परमौदारिक शरीर असें ह्मणतात. त्यांच्या शरीरामध्यें निगोद जीव नसतात. याचें कारण त्यांचें शरीर रक्तमांस इत्यादि धातूंनीं रहित असतें, त्यांचे नख केश वाढत नाहींत हे न वाढण्यालाही रक्तमांसादिकांचा अभाव हेंच कारण आहे. त्यांचें शरीर अतिशय तेजःपुंज असतें इत्यादि कारणांनीं त्यांच्या व आमच्या शरीरामध्यें विलक्षण फरक आहे हें सिद्ध होतें. व यावरूनच ते कवलाहार करीत नाहींत ही गोष्ट सिद्ध होते. आमच्या सारखेंच त्यांचें शरीर औदारिक आहे एवढ्यावरूनच आमच्याप्रमाणें तेही कवलाहार करीत असतात, असें आपण ह्मणत असाल तर त्यांचें प्रत्यक्ष ज्ञानही आमच्या प्रत्यक्ष ज्ञानाप्रमाणें इंद्रियपासूनच उत्पन्न होतें असें कां ह्मणत नाहीं ? केवली सराग आहेत कारण ते वक्ते आहेत जसें आह्मी; असें कां ह्मणत नाहीं ? आमच्याठिकाणीं जे स्वभाव आहेत त्यापैकीं एखादा

केवलीच्याठिकाणीं असतो व एखादा नसतो असें ह्मणणें अनुचित आहे, असें ह्मणण्यानें स्वच्छंदपणा सिद्ध होतो. व अशा रीतीनें केवली कोण व वीतराग कोण हें सिद्ध होणार नाहीं आणि यामुळें केवली कवलाहार करतात हें आपलें ह्मणणें कसें सिद्ध होईल ? जर केवली कवलाहार करतातच असा आपला हेका असेल तर केवलींचें शरीर सप्तधातूंनीं रहित असतें असें तुह्मी कसें सिद्ध करणार ? तपश्चरणाच्या माहात्म्यानें त्यांना चार तोंडें असतात असें जसें आपण ह्मणतां, तसेंच कवलाहार न करतांही त्यांचें शरीर कोटिपूर्व वर्षेही टिकून राहतें असें ह्मणण्यास आपणास लाज वाटतें काय ? दिवसांतून पांच वेळां जेवणाऱ्या मनुष्याची जशी शरीर स्थिति असते तशीच भोजनाविषयीं विरक्तचित्त असलेल्या मनुष्याच्या शरीराची स्थिति असते किंवा चार, तीन, दोन एकवेळा जेवणाऱ्या मनुष्याचीहि शरीर स्थिति तशीच असते. दररोज जेवणाऱ्या मनुष्याचें शरीर जसें टिकून राहतें तसेंच एक दिवसाआड तीन दिवसाआड जेवणाऱ्याचेंही शरीर टिकून राहतें असें आपल्या पाहण्यांत नेहमीं येत असतें. बाहुबलि वगैरे ऋषींनीं एक एक वर्षपर्यंत आहार घेतला नाहीं तथापि त्यांचें शरीर टिकून राहिलें असें आपण पुराणांतून नेहमीं वाचतो व ऐकतो. शरीर टिकून राहण्याला आयुकर्मच प्रधान कारण आहे. जेवण वगैरे केवळ सहायक आहेत. लाभांतराय कर्माचा नाश झाल्यामुळें प्रतिसमयीं केवलीचें शरीर पुष्ट करण्यास कारण असलेल्या दिव्य परमाणूंचा त्यांना लाभ होतो, यामुळें केवलींचें शरीर पुष्ट राहतें व टिकतें. छद्मस्थावस्थेंत तीर्थंकर आहार घेत होते ह्मणून कैवल्यावस्थेंतही जर ते आहार घेतात असें मानाल तर छद्मस्थावस्थेमध्यें त्यांच्या डोळ्यांच्या पापण्या हालत होत्या, नख केश यांची वाढ होत होती. या गोष्टी कैवल्यावस्थेंतही होतात असें आपण माना. आणि या गोष्टी कैवल्यावस्थेंत होत नाहींत असें आपलें मत असेल तर केवली कवलाहार घेत नाहींत हीही गोष्ट आपल्यास निमुटपणें स्वीकारावी लागेल.



कदाचित एक महिना अथवा एक वर्ष आहारावांचून राहता येईल; परंतु मरणपर्यंत आहाराशिवाय शरीर टिकणें असंभवनीय वाटतें ? पुनः आहार घेण्यांत प्राण्यांची प्रवृत्ति दिसून येते ' येथ आह्मी आपणास असें विचारतों कीं शरीर स्थिति मरेपर्यंत कां टिकून रहात नाहीं ? तसें आढळून येत नाहीं ? असें ह्मणाल तर सर्वज्ञ वीतराग ही आढळून येत नाहीं त्यांची ही सिद्धि होत नाहीं कारण तो तरी कोठें तुमच्या दृष्टीस पडला आहे. सर्वज्ञ वीतरागच असिद्ध असल्यामुळें फायद्याची इच्छा करणाऱ्या मनुष्यास फायदा न होतां त्याच्या धंद्यांत घातलेल्या रकमेचाही नाश झाल्यानें त्याची जशी अवस्था होते तशी तुमची अवस्था झाली आहे. यामुळें तुह्मी केवली कवलाहार करतात ही गोष्ट कशी सिद्ध करणार ?

अज्ञानादिक दोष व ज्ञानावरणादिक कर्में यांची हानि प्राण्यामध्यें तरतमरूपानें दिसून येते. यावरून दोषांचा व आवरणांचा एखाद्या ठिकाणीं पूर्ण क्षय होतो असें सिद्ध होतें. ज्याचे सर्व रागादि दोष व आवरण नाहींसें झाले आहेत तो सर्वज्ञ व वीतराग होय. या रीतीनें सर्वज्ञत्व व वीतरागत्वाची सिद्धि एखाद्या आत्म्यामध्यें होतें. असें ह्मणाल तर मरेपर्यंतही कवलाहार ग्रहण न करणें हीही गोष्ट सिद्ध होईल. वास्तव भगवंताचें औदारिक शरीर आहे ह्मणून ते कवलाहार घेतात हें ह्मणणें सिद्ध होत नाहीं.

' केवलींना वेदनीय कर्म आहे. यामुळें ते कवलाहार घेतात तें असें कीं केवलींना आयुकर्म जसें फल देतें, तसें वेदनीय कर्मही क्षुधादिक दुःखें जीं वेदनीय कर्माचीं कार्यें आहेत असलीं फळें देतें कारण तें कर्म आहे. ' हें ह्मणणेंही वरूनच सुंदर दिसतें. या अनुमानापासून वेदनीय कर्मापासून काय फल प्राप्ति होते हें सिद्ध होतें; परंतु केवली कवलाहार घेतात ही गोष्ट सिद्ध होत नाहीं. क्षुधादि दुःखें उत्पन्न करण्यास कारणभूत वेदनीय कर्मांचा त्यांच्या ठिकाणीं सद्भाव

असल्यामुळें कवलाहार सिद्ध होतो असें ह्मणाल तर आह्मी तुह्मांस असें विचारितों कीं क्षुधादि दुःखें उत्पन्न करणारें वेदनीय कर्म तेथें आहे हें तुह्मी कसें जाणलें ? क्षुधादि फलें दिसतात असें ह्मणाल तर अ. न्योन्याश्रय दोष येथें येतो; तो असा.—-वेदनीय कर्म भगवंताच्या ठिकाणीं आहे हें सिद्ध झालें ह्मणजे तें कर्म क्षुधादि फलें देतें हें सिद्ध होईल व या फलाची सिद्धि झाली ह्मणजे वेदनीय कर्माची सिद्धि होईल. असा आतां असाता वेदनीय कर्माचा उदय केवलींच्या ठिकाणीं आहे ह्मणून क्षुधादिक फलाची त्यांच्या ठिकाणीं सिद्धि होतें हें ह्मणणें बरें दिसत नाहीं. केवलीच्या ठिकाणीं असलेलें असाता वेदनीय कर्म क्षुधादिक दुःखें उत्पन्न करण्याचें सामर्थ्य स्वतःमध्यें ठेवण्यास असमर्थ आहे. जेव्हां तें सामर्थ्ययुक्त असतें तेव्हां तें आपलें कार्य करण्यास समर्थ होतें. मोहनीय कर्माचा केवलीनें नाश केला ह्मणून हें निःशक्त झालें आहे. जसें सेनापति रणांगणामध्यें पडला ह्मणजे सर्व सैन्य असहाय व सामर्थ्यहीन होतें तद्वत् मोहनीय कर्म नाहींसें झालें ह्मणजे अद्यापि कर्मांचा जोर केवलीवर कांहीं चालू शकत नाहीं. जसें मंत्रानें विष निर्विष केल्यावर तें मांत्रिकानें खाल्लें तरी दाह मूर्च्छा वगैरे विकार करूं शकत नाहीं, तसें असाता वेदनीय कर्माचा उदय असूनही मोहनीय कर्माचें त्याला पाठबळ न मिळाल्यामुळें असमर्थ होतें, व तें क्षुधादिक दुःख करण्यास अयोग्य होतें. कोणतेंही कार्य सर्व सामग्री मिळाल्यानें होतें. भगवंतानें तीव्रतर शुक्ल ध्यानरूपी अग्नीनें घातिकर्मरूपी लांकडें जाळून त्यांचें भस्म केलें आहे, यावरून मोहनीय कर्माचा अभाव त्यांनें केला आहे हें स्पष्ट होतें. मोहनीय कर्माच्या अभावीं देखील असाता वेदनीय आपलें कार्य करण्यास चुकत नाहीं असें ह्मणाल तर केवली परघात कर्मोदयामुळें दुसऱ्यांना काठी वगैरेनें मारील किंवा तो दुसऱ्याकडून ठोकला जाईल. परघात कर्मोदय देखील संयत जनांना अर्हंत अवस्थेपर्यंत असतो. केवली



अतिशय दयालु असल्यामुळें परघात कर्मोदय असूनही दुसऱ्यांना काठीं वगैरेनीं मारीत नाहींत. व केवलींना उपसर्ग होत नसतो यास्तव दुसरेही त्यांना बाधा देऊं शकत नाहींत. असें जर ह्मणाल तर अनंत वीर्यामुळें व कोणतीही बाधा होऊं शकत नसल्यामुळें असाता वेदनीय कर्माचा उदय असूनही केवली कवलाहार करीत नाहींत. असें कीं तुह्मी मानीत नाहीं ? करुणा ही मोहनीय कर्माचें कार्य आहे, मोहनीय कर्माचा सर्वस्वी नाश झाल्यावर परम कारुणिकत्व—दयाळूपणा केवलीच्याठिकाणीं कोठून राहणार ? जर इतर सामग्रीची अपेक्षा न बाळगता कर्मांचा उदय आपलें कार्य करूं लागेल तर स्त्री पुरुष नपुंसक या तीन वेदांचा अथवा कषायांचा प्रमत्तादिक गुणस्थानामध्यें उदय आहे. मैथुन, मुखया उडविणें इत्यादि कार्यें होतील, यांच्यायोगें मनामध्यें क्षोभ उत्पन्न झाल्यामुळें शुक्ल ध्यानाची प्राप्ति किंवा क्षपक श्रेणीवर चढणें हीं कार्यें होणार नाहींत.

असातावेदनीय कर्मांचा उदय होऊनहीं तो जर कार्य करणार नाहीं तर नामादि कर्म प्रकृतींचा उदय देखील स्वकार्य करण्यास असमर्थ होईल हें ह्मणणें अनुचित आहे. शुभ प्रकृतीचा उदय भगवंतामध्यें अप्रतिहतपणानें होतो व तो आपलें कार्य करीत असतो. जसें दुष्टांचें शासन करणाऱ्या व शिष्टांवर अनुग्रह करणाऱ्या बलवान राजाच्या देशामध्यें दुष्ट जीवंत राहून देखील आपलीं दुष्ट कार्यें करण्यास असमर्थ होतात. परंतु सज्जन अप्रतिहतपणें आपलीं चांगलीं कार्यें पार पाडतात. तसेंच भगवंतामध्यें सामर्थ्यहीन दुष्ट कर्मप्रकृति आपलें कार्य करूं शकत नाहीं. भगवंताच्या ठिकाणीं अशुभ कर्मांचेंच सामर्थ्य कां चालत नाहीं व शुभ प्रकृतीचें सामर्थ्य कां चालावें या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, अर्हंत अशुभ कर्मप्रकृतींच्या अनुभागाचा नाश करतात शुभ प्रकृतींचा करीत नाहींत; कारण जगामध्येंहीं गुणांचा विध्वंस करणाऱ्यांनाच राजा दंड करीत असतो निर्दोष मनुष्यांना तो दंड करीत नाहीं.

जर ज्याचें सामर्थ्य रोकलें गेलें आहे असें देखील असाता वेदनीय आपलें कार्य करूं लागेल तर दण्ड-कवाड-प्रतर समुद्घात जो केवली करीत असतात तो व्यर्थ होईल. जेव्हां आयुकर्म थोडें असते व वेदनीयादि कर्मांची स्थिति अधिक असतें त्यावेळेस केवली सर्वांची सारखी स्थिति करण्याकरितां हा समुद्घात करीत असतात. अन्यथा या कर्मांची अधिक स्थिति असल्यानें हीं कर्में फळदानसमर्थ असल्यानें शेकडों उपायांनीं देखील सामर्थ्य रहित व्हावयाची नाहीत आणि असें झाल्याने कोणीही मुक्त होणार नाहीं.

तपोमाहात्म्यानें ज्याची निर्जरा झाली व अधिक स्थिति असल्यानें जें फल देण्यास असमर्थ आहे असें आयुकर्म जसें समान केलें जातें. तसें वेदनीय देखील तपोमहात्म्यानें समान केलें जातें असें समजावे.

या ठिकाणीं श्वेतांबर असें ह्मणतात—जर वेदनीय कर्म केवलींना आपलें फल देत नाहीं तर तें ज्ञानावरणादि कर्माप्रमाणें नाहींच असें समजावें आणि असें समजल्यामुळें, केवलींच्याठिकाणीं पांच कर्मांचा अभाव मानावा लागेल या आक्षेपाचें उत्तर असें आहे कीं आयुकर्मासह असलेलीं वेदनीयादि कर्में आपआपलीं फलें देण्यास समर्थ आहेत असें मानलें तर मोक्षप्राप्ति होणें शक्य नाहीं व फलें तीं देत नाहींत असें मानलें तर त्यांना कर्म असें नांव देणें अनुचित दिसतें. व तीं कर्में नसल्यामुळें त्यांचा नाश करण्यासाठीं केवलींनीं केलेलीं शुक्लध्यान, लोकपूरण समुद्घात वगैरे कार्यें व्यर्थ होतील. तपो माहात्म्याने या कर्मांचे सामर्थ्य नाहींसे होऊन तीं केवलींच्या ठिकाणीं राहतात असें ह्मणाल तर वेदनीय देखील असमर्थ होऊन त्यांच्या ठिकाणीं राहते असे मानण्यास कोणती हरकत आहे. केवलींच्या ठिकाणीं वेदनीय कर्म आहे ह्मणून त्याने केवलींना फल दिलेच पाहिजे असा नियम नाहीं. नाहीं तर केवलींना इंद्रियादिक आहेत ह्मणून मतिज्ञान व रागादिक विकारही उत्पन्न होऊं लागतील. ज्ञानावरण कर्माचा व



दर्शनावरण कर्माचा क्षयोपशम आणि मोहनीय कर्माचें साहाय नसल्यामुळें इंद्रियादिक आपलीं कार्यें करण्यांत गढून जात नाहींत असें मानीत असाल तर वेदनीय कर्म देखील मोहनीय कर्माच्या अभावीं कांहीं चळवळ करीत नाहीं हें सिद्ध होतें.

अत्यंत उदासीन—निर्मोही मनुष्य स्वतःसाठीं किंवा दुसऱ्यासाठीं कोणतीही वस्तु घेण्याची किंवा त्यागण्याची प्रवृत्ति करीत नाहीं. जो ज्याच्याविषयीं पूर्ण विरक्त आहे तो त्याच्याकरितां कोणताही पदार्थ घेत नाही व टाकीत नाहीं. जशी पुत्राविषयीं पूर्ण उदासीन असलेली आई. भगवान् पूर्ण उदासीन आहेत यास्तव ते आहार घेण्याविषयीं प्रवृत्ति करीत नाहींत. जर क्षुधादिक टाकण्याचा प्रयत्न करतील तर त्यांना मोह आहे हें सिद्ध होईल. कारण जो जें घेण्याची किंवा त्यागण्याची प्रवृत्ति करितो तो मोहवान् समजावा जसें आह्मी. तसाच श्वेताम्बरांनीं मानलेला व कवलाहार करणारा जिनेश्वर मोहवान् होय व तो मोहवान् असल्यामुळें आमच्याप्रमाणेंच असर्वज्ञ आहे आणि तो आप्त नाहीं.

बुभुक्षा मोहनीय कर्माची गरज न ठेवणाऱ्या केवळ वेदनीय कर्माचें च कार्य नाहीं; ज्यायोगें मोहाच्या अभावीं देखील पूर्ण उदासीन केवलीच्या ठिकाणींही उत्पन्न होईल. बुभुक्षा ह्मणजे जेवण्याची इच्छा व ही इच्छा वेदनीय कर्माचें कार्य कसें समजली जाईल. जर जेवण्याच्या इच्छेला वेदनीय कर्माचेंच कार्य मानीत असाल तर स्त्रियाबरोबर रममाण होण्याची इच्छा देखील वेदनीय कर्माचेंच कार्य समजावें लागेल. व अशानें कवलाहारामध्यें जशी श्री जिनाची प्रवृत्ति होते तद्वत् स्त्रिया व पंचेंद्रियविषयामध्येंही प्रवृत्ति होऊं लागेल आणि जिनेश व हरिहर ब्रह्मा यांच्यांत कांहींच फरक आढळून येणार नाहीं.

स्त्रियांशीं रममाण होण्याची इच्छा वैराग्याच्या विचारांनीं नाहींशी होते याचप्रमाणें भोजनाची इच्छा प्रतिकूल विचारांनीं नाहींशी होऊं शकते.

ज्या वेळेस जेवण्याच्या इच्छेच्या प्रतिकूलपणानें आह्मी विचार करितो त्यावेळेस ती नाहींशी होतें; परंतु ते विचार लय पावलें ह्मणजे ती पुनः उद्भवते असें ह्मणणें स्त्रीशीं रममाण होण्याच्या इच्छेकडेही लागू पडतें. जेव्हां चित्त ज्ञानमय विचारांनीं पूर्ण व्यापिलें जातें, आत्मिक विचार ज्यावेळेस खडबडून जागे होतात, ध्यानामध्यें आत्म- जेव्हां पूर्ण गढून जातो; तेव्हां स्त्रीशी रमण्याची इच्छा पार नाहींशी होते, याचप्रमाणें जेवण्याची इच्छाही नाहींशी होते.

आतां क्षुधा ही इच्छारूप नाहीं यामुळें अत्यंत विमोही जिनेश्वराच्याठिकाणीं इची प्रवृत्ति होऊं शकते असें मानणें देखील अनुचित आहे. ती इच्छारूप नाहीं असें मानले तरीही ती दुःखस्वरूपाची असल्यानें अनंत सुखसागर श्री जिनाच्याठिकाणीं ती उत्पन्न होणें असंभवनीय आहे. जसें अतिशय उष्ण देशामध्यें थंडीचें नांवही नसतें तसें सुखस्वरूप जिनेशाच्याठिकाणीं क्षुधेचें नांवही आढळावयाचें नाहीं.

कदाचित् वेदनीयकर्म क्षुधादि दुःखें उत्पन्न करितें असें क्षणभर आह्मी मानलें. तथापि श्री जिनेश हे समवसरणामध्येंच राहून आहार घेतात किंवा ईर्यापथ शोधन करीत जाऊन आहार घेतात? समवसरणामध्यें राहूनच ते आहार घेऊं लागलें तर त्यानीं मुनिमार्गाचें उल्लंघन केलें असें होईल. भूक लागल्यानें निःशक्त झालेल्या जिनेश्वरास पूर्ण ज्ञान नसल्यामुळें मोक्षमार्गोपदेश त्यांच्या हातून होणें शक्य नाहीं. भूक लागल्याबरोबर देव तेथें आहार उत्पन्न करतात असें ह्मणत असाल तर याबद्दल प्रमाणें दाखवा. याला आगम प्रमाण आहे असें ह्मणाल तर दोघांनाही मान्य असा आगम नाहीं. तुमच्या मतांतील ( श्वेतांबर मतातील ) आगम असूनही त्यापासून या विषयाचा निर्णय होत नाहीं. 'आहार व उपसर्गांचा अभाव केवलींना असतो' असें प्रमाणभूत आगम आह्मांस सांगत आहे. ईर्या-



पथ शोधन करून केवली आहार घेतात असें आपण ह्मणत असाल तर यावर आह्मी असें विचारितो कीं प्रत्येक घरामध्यें ते जातात कीं एकाच घरामध्यें भिक्षालाभ होणार आहे असें समजून तेथेंच आहार घेतात? भिक्षेसाठीं प्रत्येक घरामध्यें जर ते फिरूं लागले तर ते अज्ञानी आहेत असें ठरतें; कारण अमुक घरामध्यें आज मला आहार मिळेल हें त्यांना माहीत नाहीं. विवक्षित घरामध्यें आहार मिळेल असें जाणून ते आहार घेतात असें ह्मणाल तर भिक्षाशुद्धि होणार नाहीं. कारण जिनेश सर्वज्ञ असल्यामुळ पारधी, कोळी इत्यादि दुष्ट लोकांकडून सर्वत्र व सर्वदा मारो, हरीण वगैरे प्राणी मारले जातात यांचा त्यांना आपल्या प्रत्यक्षज्ञानानें साक्षात्कार होइल; तसेंच मांस व अपवित्र पदार्थांचें स्पष्ट ज्ञान झाल्यामुळें ते आहार कसा बरें घेऊं शकतील. तथापि ते घेतात असें ह्मणाल तर ते निर्दयी आहेत असें होईल. प्राण्यांचा वध किंवा विष्टादिक अपवित्र पदार्थ दृष्टीस पडल्यास व्रतें व शील यांनीं रहित अशीही माणसें जेवीत नाहींत, तर व्रतादि मूलगुण व उत्तर गुण यांनीं परिपूर्ण असलेले जिनेश आहार कसा घेतील? तथापि ते घेत असतील तर ते अतिशय निकृष्ट आहेत असें ह्मणावयास हरकत कोणती?

जें कांहीं पवित्र किंवा अपवित्र असेल त्याचें स्मरण करणारे आह्मी जसें भोजन करितो तसेंच केवली सर्व पदार्थ साक्षात् पाहूनही भोजन करितात असें ह्मणणें अनुचित आहे. यथाख्यात चारित्रयुक्त व सर्वज्ञ असलेल्या केवलींशीं आमचें साम्य नाहीं. आह्मी अशुद्ध पदार्थ पाहून त्याचें स्मरण करितो व भोजनाचा त्याग करण्यास असमर्थ असतो ह्मणून आहार करितो व दोषविशुद्धीकरिता गुरूच्या आज्ञेनें स्वतःचे निंदा करितो व प्रायश्चित्तही घेतो. जे आहाराचा त्याग करण्यास समर्थ आहेत, आहारशुद्धीकडे त्यांचें पूर्ण लक्ष्य असतें, वैराग्य ज्यांच्या मनांत उत्कृष्ट बिंबलें आहे, शरीरावरील प्रेम ज्यांचें कमी झालें आहे,

ज्यांनीं जीभ आपल्या स्वाधीन ठेवली आहे व अंतराय पाळण्यांत चतुर असे जे आहेत त्यांना अपवित्र पदार्थांचें स्मरण झालें तरी ते आहार घेत नाहींत.

केवली एकटेच आहार घेतात? किंवा शिष्य मंडळाला बरोबर घेऊन आहार घेतात? एकटेच आहार घेतात असें ह्मणाल तर मागें लागलेल्या शिष्यांचें निवारण करून श्रावकाच्या घरीं आहार घेत असल्यामुळें ते दीन आहेत असें ह्मटलें पाहिजे. जर शिष्यांनीं वेढलेले असे ते आहार घेतात तर ते दोषी आहेत.

केवली आहार घेऊन प्रतिक्रमण आलोचना वगैरे कारतात किंवा नाहीं? कारतात असें ह्मणाल तर ते अवश्य दोषी आहेत. करीत नाहीत असें ह्मणाल तर भोजनापासून उत्पन्न झालेले दोष दूर कसे होणार? जेवण्याच्या गोष्टीनेंही अप्रमत्त गुणस्थानांतील साधु प्रमत्तगुणस्थानांत येतो. व अर्हंत भोजन करीत असूनही तेराव्या गुणस्थानापासून ढांसळत नाहींत हें ह्मणणें अंध श्रद्धेचें सूचक आहे. आहार घेतल्यानें हे प्रमत्त गुणस्थानांत आहेत असें समजलें जाईल आणि श्रेणीपासून च्युत झाल्यामुळें यांचें केवलज्ञान गडबडेल यांत संशय नाहीं.

केवली आहार कशासाठीं घेतात शरीर पुष्ट होण्यासाठीं, ज्ञान ध्यान संयम यांच्या पूर्णतेसाठीं, भुकेची बाधा दूर व्हावी ह्मणून किंवा प्राणांचें संरक्षण व्हावें यासाठीं? शरीरपुष्टीसाठीं आहार घेतात हें ह्मणणें शोभत नाहीं. लाभांतराय कर्माचा क्षय झाल्यामुळें प्रतिसमयीं विशिष्ट परमाणूंच्या लाभानें त्यांचें शरीर पुष्ट होत असतें. शरीर पुष्टीसाठीं आहार घेतल्यास केवलींना निर्ग्रन्थ कसें ह्मणतां येईल. ज्ञानादि सिद्धिसाठीं आहार घेतात हें ह्मणणेंही योग्य दिसत नाहीं. कारण त्यांचें सर्व विषयांना ग्रहण करणारें ज्ञान आहे व तें नित्य आहे. यथाख्यात चारित्र आहे व तें सर्वदा राहतें. व ध्यान वास्तविक पाहिलें असतां त्यांना नाहीं कारण केवलींना मन नसतें. योगांचा निरोध होतो ह्मणून



उपचारानें त्यांना ध्यान मानलें आहे. प्राणांचें संरक्षण करण्यासाठींही आहार घेण्याची त्यांना जरूरी नाहीं कारण केवली अपमृत्युरहित असतात. भुकेची बाधा मिटावी ह्मणून आहार घेतात हें ह्मणणेंही व्यर्थ आहे. अनंत सुख व वीर्य धारण करणाऱ्या भगवंताच्या ठिकाणीं क्षुधेची बाधा संभवत नाहीं हें मागें सांगितलेंच आहे.

परंतु केवली आहार घेत नाहींत असें ह्मणाल तर जिनेश्वरास ११ परीषह होतात असें आगमामध्यें ह्मटलें त्याला आपण विरोध आणिला असें होईल. हें ह्मणणेंही अनुचित आहे. भगवंताच्या ठिकाणीं अकरा परीषह होतात असें उपचारानें सांगितलें आहे. वेदनीय कर्माचें त्याच्या ठिकाणीं अस्तित्व आहे हें उपचाराला कारण आहे. खरोखरच हे ११ परीषह जिनाच्या ठिकाणीं असते तर क्षुधादि परीषहापासून भुकेच्या बाधेप्रमाणें रोग, वध, तृण स्पर्श इत्यादि परीषह उत्पन्न झाले असते आणि यामुळें केवलींना मोठें दुःख झालें असतें. व आमच्या प्रमाणें हेही दुःखी झाल्यामुळें यांना जिनेश ह्मणता आलें नसतें.

जिभेनें आहाराचा स्वाद व शीत उष्ण इत्यादिकांचा स्पर्शनादि इन्द्रियानें अनुभव आल्यामुळें केवलींना मतिज्ञान आहे हें सिद्ध झालें असतें. केवल ज्ञानानें यांचा अनुभव येतो असें ह्मणाल तर दुसऱ्याच्या शरीरांतील भोजनादिकांचाही अनुभव यांना येईल. स्वतःच्या शरीरांतील भोजनादिकांचा अनुभव येतो दुसऱ्यांच्या शरीरांतील भोजनादिकांचा यांना येत नाहीं असें ह्मणूं नये. कारण भगवान् वीतराग आहेत यामुळें स्वपर विभागाचा अभाव आहे अर्थात् हें माझें शरीर व हें दुसऱ्याचें शरीर आहे असा विभाग त्यांच्या ठिकाणीं होऊं शकत नाहीं.

उपचारानें देखील श्री जिनेश्वराचें ठिकाणीं ११ परीषह संभवत नाहींत कारण 'एकादश जिने' हें सूत्र निषेधपर आहे. 'एकेन अधिका न दश परीषहा जिने एकादश जिने इति व्युत्पत्तेः' एकानें

अधिक असें दहा परीषह जिनेन्द्रास नाहींत, अर्थात् ११ ही परीषह जिनेश्वरास नाहींत असें हें सूत्र सांगतें. यावरून भगवान् सिद्ध जीवाप्रमाणें क्षुधादि परीषह रहित आहेत कारण ते अनंत सुखी आहेत असें ह्मणावयाला कांहीं हरकत नाहीं.

ज्यावेळेस जिनेश्वर भोजन करितात त्यावेळेस लोकाकडून ते पाहिले जात नाहींत अर्थात् लोक डोळ्यानें त्यांना पाहूं शकत नाहींत असें आपण ह्मणता. येथें अरहन्त अयुक्त पदार्थ सेवन करितात ह्मणून एकांताचा आश्रय घेऊन ते पदार्थ खातात हें कारण आहे? किंवा दाट अंधारामध्यें बसून खातात? अथवा तें स्वतः विद्येच्या सामर्थ्यानें अंतर्धान पावतात ह्मणून लोकांना डोळ्यानें दिसत नाहींत? ते अयुक्त सेवी आहेत ह्मणून दिसत नाहींत, असें असेल तर परस्त्रीलंपटाप्रमाणें किंवा दीन मनुष्याप्रमाणे ते आहेत असें ठरतें. अंधकारांत जेवतात हें ह्मणणें अगदींच अज्ञानपणाचें आहे. कारण त्यांच्या ज्योतिर्मय शरीराच्या प्रकाशापुढें अंधकार टिकणार कसा? विद्येचा उपयोग ते करीत असतील तर ते निर्ग्रंथ कसले? जर ते अदृश्य असतात तर त्यांना दान तरी दात्याला कसें देता येईल? ते जेवीत असतांही दिसत नाहींत हें एक त्यांचें माहात्म्यच आहे असें ह्मणत असाल तर कवलाहार न करणें हाच अतिशय कां मानीत नाहीं, व्यर्थ खोट्या कल्पना कशाला करीत बसता? यास्तव आग्रह सोडून केवली कवलाहार करीत नाहींत हें मानणें योग्य आहे. वर सांगितलेल्या सर्व युक्तींनीं जिनेश्वर कवलाहार करीत नाहींत हें सिद्ध होतें. व ज्याअर्थी कवलाहार करीत नाहींत त्याअर्थी ते मनुष्य नाहींत. ते देवाधिदेवच आहेत हें सिद्ध होतें.

श्री जिनांना जन्म नसल्यामुळें मातेच्या गर्भातून ते उत्पन्न कसें झालें हें आचार्य या श्लोकांत दाखवितात.



स्वमातुरिह यद्यपि प्रभव इष्यते गर्भतो ।
मलैरनुपसंप्लुतो वरसरोजपत्रेऽम्बुवत् ॥
हिताहितविवेकशून्यहृदयो न गर्भेप्यभूः ।
कथं तव मनुष्यमात्रसदृशत्वमाशंक्यते ॥ २६ ॥

**अर्थः**—यद्यपि मातेच्या गर्भापासून श्री जिनेश उत्पन्न होतात, तथापि कमळ पत्रावरील पाण्याचा थेंब जसा निर्मळ असतो व चिखल शेवाळ इत्यादिकापासून तो जसा अलिप्त असतो तद्वत् मातेच्या उदरांतील मळांनीं हे जिनेश! आपण बिलकुल अस्पृष्ट आहात.

हे जिनेश! गर्भामध्येंही आपलें अंतःकरण हिताहिताच्या विचारानें शून्य-रहित नव्हतें. यास्तव आपण सर्व मनुष्याप्रमाणेंच आहांत अशी शंका मूर्ख लोक मनांत कशी बरें आणतात?

**विशेष स्पष्टीकरणः**—मागच्या श्लोकांत श्री जिनेंद्राला जन्म व मरण नाहीं असें सांगितलें आहे. तेथें त्यांनीं कर्म क्षय करून मुक्ति संपादन केली ह्मणून ते जन्मरहित आहेत. कर्मक्षय करण्याच्या पूर्वी मातेच्या उदरांतून नव मासांतीं त्यांचा जन्म झाला ह्मणून जिनेश्वराला जन्म आहे असेंही ह्मणतां येतें व कोणताच विरोधही भासत नाहीं. जरी ते आमच्याप्रमाणेंच मातेच्या उदरांतून निघालें तथापि ते आकाशांतून कमळ पत्रावर पडलेल्या हिमबिंदुप्रमाणें निर्मळ होते. मातेच्या पोटांत असलेल्या घाण पदार्थांशीं त्यांचा अणुमात्रही संबंध झाला नाहीं. आपण ज्यावेळेस गर्भांत येतो तेव्हांपासून नऊ महिनेपर्यंत मातेच्या पोटांतल्या घाण पदार्थामध्यें खिचपत पडलेले असतो. श्री जिनेश जेव्हां स्वर्गांतून अवतरून मातेच्या गर्भांत प्रवेश करतात तेव्हां देखील मति, श्रुति व अवधि ही तीन ज्ञानें त्यांना असतात ह्मणून हिताहितविचारशून्य नसतात. परंतु आपण गर्भांत असतांना अति अज्ञानी असतो. ज्ञानाची व आपली ताटातूटच झा-

लेली असते असें ह्मटलें तरी चालेल. यावरून जिनेश आणि आपण यामध्यें किती विषमता आहे हें सिद्ध होतें. असें असतांही जे जिनेश्वरास आपल्यासारखेच समजतात ते खरोखर मूर्ख आहेत, त्यांच्या या मूर्खपणाचे आपणास हंसू आल्यावांचून राहणार नाहीं.

जसा जिनेश्वरास जन्म नाहीं याचप्रमाणें त्यांना मृत्युही नाहीं हें आचार्य सांगतात.

न मृत्युरपि विद्यते प्रकृतमानुषस्येव ते
मृतस्य परिनिर्वृतिर्न मरणं पुनर्जन्मवत् ।
जरा च न हि यद्वपुर्विमलकेवलोत्पत्तितः ।
प्रभृत्यरुजमेकरूपमवतिष्ठते प्राङ्मृतेः ॥ २७ ॥

अर्थः—हे जिनेश! आपणांस सामान्य मनुष्याप्रमाणें मृत्यु देखील नाहीं. व अयोग केवली गुणस्थानांत बाकी राहिलेल्या कर्मांचा नाश करून जेव्हां शरीराचा कायमचा त्याग करतां त्यावेळेस आपण मोक्ष प्राप्ति करून घेतां. यावरून आपणास मरण नाहीं. एका शरीराचा त्याग करून दुसरें शरीर ग्रहण करण्याकरितां निघणें यास मृत्यु ह्मणतात. व अशा तऱ्हेचा मृत्यु पुनर्जन्माला कारण असतो. परंतु हे जिनेन्द्र, आपला मृत्यु—हा पुनर्जन्माला कारण नाहीं यास्तव आपल्या मरणाला 'मोक्ष प्राप्ति' हें नांव आहे. हे जिनेश! आपणास ह्मातारपणाही नाहीं घाति कर्ममळ रहित असें केवलज्ञान उत्पन्न झाल्यापासून मोक्षप्राप्ति होईपर्यंत आपलें शरीर निरोग असतें व तारुण्य, ह्मातारपणा वगैरे निरनिराळ्या विकारापासून दूर राहिलेलें असतें. अर्थात् तरुणपणा मोक्षप्राप्ति होईपर्यंत आपल्या शरीरांत असतो.

जिनेंद्रदेवाप्रमाणें भासणाऱ्या हरिहरादि देवांचें सुख व जिनेश्वराचें सुख यांत फार मोठें अंतर आहे. हें आचार्य सिद्ध करितात.



परैः कृपणदेवकैः स्वयमसत्सुखैः प्रार्थ्यते ।
सुखं युवतिसेवनादिपरसन्निधिप्रत्ययम् ॥
त्वया तु परमात्मना न परतो यतस्ते सुखम् ।
व्यपेतपरिमाणकं निरुपमं ध्रुवं स्वात्मजम् ॥२८॥

अर्थः—हरि, हर, ब्रह्मा इत्यादि देव हे दीन आहेत याचें कारण तुच्छ सुखाचीं तुच्छ साधनें जे स्त्रिया व पंचेंद्रियाचे विषय यामध्यें त्यांचीं हमेशा प्रवृत्ति दिसून येते. त्यांना आत्मिक सुखाचा गंध देखील माहीत नाहीं. ज्या तुच्छ सुखाचा ते उपभोग घेतात तें सुख स्त्रियांचा उपभोग घेणें व इन्द्रियें इत्यादि बाह्य पदार्थांपासून उत्पन्न होतें. यास्तव हे देव खरोखरच दुःखी आहेत. हे सुखाभासाच्या पाठीमागें लागलेले आहेत. परंतु हे जिनेश! असल्या सुखाची इच्छा आपणाकडून केली गेली नाहीं. आपणांस या बाह्य पदार्थांपासून सुख होत नाहीं, आपलें सुख अमर्याद आहे अर्थात् आपणांस अनंत सुख आहे. आपलें सुख सर्वोत्कृष्ट आहे ह्मणून आपल्या सुखास कोणाची उपमा देता येत नाहीं. आपलें सुख नित्य आहे ह्मणून तें मधून मधून दुःखांनीं अडवलें जात नाहीं. तसेंच आपलें सुख स्वतःपासून उत्पन्न झालें आहे, ह्मणून तें सुख बाह्य पदार्थ निरपेक्ष आहे. या विवेचनावरून दीन अशा हरिहरादिक देवांच्या सुखापेक्षां जिनेश्वराचें सुख फारच मोठें आहे व सर्वोत्कृष्ट आहे हें वाचकाच्या लक्षांत आलें असेलच.

महादेव हा आप्त नव्हे अर्थात खरा देव नव्हे, व त्याचीं कृत्यें दारु प्यालेल्या मनुष्याप्रमाणें आहेत हें या श्लोकांत आचार्य सांगतात.

पिशाचपरिवारितः पितृवने नरीनृत्यते ।
क्षरद्रुधिरभीषणद्विरदकृत्तिहेलापटः ॥
हरो हसति चायतं कहकहाट्टहासोल्बणम् ।

कथं परमदेवतेति परिपूज्यते पंडितैः ॥२९॥

**अर्थः**—पिशाचांनीं वेढलेला आणि ज्यांतून रक्त गळत असल्या-मुळें भयानक दिसणारें असें हत्तीचें चामड हेंच ज्याचें क्रीडेकरितां वस्त्र आहे असा महादेव स्मशानांत हमेशा नृत्य करीत असतो. दीर्घ व मोठा अट्टहासहि पण हा करीत असतो. अशा महादेवाला विद्वान् लोक हा देवाधिदेव आहे असें समजून याची कशी बरें पूजा करतील ? अर्थात् अशा महादेवाची मूर्ख लोकच पूजा करतील.

पुनः याच्या दुसऱ्या दुष्ट कृत्यांचा आचार्य उल्लेख करितात.

मुखेन किल दक्षिणेन पृथुनाखिलप्राणिनां ।
समत्ति शवपूतिमज्जरुधिरांत्रमांसानि च ॥
गणैः स्वसदृशैर्भृशं रतिमुपैति रात्रिंदिवं ।
पिबत्यपि च यः सुरां स कथमाप्तताभाजनम् ॥३०॥

**अर्थः**--अरेरे ! ! हा महादेव आपल्या उजव्या मोठ्या तोंडानें संपूर्ण प्राण्यांच्या शवांचे पू, मज्जा व रक्त, आंतडीं व मांस खात असतो. आणि आपल्या बरोबरीच्या भृंगी, भृंगा व रिटि वगैरे गणाबरोबर हमेशा क्रीडा करीत असतो. व रात्रदिवस दारुहि पितो. हा महादेव खरा देव कसा होऊ शकेल ?

वैशेषिकादिकांनीं ईश्वराचें जे गुण मानले आहेत त्यांचें आचार्य निराकरण करतात.

अनादिनिधनात्मकं सकलतत्वसंबोधनम् ।
समस्तजगदाधिपत्यमथ तस्य संतृप्तता ॥
तथा विगतदोषता च किल विद्यते यन्मृषा ।
सुयुक्तिविरहान्न चास्ति परिशुद्धतत्वागमः ॥ ३१ ॥

**अर्थः**—ईश्वर अर्थात् महादेव हा सर्व तत्वांना जाणतो, तो स-र्वज्ञ आहे व त्याचें सर्वज्ञत्व अनादि काळापासून आहे व त्याचा कधींही नाश होणार नाहीं; असें वैशेषिक नैयायिक वगैरे एकांत मतवादी लोक ह्मणतात. ईश्वर हा सर्वजगाचा मालक आहे, तो तृप्त आहे. तो निर्दोष आहे असें या वाद्यांचें ह्मणणें बिलकुल अ-सत्य आहे कारण त्यांचें ह्मणणें खोट्या युक्तींनीं भरलेलें आहे. चां-गल्या युक्ति त्यांच्या जवळ नाहींत. व ईश्वरानें लिहिलेलें शास्त्रही अ-बाधित तत्वांनीं भरलेलें नाहीं त्यानें केलेलें पदार्थाचें वर्णन प्रत्यक्षादि प्रमाणांनीं बाधित होतें.

विशेष स्पष्टीकरण ईश्वर सर्वज्ञ नाहीं कारण ज्या दैत्यांना आ-पण उत्पन्न केलें तेच आपल्या विरुद्ध वागतील असें जर त्यास मा-हीत असतें तर त्यानें त्यांना उत्पन्नच केलें नसतें. यावरून तो स-र्वज्ञ नाहीं. ज्यावेळेस भस्मासुरानें पार्वतीला उपटण्याचा प्रयत्न केला तेव्हां ईश्वर ह्मणविणार हा महादेव पळत सुटला होता यावरून हा सर्व जगाचा मालक कसला ? पंचेंद्रिय विषयांचा हा सतत उपभोग घेत असतो यावरून तो तृप्त नाहीं हें उघड आहे. तो दारू पितो, नाचतो, मांस खातो, नाना तऱ्हेच्या चेष्टा करतो ह्मणून तो निर्दोष नाहीं. यास्तव त्याचें ईश्वर हें नांव ' नांव मोठें पण लक्षण खोटें ' या ह्मणीला सार्थक करणारें आहे.



आतां हरि हर ब्रह्मा हे खरे देव नाहींत हें आचार्य या श्लोकांत सिद्ध करणार आहेत.

कमण्डलुमृगाजिनाक्षवलयादिभिर्ब्रह्मणः ।
शुचित्वविरहादिदोषकलुषत्वमभ्यूह्यते ॥
भयं विघृणताच विष्णुहरयोः सशस्त्रत्वतः ।
स्वतो न रमणीयता च परिमूढता भूषणात् ॥ ३२ ॥

**अर्थः**—कमण्डलु, हरिणाचें कातडें, जपमाला, इत्यादि चिन्हांनीं

ब्रह्मदेव पवित्र नाहीं. कृतार्थ नाहीं व सर्वज्ञ नाहीं हें दिसतें. अपवित्रता, अकृतार्थता व असर्वज्ञता हे दोष याच्या ठिकाणीं आहेत हे सिद्ध होतें. तें असें, ब्रह्मदेव पवित्र नाहीं कारण तो कमण्डलु आपल्या जवळ ठेवतो. तो कृतार्थ नाहीं कारण त्याच्या जवळ हरणाचें कातडें आहे. तो सर्वज्ञ नाहीं कारण तो जपमाळा धारण केलेला आहे. तो वीतराग नाहीं कारण कामपरतंत्र होऊन त्यानें स्वतःला चार तोंडें बनविलीं होती.

विष्णु व महादेव यांनीं हातांत शस्त्रें घेतलीं आहेत म्हणून त्यांना भीति आहे, व ते निर्दय आहेत असें अनुमान करतां येतें. व त्यांनीं आपलें शरीर डागिन्यांनीं सुशोभित केलें आहे यास्तव ते स्वभावतः सुंदर नाहींत असें ठरतें. स्वतः सुंदर नसून ही डागिण्यांनीं सुंदरपणा आणण्याचा ते प्रयत्न करीत असतात म्हणून ते मूर्खही आहेत.

ब्रह्मदेवाच्या अन्य मोहयुक्त कृत्यांचेंही आचार्य वर्णन करितात.

**स्वयं सृजति चेत्प्रजाः किमिति दैत्यविध्वंसनम् ।**
**सुदुष्टजननिग्रहार्थमिति चेदसृष्टिर्वरम् ॥**
**कृतात्मकरणीयकस्य जगतां कृतिर्निष्फला ।**
**स्वभाव इति चेन्मृषा स हि सुदुष्ट एवाप्यते ॥३३॥**

**अर्थः**—ब्रह्मदेव स्वतः जर जगत् उत्पन्न करितो तर दैत्यांचा नाश करण्याचें कारण काय ? दैत्य अतिशय दुष्ट आहेत व दुष्टांचें दमन केलेंच पाहिजे असें म्हणाल तर त्यांना उत्पन्न केलेंच नसते तर फार बरें झालें असतें. आपण ब्रह्मदेवास कृतकृत्य मानता अर्थात् त्यानें मोक्ष प्राप्ति करून घेण्याचें कार्य तडीस नेल्यामुळें त्याला आतां कांहीं करण्यासारखें उरलें नाहीं, यास्तव त्यानें जग निर्माण केलें हें व्यर्थ आहे. जग उत्पन्न करणें हा त्याचा स्वभावच आहे असें म्हणणें



खोटें आहे. कारण रागद्वेषादि दोषांनीं तो भरलेला आहे म्हणूनच तो जग उत्पन्न करितो, त्याचें रक्षण करतो व त्याचा पुनः विध्वंस करतो.

पुनः या देवांचे दोष दाखवितात व हे खरे देव नाहींत हें सिद्ध करतात.

**प्रसन्नकुपितात्मनां नियमतो भवेद्दुःखिता ।**
**तथैव परिमोहिता भयमुपद्रुतिश्चामयैः ॥**
**तृषापि च बुभुक्षया च नच संसृतिश्छिद्यते ।**
**जिनेंद्र भवतोऽपरेषु कथमाप्तता युज्यते ॥ ३४ ॥**

**अर्थः**—हरि, हर, ब्रह्मा हे प्रसन्न होतात व रागावतात यामुळें ते खात्रीनें दुःखी आहेत; कारण कोप व प्रसन्नता हे दोष रागद्वेषापासून उत्पन्न होतात यामुळें हे दोष ज्यांना आहेत ते सुखी नसतात. ह्या देवांच्या ठिकाणीं मोह व भीती हि आहे. निर्मोहपणा व निर्भयता हे आमच्यामध्यें नाहींत तद्वत हे दोन गुण यांच्यामध्येंही नाहींत. तसेंच या देवांना रोगांनींहीं घेरलें आहे, तहान व भूक ही यांना दुःख देत असतें. हे स्वतःच्या संसाराचा नाश करण्यास असमर्थ असल्यामुळें भक्त जनांचा संसार यांच्याकडून कधींही नाहींसा केला. जाणार नाहीं. यास्तव हे जिनेंद्र ! आपणांस सोडून या देवांमध्यें खरा देवपणा नाहीं.

यास्तव यांची सेवा, भक्ति केल्यानें नरकप्राप्तिच होणार हें आचार्य या श्लोकांत दाखवितात.

**कथं स्वयमुपद्रुताः परसुखोदये कारणं ।**
**स्वयं रिपुभयार्दिताश्च शरणं कथं बिभ्यताम् ॥**
**गतानुगतिकैरहो त्वदपरत्र भक्तैर्जनै—**

रनायतनसेवनं निरयहेतुरंगीकृतम् ॥३५॥

**अर्थ**—नाना दुःखांनीं स्वतः गांजलेले हे देव दुसऱ्यांना—भक्तांना सुखाची प्राप्ति करून देण्यामध्यें कारण कसें होऊं शकतील? स्वतः प्रचंड शत्रूंनीं पीडिल्यामुळें भीतीनें त्रस्त झालेले हे देव भ्याले-ल्याचें कसें संरक्षण करणार? खरोखर परीक्षा न करतां हे जिनेश, आपणांस सोडून या कुदेवांच्या भजनीं लागलेल्या या भक्तांनीं मिथ्या-दर्शन, मिथ्याज्ञान, व मिथ्याचारित्र आणि ह्या तीन दोषांचे धारक या सहा अनायतनांची सेवा करून नरकाची प्राप्ति यांनीं करून घेतली आहे.

आतां हिंसादि पांच पातकामध्यें प्रवृत्त झालेल्या प्राण्यांना पापबन्धच होतो हें दाखवितात.

सदा हननघातनाद्यनुमतिप्रवृत्तात्मनां ।
प्रदुष्टचरितोदितेषु परिहृष्यतां देहिनाम् ॥
अवश्यमनुषज्यते दुरितबंधनं तत्त्वतः ।
शुभेऽपि परिनिश्चितस्त्रिविधबंधहेतुर्भवेत् ॥३३॥

**अर्थः**—नेहमीं हिंसा करणें, हिंसा करणाऱ्यांस हिंसेमध्यें प्रवृत्त करणें, हिंसेचीं साधनें त्यांना जुळऊन देणें व हिंसा करणें चांगलें आहे असें अनुमोदन देणें. याचप्रमाणें खोटें बोलणें, चोरी करणें, परस्त्री सेवन करणें व परिग्रहाची मर्यादा न करणें हीं पातकेंही स्वतः करणें, करविणें, व अनुमोदन देणें या गोष्टीमध्यें जे प्राणी हमेशा प्रवृत्ति करितात व या दुष्ट कृत्यांचा उपदेश करण्यामध्यें ज्या प्राण्यांना आनंद वाटतो त्यांना खरोखर अवश्य पातकांचा बंध होतो. हीं पातकें केल्यानें कृत कारित व अनुमोदन या तीन प्रकारें पातकांचा बन्ध जसा पडतो; तसाच शुभ चांगलीं कृत्यें केल्यानें हि कृत कारित व अनुमोदन या तीन प्रकारें शुभ बन्धही खरोखर व अवश्य होतो. दान देणें, देव



गुरु शास्त्र यांची पूजा करणें, शील पाळणें, खरें बोलणें, चोरी न करणें परिग्रह मर्यादित ठेवणें, स्वस्त्री संतोष असणें ही शुभ कार्यें होत. हीं कार्यें स्वतः केल्यानें, करविल्यानें व अनुमोदन दिल्यानें पुण्य बंध अवश्य होतो.

जिनेन्द्रांनीं देवपूजा, दान वगैरे विधि करण्याचा उपदेश केला व या क्रिया करण्यामध्यें थोडीशी हिंसा हि होतें. अशा क्रियांच्या उपदेशानें त्यांना पापबंध कसा होत नाहीं या शंकेचें निराकरण आचार्य या श्लोकांत करितात.

विमोक्षसुखचैत्यदानपरिपूजनाद्यात्मिकाः ।
क्रिया बहुविधासुभृन्मरणपीडने हेतवः ॥
त्वया ज्वलितकेवलेन न हि देशिताः किंतु ताः ।
त्वयि प्रसृतभक्तिभिः स्वयमनुष्ठिताः श्रावकैः ॥३५॥

**अर्थः**—दान देणें, पंचपरमेष्ठींची पूजा करणें, मंदिर बांधणें इत्यादि क्रिया मोक्षसुखाची प्राप्ति करून देणाऱ्या आहेत. तथापि पुष्कळ त्रस व स्थावर जीवांचा वध होण्यास व त्यांना दुःख होण्यास ह्या क्रिया कारण आहेत. यास्तव हे जिनेश संपूर्ण पदार्थांना प्रकाशित करणाऱ्या केवल ज्ञानाचे धारक अशा आपणाकडून ह्या क्रिया सांगितल्या गेल्या नाहींत. या क्रियांचा आपण उपदेश केला नाहीं. परंतु आपल्या ठिकाणी गाढ श्रद्धा ठेवणाऱ्या श्रावक लोकांनीं या क्रियांचा प्रसार केला आहे, आर्यखंडांत दान देण्याच्या विधिचा प्रथम उपदेश श्रेयान् राजानें केला आहे. याच राजानें आदिनाथ महाराजांना आहार दान दिलें; चैत्यालयें बांधणें व चैत्यपूजा अर्थात् पंचपरमेष्ठींची पूजा करण्याची क्रिया भरत चक्रवर्तीनें प्रथमतः या आर्यखंडांत अमलांत आणिली आहे.

अथवा भव्य लोकांनीं या क्रिया कथञ्चिन्नित्य अशा आग-
मापासून जाणल्या हें आचार्य सांगतात.

त्वया त्वदुपदेशकारिपुरुषेण वा केनचित् ।
कथञ्चिदुपदिश्यते स्म जिन ! चैत्यदानक्रिया ॥
अनाशकविधिश्चकेशपरिलुंचनं चाथवा ।
श्रुतादनिधनात्मकादधिगतं प्रमाणांतरात् ॥ ३८ ॥

**अर्थः**—हे जिनेश ! आपण वर सांगितलेल्या क्रियांचा उपदेश केला; आणि उपवास करणें, सल्लेखना करणें व केशलोच करणें याही क्रियांचा आपण उपदेश केला. हा सर्व उपदेश व्यवहार नयानें अनुसरून केला आहे. तसेंच आपल्या उपदेशाला अनुसरणाऱ्या गणधर देवांनीं हा उपदेश केला आहे असें ह्मटल्यास ही कांहीं हरकत नाहीं. अथवा श्रावकांनीं अनादि निधन अशा आगमापासून हा सर्व विधि परोक्ष प्रमाणानें जाणला आहे.

वरील क्रियांचा उपदेश प्राणिहिंसेला कारण असल्यामुळें जिनेश्वरास पापबंध कसा होत नाहीं या शंकेचें निरसन
आचार्य या श्लोकांत करितात.

न चासुपरिपीडनं नियमतो शुभायेष्यते ।
त्वया नच शुभाय वा न हि च सर्वथा सत्यवाक् ।
न चापि दमदानयोः कुशलहेतुतैकांततो ।
विचित्रनयभंगजालगहनं त्वदीयं मतम् ॥३९॥

**अर्थः**—प्राण्यांच्या प्राणाची हिंसा ही नियमानें पापबंधालाच सर्वथा कारण होतें असें हें जिनेन्द्रा ! आपण सांगितलें नाहीं किंवा ती सर्वथा पुण्यबंधालाच कारण होतें असेंही पण आपण सांगितलें नाहीं अर्थात् खरें बोलण्यापासूनही पातक लागतें. इंद्रिय विजय करणें व दान देणें यापासून सर्वथा पुण्यच प्राप्त होतें असा एकांत वाद जिनेशा ! आपण



सांगितला नाहीं. वास्तव हे जिनेश ! नानातऱ्हेच्या नयांच्या विकल्पांच्या जाळ्यानें आपलें हें मत गुरफटलेलें आहे.

**विशेष स्पष्टीकरण**—हिंसा ही पापालाच कारण असतें असें मत चुकीचें आहे किंवा, हिंसा केल्यानें पुण्यच होतें हें ह्मणणें ही चुकीचें आहे. आपण अयत्नाचारानें अर्थात् बेसावधपणानें एखादे कृत्य करूं लागलों व त्यावेळेस हिंसा झाली असेल तर ती पापाला कारण होईलच परंतु हिंसा झाली नाहीं, एखादा प्राणी त्यावेळेस मेला नाही, तथापि आपल्या बेसावधपणानें आपण हिंसक होतोच. आपल्याला पापबंध होणारच. आणि आपण बेसावधपणानें वागत नाही जीवांचें संरक्षण व्हावें असा प्रयत्न करीत आहोत तथापि जर प्राण्याची हिंसा झाली तर ती हिंसा पापबंधाला कारण होत नाहीं. ईर्यासमितीनें मुनिराज गमन करीत असतां त्यांच्या पायाखालीं अकस्मात् एखादा प्राणी सांपडून मरण पावेल तर त्या प्राण्याच्या हिंसेचें पातक मुनिराजांना लागत नाहीं एवढेंच नव्हे तर त्याबद्दल त्यांना सूक्ष्म देखील पापबंध होत नाहीं असें जिनागमामध्ये ह्मटलें आहे. याविषयीं प्रवचनसार ग्रंथामध्यें असें ह्मटलें आहे:—

'उच्चालिदंमि पादे इरियासमिदस्स णिग्गमट्ठाणे ।
आवादेज्ज कुलिंगो मरेज्ज तज्जोगमासेज्ज ॥१॥
णहि तस्स तण्णिमित्तो बंधो सुहुमो वि देसिदो समये ।
मरदु व जियदु व जीवो अयदाचारस्य णिच्छिदा हिंसा
पयदस्स णत्थि बंधो हिंसामित्तेण समिदस्स ॥२॥

या दोन गाथांचा अभिप्राय वरच्या विवेचनामध्यें आला आहे. ज्यावेळेस आत्मा प्रमत्त होतो त्यावेळेस प्रथमतः त्याच्या स्वतःची हिंसा होतें अर्थात् परिणामामध्ये कषाय जागृत होतात यामुळें तो स्वतःचा हिंसक आहे तदनंतर तो इतर प्राण्यांची हिंसा करावयाला तयार होतो

परंतु ती होवो अथवा न होवो हा तर प्रथमतः हिंसक होतोच याच आशयाचा श्लोक एका ग्रंथकाराचा आहे तो असा—

स्वयमेवात्मनात्मानं हिनस्त्यात्मा प्रमादवान् ।
पूर्वं प्राण्यन्तराणां तु पश्चात्स्याद्वा न वा वधः ॥

जिनपूजा करणे, जिन मंदिर बांधणे, दान देणे; या क्रिया करण्यापासून जी हिंसा होते परंतु पुण्यबंध अतिशय होतो व पापबंध फारच कमी होतो, तो पापबंध "दर्यांत खसखस" या म्हणीच्या अर्थाचे अनुसरण करितो. एवढेच नव्हे तर ही हिंसा पुण्यबंधाली कारण होते असे म्हटल्यास हरकत नाही असे वाटते कारण अशा क्रियांमध्ये हिंसा करण्याचा अभिप्राय नसून ही क्रिया करण्याची उत्कटता असते. यामुळे ही होते असूनही पुण्यबन्धालाच कारण होते असे म्हटले आहे. ज्या क्रियेपासून फार पुण्य संचय होतो त्या क्रियांमध्ये थोडेसे पाप होत असले तरी त्यास पाप म्हणत नाहीत व अशा दृष्टीने पाहिल्यास हिंसा पुण्यबन्धाला कशी कारण होते हे वाचकांच्या लक्षात येईल. जिनपूजेकरिता पुष्पबाग लावणे, विहीर खोदणे ही कार्येही शुभ मानली आहेत. या विवेचनावरून हिंसा ही कशी पुण्यबन्धाला कारण होते हे सिद्ध केले. आता खरे भाषण हेही सर्वथा शुभबंधाला कारण होत नाही. जे भाषण प्राण्यांना संताप उत्पन्न करिते ते जरी खरे असले तरी हि ते असत्यच समजले पाहिजे व असले सत्य भाषण पापबंधाला कारण असल्यामुळे ते केव्हांही पुण्यबंधाला कारण होत नाही. म्हणून सत्य-भाषण हे सर्वदा पुण्यबंधाला कारण होते असे सांगणारा एकांतवाद खोटा आहे असे समजावे.

जे हिंसादि पापांचा निरोध करिते जे जीवाचे कल्याण करिते ते भाषण खोटे जरी असले तरी ते सत्पुरुषांना मान्य आहे व या भाषणापासून अहिंसाव्रतामध्ये निर्मलता उत्पन्न होते. अशा भाषणाला सत्य भाषण म्हणतात व हे भाषण पुण्यबंधाला कारण अवश्य होते



असे समजावे. आणि जर भाषण खरे असून व कल्याणकारकही असेल तर ते अवश्य पुण्यबंधाला कारण होईल.

दम म्हणजे इंद्रियविजय—अर्थात मन व इंद्रिये हीं ताब्यात ठेवणे यापासून हि सर्वथा पुण्यबंधच होतो असे नाही कारण इंद्रियदमन करण्याचा अभिप्राय नसल्यामुळे संक्लेशपरिणाम होतात त्यावेळेस इंद्रियदमन देखील पुण्यबंधास कारण न होता पापबंधालाच कारण होते. आणि जे इंद्रियदमन मनःपूर्वक होते व ज्यापासून संक्लेश परिणाम न होता उत्तरोत्तर परिणाम निर्मलता उत्पन्न होते ते मात्र शुभ परिणामाला कारण होते. उपवास करण्याने पांच ही इंद्रिये स्वाधीन राहतात परंतु क्रोधादि कषायवश होऊन केलेले इंद्रियदमन पापबंधाला कारण होते.

दान ही संक्लेश परिणामाने दिल्याने पापबंधाला कारण होते. जसजसे संक्लेश परिणाम वाढत जातात त्याप्रमाणे पापबंध जास्ती होत असतो. विशुद्ध परिणामाने दिलेले दान पुण्यास कारण होते. मग ते अपात्रास दिलेले असले तरी पुण्यबंधाला कारण होते. उत्तम पात्राला थोडेसे दान जरी दिले, व ते देताना परिणामामध्ये निर्मलता असेल तर अतिशय पुण्यबंध होतो यामुळे दान देखील पुण्याला व पापाला कारण होते.

जिनेश्वरांनी वर सांगितलेल्या क्रियांचा उपदेश केला परंतु तो करतांना त्यांच्या ठिकाणी कषायांचा उदय नव्हता यास्तव त्यांना पापबंध होत नाही हे सिद्ध होते.

जसे हरिहरादिकांनी सांख्यादिक आपआपल्या मताचा प्रसार केला तसा जिनेश्वरांनी देखील केला आहे अशा शंकेचे उत्तर आचार्य देतात,

त्वयापि सर्वज्ञजिनाथमिह शासनं चक्रे ।
कथं सकलसंग्रहत्यजनशासिता युज्यते ॥

**तथा निरशनार्धभुक्तिरसवर्जनाद्युक्तिभि-**
**र्जितेन्द्रियतया त्वमेव जिन इत्यभिख्यां गतः ॥४०॥**

**अर्थः**–हे जिनेश ! सुखानें राहता यावें ह्मणून आपण जर आपल्या मताचा उपदेश केला आहे; तर संपूर्ण परिग्रहांचा त्याग करण्याचा उपदेश देणें आपणास कसें बरें योग्य वाटलें ? हे जिनेश ! उपवास, ऊनोदर अर्थात् पोट भरून न जेवणें, एक दोन तीन वगैरे रसांचा त्याग करणें यास रसपरित्याग ह्मणतात. व दुर्धर कायक्लेश वगैरे करण्याचा आपण उपदेश केल्यानें व आपण आपलीं इंद्रियें पूर्ण ताब्यांत ठेविल्यानें ' जिन हें सार्थक नांव आपणच प्राप्त करून घेतलें आहे.

विशेष स्पष्टीकरण—हरिहरादिकांनीं सांसारिक सुखाची प्राप्ति होण्याचा उपदेश करून आपल्या मताचा प्रसार केला आहे. याचें कारण ते स्वतः सांसारिक सुखामार्गें लागलेले होते. परंतु जिनेश्वरांनीं मात्र जगाचें वास्तविक कल्याण होण्याकरितां मुक्तिमार्गाचा उपदेश केला आहे. व स्वतः त्यांनीं इंद्रियें ताब्यांत ठेविलीं, कर्मशत्रूंचा नाश केला, व मुक्ति प्राप्त करून घेतली यामुळेंच ' जिन ' हें सार्थक नांव यांनीं प्राप्त करून घेतलें. यावरून सुखाचा वास्तविक उपदेश यानींच दिला असें सिद्ध होतें. व हरिहरादिकांनीं सुखाभासाचा उपदेश दिला हें सिद्ध होतें.

हे जिनेश, आपल्या मताचें अनुसरण करणाऱ्या कित्येक लोकांनीं
[ श्वेताम्बरलोकांनीं ] परिग्रहांचा अंगीकार केला आहे व आपण
संपूर्ण परिग्रहांचा त्याग करावयास सांगितला आहे या-
मुळें आपलें सांगणें विरुद्ध कसें बरें नाहीं या
शंकेचें उत्तर आचार्य देतात.

**जिनेश्वर, न ते मतं पटकवस्त्रपात्रग्रहो ।**
**विमृश्य सुखकारणं स्वयमशक्तकैः कल्पितः ॥**



**अथायमपि सत्पथस्तव भवेद्वृथा नग्नता ।**
**न हस्तसुलभे फले सति तरुः समारुह्यते ॥ ४१ ॥**

**अर्थः**—हे जिनेश्वर, कांबळीं धारण करणें कापसाचें वस्त्र जवळ ठेवणें व भिक्षापात्र जवळ राखणें या गोष्टींचा उपदेश करणारें तुझें मत नव्हें. शीत, उष्ण इत्यादि बाधा सहन करण्याचें सामर्थ्य नसलेल्या लोकांनीं ( श्वेतांबरांनीं ) हा परिग्रह सुखकर आहे असें समजून तो घेण्याचा उपदेश केला आहे. परिग्रह जवळ ठेवणें हें जर मोक्षाला कारण असेल तर हे जिनेश ! आपण केलेला सर्व परिग्रहत्याग व्यर्थ आहे असें ह्मणावें लागेल कारण जमिनीवरच उभा राहून जर हातानें झाडाचें फळ सहज घेतां येईल तर झाडावर चढण्याचे श्रम कशास करावयास पाहिजेत. तात्पर्य—परिग्रह जर मोक्षास कारण असेल तर सर्व परिग्रह त्याग करण्याची जरूरत काय ?

विशेष स्पष्टीकरण— परिग्रह धारण करण्याचा उपदेश जिनेश्वरांनीं केला नाहीं. तथापि श्वेतांबर साधु परिग्रह धारण करतात हे अयोग्य आहे. वस्त्र घेणें, भिक्षापात्र जवळ बाळगणें या बाह्य परिग्रहावरून शरीरावर ममत्व आहे असें सिद्ध होतें व ममत्व हा अंतरंग परिग्रह आहे. शरीराच्या उष्णतेनें वात कायिकादि जंतूंची हिंसा होते ती होऊं नये ह्मणून शरीरावर ममत्व नसतांहि वस्त्र ग्रहण करावें लागतें असें ह्मणू नये. मुनींच्या अठ्ठावीस मूल गुणांपैकीं नग्न असणें अर्थात् कोणतें ही वस्त्र न घेणें हेंही मूलगुणांपैकींच आहे. अठ्ठावीस मूलगुण देखील अहिंसाव्रताच्या संरक्षणासाठींच सांगितलें आहेत. जर वस्त्र घेतल्यानें वातकायिक जीवांचीं हिंसा होत नाहीं ह्मणाल तर या मूलगुणाचें पालन केल्यापासून हिंसा होऊं लागेल. यास्तव आपलें हें ह्मणणें योग्य नाहीं. नग्नता ही मोक्षास कारण आहे असें मानता येणार नाहीं. यामुळें अरहंतांना मोक्षाची प्राप्ति होणार नाहीं

व ते मोक्षाचा [illegible] वस्त्र धारण कर-णाऱ्यास [illegible] मोक्ष प्राप्ति [illegible]

वस्त्र घेतलें तरी या जीवांचें संरक्षण होईल काय ? होणार नाहीं. वस्त्रानें शरीराचे सर्व अवयव झाकतां येणार नाहींत. हात, पाय, तोंड, डोळे वगैरे अवयव उघडेच राहणार व त्या सूक्ष्म जीवांच्या वगैरे त्या जीवांची हिंसा होणार तिचा परिहार कसा करूं शकाल ? वस्त्र धारण केल्यानें उवा, लिखा, ढेकूण वगैरे संमूर्छन जीवांची उत्पत्ति होणार. कारण वस्त्र हें या जीवांच्या उत्पत्तीस आधार आहे. तथापि वस्त्राचा स्वीकार केल्यास वेगळेच वगैरे कितीक करावे लागणार नाहींत. कारण केस देखील उवा व लिखा उत्पन्न होण्याचें स्थान आहे. वस्त्र आकुंचित करण्यापासून वगैरे वगैरे पासून उत्पन्न झालेल्या वाऱ्यानें सभोंवती आकाशांत असलेल्या जंतूंना इजा—दुःख होणार. यावरून वस्त्र घेतल्यानें हिंसा होते हें सिद्ध झालें. वस्त्र घेतल्यास वातकायिकादि जंतूंची हिंसा होत नाही यास्तव वस्त्र घेणें योग्य आहे असें ह्मणाल तर विहार देखील करूं नये कारण विहार केल्यानें अनेक प्राण्यांची हिंसा होणार तो विहार न केल्यास चालायचें नाहीं. सावधगिरीनें गमन केल्यास हिंसा होत नाहीं असें ह्मणाल तर वस्त्र धारण करण्यानें ही हिंसा होत नाहीं असें कां ह्मणत नाहीं ? वस्त्र धारण करण्याचा हट्ट कां करितां ? यावरून वस्त्र ग्रहण करण्यानें शरीरावर ममत्व आहे हें सिद्ध होतें.

नग्न राहण्यांत लाज वाटते. ती दूर व्हावी यासाठीं वस्त्र घ्यावें ममत्व परिणामावांचून नाहीं वस्त्र घेणें येथें हें ह्मणणें योग्य नाहीं. कां मंदतेमुळें मिळावी ह्मणून वस्त्राचें ग्रहण करण्यामध्यें हि मूर्च्छा न हो— ममत्व परिणाम नाहीं असें कां ह्मणतां येणार नाहीं ? वस्त्राचें ग्रहण केल्यानें तिच्यांत अभिलाषा उत्पन्न होते व अभिलाषा ह्मणजे मूर्च्छा होय असें ह्मणाल तर वस्त्र ग्रहण करण्यामध्यें ही अभिलाषा नाहीं



काय ? स्त्रीचें ग्रहण कामामध्यें [illegible] अभिलाषा असते तसें वस्त्र ग्रहण करण्यांत [illegible] अभिलाषा [illegible] वस्त्र ग्रहण करण्याची इच्छा उत्पन्न होते [illegible] उदय झाला ह्मणजे इच्छा उत्पन्न होणारच व त्यामुळें वस्त्र ग्रहण करण्यासंबंधी अभिलाषा आहे हें सिद्ध होतें. गुह्यांगाचें दर्शन झाल्यानें स्त्रियांच्या मनांत कामवासना उत्पन्न होते. ती व्हावी यासाठीं वस्त्र घेतलें पाहिजे हें ह्मणणें हि योग्य नव्हे. त्यांना कामवासना होऊं नये या निमित्तानें वस्त्र घेतल्यानें तें घेण्याची इच्छा उत्पन्न होते, तसेंच डोळे, नाक, तोंड हे सुंदर अवयव पाहिल्यानें ही स्त्रियांच्या मनांत कामवासना उत्पन्न होईल यासाठीं ते प्रत्येक अवयव झाकण्याकरितां हि वस्त्र घ्यावें लागेल. पडलेलें वस्त्र आपल्या हातानें बुद्धिपुरःसर घेऊन तें प्रांवरणारा मनुष्य मी वस्त्रा-विषयीं निरिच्छ आहे असें ह्मणण्याचें धाडस तरी कसें करतो हें सम-जत नाहीं. स्त्रीला आलिंगन देऊनही तिच्या बद्दल मी निरिच्छ आहे असें ह्मणण्याप्रमाणेंच [illegible] आहे. या विवेचनावरून अभिलाषा-वांचून वस्त्र धारण करणें संभवत नाहीं हें सिद्ध झालें. अभिलाषा हा वस्त्राच्या अभावीं देखील संभवतो.

पिंछी वगैरे ग्रहण करण्यामध्यें ही अभिलाषा उत्पन्न होते असें जर ह्मणाल तर परम निर्ग्रंथता ज्यावेळेस प्राप्त होते, परिहारविशुद्धि संयमाची ज्यावेळेस प्राप्ति होते त्यावेळेस पिंछी वगैरेचा त्याग होतो. सूक्ष्मसांपराय व यथाख्यात चारित्राचे धारक मुनीश्वरहि यांचा त्याग करितात. सामायिक व छेदोपस्थापन या दोन चारित्रामध्यें जेव्हां मुनी-श्वर असतात तेव्हां पिंछी वगैरे चारित्राचे साधक असल्यामुळें ग्रहण करणें भाग आहे व त्यांच्यामध्यें मुनीश्वरांची सूक्ष्म अभिलाषा असते हें आह्मी कबूल करतो. पिंछी धारण करणें हें त्या अवस्थेंत चारित्राचें विघातक होत नाहीं. तीन चार मोराचे पंख घेणें व भोपळ्याचा कमं-

डलु घेणें हें त्या अवस्थेंत अयोग्य नाहीं. ज्यांना किंमत पडते अशा तऱ्हेचा कमंडलु किंवा असली पिंछी घेणें हें योग्य नाहीं. सिद्धांतामध्यें असलें कृत्य अयोग्य आहे असें सांगितलें आहे.

शरीर टिकून राहण्यासाठीं मुनिजन आहार घेतात यावरून शरीरावर त्यांचें प्रेम आहे हें सिद्ध होतें. असें ह्मणणेंही अयोग्य आहे. कारण मुनिजन रत्नत्रयाराधना चांगल्या रीतीनें व्हावी यासाठीं आहार घेतात. सर्व दोष टाळून शुद्ध आहार घेतात यास्तव त्यांच्या रत्नत्रयांचा नाश होत नाहीं. या सर्व विवेचनानें परिग्रह धारण करण्याचा उपदेश श्री जिनेंद्रांनीं केला नाहीं हें सिद्ध होतें.

परिग्रहसहित चारित्रामध्यें दुसरेही दोष असतात हें
आचार्य दाखवितात.

**परिग्रहवतां सतां भयमवश्यमापद्यते ।**
**प्रकोपपरिहिंसने च परुषानृतव्याहृती ॥**
**ममत्वमथ चोरतः स्वमनसश्च विभ्रांतता ।**
**कुतो हि कलुषात्मनां परमशुक्लसद्ध्यानता ॥४२॥**

**अर्थः** परिग्रह धारण करणाऱ्यांना चोरापासून अवश्य भीति उत्पन्न होतें. व त्यानें वस्तु चोरल्यामुळें त्याच्यावर क्रोध उत्पन्न होतो आणि त्याला ठार हि मारतात. परिग्रहाचें संरक्षण करण्याबद्दल कठोर भाषण करावें लागतें व खोटें बोलावें लागतें. परिग्रहापासून अभिलाष वाढत जातो माझ्यावस्तु चोर चोरील ह्मणून हमेशा मन साशंक असते. आणि वस्तु कशा मिळवाव्यांत व त्यांचें संरक्षण कसें करावें याबद्दलचे विचार हमेशः मनांत घोळत असतात. या परिग्रहानें ज्यांचा आत्मा कलुषित झाला आहे अशांना उत्कृष्ट शुक्ल ध्यानाची प्राप्ति कशी होणार ?



परिग्रहानें आणखी कोणते दोष उत्पन्न होतात हें आचार्य दाखवितात.

**स्वभाजनगतेषु पेयपरिभोज्यवस्तुष्वमी ।**
**यदा प्रतिनिरीक्षितास्तनुभृतः सुसूक्ष्मात्मकाः ॥**
**तदा कचिदपोज्झने मरणमेव तेषां भवे- ।**
**दथाप्यभिनिरोधनं बहुतरात्मसम्मूर्च्छनम् ॥ ४३ ॥**

**अर्थः**—भिक्षापात्रामध्यें असलेले कढी आमटी लाडू वगैरे पदार्थामध्यें जेव्हां सूक्ष्म जंतु झालेले दिसतात. तेव्हां ते जंतु एखाद्या ठिकाणीं टाकल्यास त्यांचें अवश्य मरण होतें. आणि पात्र, वस्त्र इत्यादिकांनीं त्यांना दूर करण्याचा प्रयत्न केला तर पुष्कळ सम्मूर्च्छन जीवांची उत्पत्ति होतें. तात्पर्य—भिक्षापात्र मुनींनीं आपल्या जवळ ठेवणें अनुचित आहे, तसें केल्यानें त्यांचें अहिंसा महाव्रत भंग पावेल, कारण भिक्षा पात्रांत ठेवलेल्या पदार्थापासून जंतूंचीं उत्पत्ति होईल. व ते दूर करीत असतांना मरण पावल्यानें हिंसेचें पातक बोकांडी बसल्याशिवाय राहणार नाहीं.

परिग्रह न ठेवणाऱ्या दिगंबर जैन साधूंना देखील ईर्यापथ
शोधन करीत चालले असतां तसेच इतर क्रिया करीत
असतां पुष्कळ जीवांची हिंसा झाल्यानें पुष्कळ
कर्मांचें आगमन होईल. यामुळें मोक्षप्राप्ति हो-
णार नाहीं या शंकेचें आचार्य उत्तर देतात.

**दिगंबरतया स्थिताः स्वभुजभोजिनो ये सदा ।**
**प्रमादरहिताशयाः प्रचुरजीवहत्यामपि ॥**
**न बंधफलभागिनस्त इति गम्यते येन ते ।**
**प्रवृत्तमनुबिभ्रति स्वबलयोग्यमद्याप्यमी ॥ ४४ ॥**

**अर्थः**—दिगंबर जैन साधूंना आकाश हेंच वस्त्र असतें. अर्थात् निर्ग्रंथ स्वरूपाला ते धारण करतात. हमेशा ते आपल्या हाता-

मध्येंच जेवतात. अर्थात् भिक्षापात्र जवळ ठेवीत नाहींत. हात हेंच त्यांचें पात्र होय. हमेशा १५ प्रमादांनीं त्यांचें अंतःकरण रहित असतें यामुळें त्यांचे हातून पुष्कळ जीवांची हिंसा झाली तरी त्यांना कर्मबंध होत नाहीं. प्रमादांनींरहित असल्यामुळें, दिगंबर असल्यामुळें प्राचीन महर्षींनीं जसें उत्कृष्ट--निर्दोष चारित्र पाळलें तसेंच अद्यापि देखील---या पंचम कालांत देखील आपल्या शक्त्यनुरूप दिगंबर जैन साधु उत्तम चारित्र पाळींत असतात.

**तात्पर्य**—दिगंबर जैन साधु प्रमादरहित असल्यामुळें जीवांची हिंसा झाली तरी त्यांना कर्मबंधन होत नाहीं. ईर्यापथिक आस्रवापासून त्यांना कर्माचा बंध होतो. तथापि तो स्थिति व अनुभागरूपाचा होत नाहीं. वाळलेल्या भिंतीवर वाळू फेकली तरी ती जशी खालीं पडते. त्या भिंतीला चिकटून बसत नाहीं. याचप्रमाणें प्रकृति प्रदेशरूपानें बांधले गेलेले कर्म आत्म्याला फळ देत नाहीं यामुळें त्यांना बंधाचें फल मिळत नाहीं. यामुळें पापबंध होत नाहीं.

यांचें अंतःकरण प्रमादरहित असतें तथापि यांच्यापासून
थोडीशी प्राणिपीडा होत असते असें
ह्मणणाऱ्यास आचार्य उत्तर देतात.

**यथागमविहारिणामशनपानभक्ष्यादिषु ।**
**प्रयत्नपरचेतसामविकलेन्द्रियालोकिनाम् ॥**
**कथंचिदसुपीडनाद्यदि भवेदपुण्योदय—**
**स्तपोऽपि वध एव ते स्वपरजीवसन्तापनात् ॥४५॥**

**अर्थः**—दिगंबर जैन साधु आगमामध्यें सांगितलेल्या विधीस न उल्लंघिता तीर्थवंदनादिक विधि करण्यासाठीं विहार करीत असतात. अन्न, पिण्याचे पदार्थ व लाडू वगैरे पदार्थ हे नीट पाहून खात असतात. यामध्यें बिलकुल असावधगिरी ते ठेवीत नाहींत. तसेंच बसणें, उठणें, निजणें या क्रिया करतांना त्यांच्या अन्तःकरणांत असावधानता



शिरलेली नसते. सूक्ष्म पदार्थ पाहण्यास समर्थ असलेल्या डोळ्यानें हमेशा ते पहात असतात. तथापि त्यांच्याकडून प्राण्यांना दुःख पोहोचतें व त्यापासून साधूंना पाप बंध होतो असें जर ह्मटलें तर हे जिनेश! आपणाकडून सांगितले गेलेलें बारा प्रकारचें तपश्चरण देखील हिंसेलाच कारण आहे असें ह्मणावें लागेल. कारण तें केल्यापासून आत्म्याला व शिष्याकडून करविल्यास त्यांना दुःख होतें.

**तात्पर्यः**—बेला, तेला वगैरे उपवास करण्यानें जशी स्वतःला वेदना होते तशीच स्वतःच्या शरीराच्या आधारानें असलेल्या जीवांना देखील होते यास्तव पापबंध होतो असें ह्मणणें रास्त नाहीं. कारण आचार्य हे शिष्यांना सन्मार्गी लावण्यासाठीं तपश्चरण, व्रतें वगैरे क्रिया त्यांना करावयास लावीत असतात व स्वतःहि या क्रिया करीत असतात. ह्मणून ते पापयुक्त होतात असें कोण ह्मणूं शकेल. आचार्य स्वतः संसाराचा नाश करण्याचा प्रयत्न करितात व शिष्यांना तो करण्यास उद्युक्त करीत असतात यामुळें त्यांना पापबंध होत नाहीं. जसा एखादा वैद्य रोग्याला वांतीचें, जुलाबाचें औषध देऊन वांती व जुलाब करवितो; असें करण्यांत त्या वैद्याचा दुष्ट अभिप्राय नसतो. याप्रमाणेंच आचार्यांचाही चांगलाच अभिप्राय असल्यामुळें ते दोषी होऊं शकत नाहींत अन्यथा जिनेश्वरांनींहि तपश्चरणाचा उपदेश केल्यामुळें तेही दोषी आहेत असें मानावें लागेल.

जमीन, हवा, पाणी व अग्नि यांच्यांत नियमानें सम्मूर्च्छन
जीवांची उत्पत्ति होते यास्तव खाणें, पिणें, विहार
इत्यादि क्रिया आगमाविरुद्ध करीत असतांहि साधूंना हिंसा झाल्यामुळें
अहिंसक कसें ह्मणतां येईल.
या शंकेचें उत्तर
आचार्य देतात.

मरुज्ज्वलनभूपयःसु नियमात्कचिद्युज्यते ।
परस्परविरोधितेषु विगतासुता सर्वदा ॥
प्रमादजनितागसां क्वचिदपोहनं स्वागमात् ।
कथं स्थितिभुजां सतां गगनवाससां दोषिता ॥४६॥

**अर्थः**—हवा, अग्नि, जमीन व पाणी यांच्यामध्यें कोठें कोठें नियमानें बिलकुल नेहेमी निर्जीवपणा आढळून येतो. अर्थात् यांच्यापासून कोठें कोठें सम्मूर्च्छन जंतूंची उत्पत्ति होत नाहीं. प्रमादानें कदाचित् प्राण्यांना साधुजनांकडून बाधा पोहोंचली असतां जिनप्रणीत शास्त्रांत सांगितलेलें दोषानुरूप प्रायश्चित्त घेऊन ते पापाचें शोधन करितात. रत्नत्रयाचे धारक असे मुनि उभे राहून उद्गमादि दोषरहित असा शुद्ध आहार घेतात. असें असतां या दिगंबर मुनीना हिंसादिकांचा दोष कसा लागेल बरें ? अर्थात् दिगंबर जैन साधु हिंसादि दोषापासून दूर राहतात हें सिद्ध होतें.

मोक्षप्राप्तिसाठीं विद्वान् पुरुष प्रयत्न करितात. मोक्षाचें स्वरूप अन्यमतांत व हे जिनेंद्र, आपल्या मतांत कसें सांगितलें आहे ? या प्रश्नाचें उत्तर—

परैरनघनिर्वृतिः स्वगुणतत्वविध्वंसनं ।
व्यघोपि कपिलादिभिश्च पुरुषार्थविध्वंसनम् ॥
त्वया सुमृदितैनसा ज्वलितकेवलौघश्रिया
ध्रुवं निरुपमात्मकं सुखमनन्तमव्याहतम् ॥ ४७ ॥

**अर्थः**—घातिकर्मरूपी पापापासून रहित असलेल्या हे जिनेंद्रा ! वैशेषिक व नैयायिक यांनीं बुद्धि सुख वगैरे आत्म्याच्या नऊ गुणांचा नाश झाला म्हणजे मुक्ति प्राप्त होतें असें सांगितलें आहे. आत्म्याचा नाश झाला म्हणजे मोक्ष प्राप्त होतो असें बौद्ध म्हणतात. अर्थात् आत्मनाश होणें हा बौद्धाच्या मतें मोक्ष होय. बुद्धि वगैरे गुणांचा



नाश होणें हा नैयायिक व वैशेषिक यांच्या मतें मोक्ष होय. कपिल ऋषींनीं सुखाचा नाश होणें हा मोक्ष होय असें म्हटलें आहे. कारण सुख हा आत्मस्वभाव नाहीं, तो प्रकृतीचा स्वभाव आहे असें ते म्हणतात. आत्म्याचा शुद्ध चैतन्यमय स्वभाव आहे, असें त्यांनीं प्रतिपादिलें आहे. उत्तम रीतीनें घातिकर्मांचा नाश ज्यांनीं केला आहे व प्रकाशमान केवलज्ञानाच्या अविच्छिन्न प्रवाहाला ज्यानें धारण केलें आहे अशा हे जिनेंद्रा ! नित्य, उपमारहित, अनंत, दुःखादि दोषांनीं रहित असें सुख प्राप्त होणें हा मोक्ष होय असें आपण सांगितलें आहे.

**विशेष स्पष्टीकरण**—सर्वथा ज्ञानादि गुणांचा आत्म्यापासून विरह झाला तर आत्मा हा अचेतनच होईल. अचेतन पदार्थ व आत्म्यामध्ये फरकच दिसून येणार नाहीं. यास्तव ज्ञानादि गुणांचा अभाव झाल्यानें मोक्ष प्राप्त होतो हें म्हणणें अयोग्य आहे, ज्ञानावरण दर्शनावरण या कर्मांचा क्षयोपशम झाल्यानें जें ज्ञान व दर्शन प्राप्त होतें, त्यांचा अभाव झाला म्हणजे मुक्ति प्राप्त होते असें म्हणाल तर हें म्हणणें योग्य होईल. कर्मांचा क्षय होऊन ज्ञान, दर्शन, सुख व वीर्य या गुणांची प्राप्ति होते व यांचा नाश होत नाहीं. औपशमिक क्षायोपशमिक, औदयिक व पारिणामिक असे जे जीवाचे विलक्षण भाव होत होते त्यांचा मात्र नाश होतो. परंतु केवल ज्ञान, केवल दर्शन, सिद्धत्व, सम्यक्त्व यांचा नाश होत नाहीं. संपूर्ण दुःखाचा पूर्ण अभाव होणें यास सिद्धत्व म्हणतात. हें सिद्धत्वच अनंत सुख होय, सांसारिक सुखाचा अभाव मोक्षामध्यें होतो हें म्हणणें योग्य आहे. परंतु सुख गुणाचा नाशच होतो हें म्हणणें अयोग्य आहे.

दिव्याचा जसा नाश होतो तसा आत्म्याचा नाश होतो आणि असें झालें म्हणजे आत्म्याला मोक्ष झाला असें बौद्ध म्हणतात. पण हें म्हणणें केव्हांच योग्य नाहीं कारण आत्म्याचा नाश झाल्यावर मोक्ष

कोणास प्राप्त होतो हें कळत नाहीं. सुख आत्म्याचा स्वभाव नाहीं तो प्रकृतीचा स्वभाव आहे असें कापिल ह्मणतात. परंतु प्रकृति अचेतन आहे. आत्मा चैतन्ययुक्त आहे असें त्यांनीं ह्मटलें आहे. जर प्रकृति अचेतन आहे तर सुख तिचा स्वभाव होणार नाहीं. जितके अचेतन पदार्थ आपण पाहतो ते सुखी आहेत असें आपणांस वाटतें काय ? अचेतन पदार्थांत सुख व दुःख हे केंव्हांही आढळून येणार नाहीं. प्रत्येक प्राण्यामध्यें 'अहं सुखी' ही भावना जागृत हमेशा असते. केवळ आत्मा चेतन केंव्हांही असत नाहीं त्या चैतन्यामध्यें ज्ञान दर्शन, सुख हें सर्व साठलेलें आहे. यास्तव सुख हा प्रकृतीचा धर्म नाहीं तो आत्म्याचा धर्म आहे व मोक्षामध्यें केवळ चैतन्य नसतें तर तें चैतन्य सुख, ज्ञान. दर्शन वीर्य इत्यादि गुणांनीं भरलेलें असतें. या सर्व गुणांनीं तें भरलें ह्मणजे मोक्ष प्राप्त होतो. यास्तव श्रीजिनांनीं जें मोक्षाचें स्वरूप सांगितलें तेंच खरें आहे हें सिद्ध होतें.

बौद्धांनीं मोक्षाचें स्वरूप कसें मानलें आहे व जिनमतामध्यें मोक्ष स्वरूप कसें सांगितलें आहे हें आचार्य सांगतात.

**निरन्वयविनश्वरी जगति मुक्तिरिष्टा परैः ।**
**न कश्चिदिह चेष्टते स्वव्यसनाय मूढेतरः ॥**
**त्वया नु गुणसंहतेरतिशयोपलब्ध्यात्मिका ।**
**स्थितिः शिवमयी जिन ! प्रवचने तव व्यापिता ॥**

**अर्थः**—बौद्धांनीं आत्म्याचा सर्वथैव नाश होणें यास मोक्ष असें ह्मटलें आहे. परंतु कोणताहि विद्वान् मनुष्य स्वतःला दुःख प्राप्त व्हावें ह्मणून प्रयत्न करीत असलेला आढळून येणार नाहीं. याचप्रमाणें मोक्षाची प्राप्ति आत्म्याचा नाश झाला ह्मणजे होणार व नाश होणें हें दुःखावह आहे यास्तव असला मोक्ष मानणें हें मूर्खपणाचें आहे. परंतु हे जिनेश ! आपण सम्यक्त्वादिक आठ गुणांची प्राप्ति होण्यापासून उत्पन्न झालेलें चौतीस अतिशय हेच जीवाचें स्वरूप आहे अशी सुख-



मय स्थिति प्राप्त होणें यास आपल्या आगमामध्यें मोक्ष असें ह्मटले आहे.

आतां आचार्य जिनेन्द्राच्या गुणांच्या स्तुतीचें माहात्म्य दाखवितात—

**इत्यपि गुणस्तुतिः परमनिर्वृतेः साधनी**
**भवत्यलमतो जनो व्यवसितश्च तत्कांक्षया ।**
**विरंस्यति च साधुना रुचिरलोभलाभे सताम्**
**मनोभिलषिताप्तिरेव ननु च प्रयासावधिः ॥४९॥**

**अर्थ**—जिनेश्वराच्या गुणांची स्तुति उत्कृष्ट सुखाच्या प्राप्तीचें साधन आहे. यास्तव या उत्कृष्ट सुखाच्या आशेनें उद्युक्त झालेल्या माझी स्तुति तें उत्कृष्ट सुख देण्यास समर्थ होईल. त्या उत्कृष्ट सुखाविषयींची प्रीति तें सुख प्राप्त झाल्यामुळें आतां विराम पावत आहे. बरोबरच आहे. सत्पुरुषांच्या प्रयत्नाची मर्यादा त्यांच्या मनांत इच्छिलेल्या वस्तूची प्राप्ति होईपर्यंत असते.

जोपर्यंत अभीष्ट वस्तु मिळत नाहीं तोपर्यन्त सत्पुरुषांचे प्रयत्न सारखे चालू असतात. ती वस्तु प्राप्त झाली ह्मणजे ते प्रयत्न विश्राम पावतात. याचप्रमाणें ग्रंथकारास उत्कृष्ट सुखाची प्राप्ति झाल्यामुळें तो ही गुणस्तुति समाप्त करीत आहे.

आचार्यांचें जिनेश्वराजवळ शेवटचें मागणें

**इति मम मतिवृत्त्या संहतिं त्वद्गुणाना—**
**मनिशममितशक्त्या संस्तुवानस्य भक्त्या**
**सुखमनघमनन्तं स्वात्मसंस्थं महात्मन्**
**जिन ! भवतु महत्या केवलश्रीविभूत्या ॥ ५० ॥**

**अर्थः**—हे महात्मन् जिना ! अपार सामर्थ्य संपन्न अशा तुझ्या गुणांच्या समूहाची बुद्ध्यनुसार व भक्तीनें स्तुति करणाऱ्या मला मोठ्या

केवलज्ञानरूपी लक्ष्मी बरोबर निर्मल, अविनाशी आत्मस्वरूपामध्यें सदा विराजमान होणारे असें मोक्षसौख्य मिळो.

तात्पर्य—तुझ्या गुणवर्णनानें केवलज्ञानाची मला प्राप्ति होवो व अंतीं मोक्षसुख मिळो अशी आचार्यांनीं जिनेश्वरांजवळ प्रार्थना केली आहे.

याप्रमाणें निखिलतार्किकचूडामणि विद्यानन्द आचार्यांनीं रचिलेलें बृहत्पंचनमस्कारस्तोत्र असें ज्याचें दुसरें नांव आहे असें हें पात्रकेसरिस्तोत्र समाप्त झालें.

शुभं भवतु ।



# ॥ श्रीपुरपार्श्वनाथस्तोत्रम् ॥

यः श्रीपादं तवेश ! श्रयति सपदि सः श्रीपुरं संश्रयेत ।
स्वामिन् ! पार्श्वप्रभो ! त्वत्प्रवचनवचनोद्दीप्रदीपप्रभावैः ॥
लब्ध्वा मार्गं निरस्ताखिलविपदमतो यत्यधीशैः सुधीभिः
वंद्यः स्तुत्यो महांस्त्वं विभुरसि जगतामेक एवाप्तनाथः ॥१॥

अर्थः—हे पार्श्वप्रभो ! हे ईश ! जो मनुष्य आपल्या सुंदर पायाचा आश्रय घेतो त्याला आपण रचिलेल्या आगमांतील वचनरूपी उज्ज्वल दिव्याच्या प्रकाशानें सर्व संसारदुःखें नाहींशीं करणाऱ्या सत्य मार्गाची रत्नत्रयरूपी मोक्षमार्गाची प्राप्ति होते. तदनंतर तो श्रीपुराचा—अनंतज्ञान, अनंतदर्शन, अनंतवीर्य व अनंतसौख्य या संपत्तीनें भरलेल्या शहराचा अर्थात् मोक्षाचा आश्रय घेतो. आपल्या चरणाच्या आश्रयानें मोक्ष प्राप्ति होते म्हणून विद्वान् आणि जितेंद्रिय अशा मुनीश्वरांकडून आपण वंदिले जाता व स्तविले जाता हे स्वामिन् ! आपण सर्वांपेक्षां मोठे आहांत. आपल्या ज्ञानानें सर्वजग व्यापिलें आहे. व आपणच एक त्रैलोक्यामध्यें मुख्य देव आहात.

तात्पर्य—पार्श्वनाथ जिनेश्वरांनीं रचिलेल्या आगमांतील वचनें प्रकाशमान दिव्याप्रमाणें सन्मार्ग दाखऊन अंतीं मोक्षप्राप्ति करून देतात. यास्तव विद्वच्छ्रेष्ठ मुनीश्वरांनीं पार्श्वनाथ तीर्थंकरांना वंद्य, स्तुत्य व देवाधिदेव मानून त्यांचा आश्रय घेतला आहे.

पार्श्वनाथ भगवान् सर्वज्ञ आहेत. कपिल, बुद्ध ईश्वर वगैरे सर्वज्ञ होऊं शकत नाहींत हें या श्लोकांत आचार्य दाखवितात.

*अन्येनाप्ता विरोधाच्छ्रुतिरपि न ततः कोऽप्ययंवेत्ययुक्तिः ।
सम्यङ्निर्णीतिबाधाप्रमितिविरहतः कश्चिदेवास्ति वंद्यः ॥
नाशं दोषावृती यत्कचिदपि भजतो दृष्टहानिप्रकर्षात् ।
निःशेषं हेम्नि यद्वन्मलमिति भवतो निष्कलंकत्वसिद्धिः ॥२॥

अर्थः—कपिल, बुद्ध, जैमिनी, गोतम वगैरे जे अन्यमतीय ऋषि होऊन गेले त्यांच्या ठिकाणीं आप्तपणा नाहीं अर्थात् ते खरे देव नाहींत. त्यांच्या ठिकाणीं सर्वज्ञपणा नाहीं. त्यांनीं लिहिलेलीं शास्त्रें युक्तिरहित आहेत. त्यांचा उपदेश युक्ति व आगम यांना सोडून आहे. यास्तव या ऋषींना खरा देवपणा नाहीं. मीमांसक वेदालाच सर्वज्ञ मानतात व निराळा सर्वज्ञ मानण्याचें कारण नाहीं असें सांगतात. परंतु वेद हे अतींद्रिय सूक्ष्म पदार्थांचा उपदेश कसा करूं शकतील. वेदांतील शब्द स्वतःचा अमुक अर्थ आहे व अमुक नाहीं असें सांगण्यास कसें समर्थ होतील. व तसें ते असते तर अनेक वाद उपस्थित झाले नसते. गौतमादिक ऋषि वेद द्वैतवादाचें समर्थन करितात असें ह्मणतात. व्यास, शंकराचार्य वगैरे ऋषि वेद अद्वैताचे प्रतिपादक आहेत असें सांगतात यावरून वेदांना प्रमाणता येत नाहीं ह्मणून त्यांना सर्वज्ञपणा येऊं शकत नाहीं. वेदामध्यें यज्ञांत हिंसा करावी असें सांगितलें आहे. ' श्वेतमजमालभेत भूतिकामः ' संपत्ति मिळावी असें इच्छिणाऱ्या मनुष्यानें यज्ञांत पांढरा बकरा मारावा अशा अर्थाचीं वाक्यें वेदांत पुष्कळ ठिकाणीं मिळतात यामुळें वेदांना कसें बरें प्रमाण मानतां येईल. गौतमादि ऋषींचीं वचनें

* समंतभद्राचार्यकृत आप्तमीमांसेमध्यें अशा आशयाचे श्लोक आहेत. ते असे— तीर्थकृत्समयानां च परस्परविरोधतः ।
सर्वेषामाप्तता नास्ति कश्चिदेव भवेद्गुरुः ॥
दोषावरणयोर्हानिर्निःशेषास्त्यतिशायनात् ।
क्वचिद्यथा स्वहेतुभ्यो बहिरंतर्मलक्षयः ॥ श्लोक ३-४



परस्पर विरुद्ध आहेत ह्मणून त्यांना आप्त मानता येत नाहीं व वेदांचें स्वरूप तर असें विलक्षण असल्यामुळें तेहि सर्वज्ञपणाच्या योग्यतेला बिलकुल अपात्र आहेत. यास्तव विशेष विचार न करितां कोणास तरी सर्वज्ञ मानावें हें ह्मणणें बिलकुल युक्तीला सोडून आहे. मग सर्वज्ञ कोण समजावा याचें उत्तर असें आहे कीं ज्याला मानलें असतां कोणत्याहि बाधक प्रमाणानें बाधा येत नाहीं त्यालाच सर्वज्ञ मानावें. अर्थात् ज्याचा आत्मा अत्यंत निर्मळ झाला आहे व ज्ञान, दर्शन, सुख व वीर्य अशा अनंत चतुष्टयानें जो युक्त आहे, त्यासच सर्वज्ञ किंवा देवाधिदेव ह्मणतात. सर्वज्ञाचें ज्ञान अतींद्रिय असते. व सर्व पदार्थांना जाणण्याचें सामर्थ्य ज्ञानामध्यें कसें येतें या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं दोष व आवरण यांचा पूर्ण नाश झाल्यानें आत्म्यामध्यें सर्वज्ञपणा उत्पन्न होतो. राग, द्वेष, मोह, अज्ञान वगैरे दोष आहेत. ज्ञानावरण दर्शनावरण वगैरे कर्में आहेत. हे दोष व कर्में यामध्यें परस्पर कार्य कारणभाव आहे अर्थात् रागद्वेषापासून ज्ञानावरणादि कर्में उत्पन्न होतात व या कर्मांपासून पुनः हे दोष उत्पन्न होतात. हे दोष व कर्में जरी अनादि काळापासून या आत्म्याच्या मागें लागलीं आहेत तथापि यांचा आत्म्याशीं कायमचा संबंध राहील तो कधींहि सुटणार नाहीं असें ह्मणणें योग्य दिसत नाहीं. तें का अयोग्य आहे याचें उत्तर याप्रमाणें आहे— सोनें खाणींत असतांना त्याच्यांत इतर धातूंचें किंवा तदंगभूत काळेपणा वगैरेचें मिश्रण असतें; परंतु तें सोनें आपण वर काढून जेव्हां शुद्ध करितो, तेव्हां त्यांला अशुद्ध करणारे सर्व पदार्थ दूर होतात व त्याचें खरें स्वरूप प्रगट होतें. याचप्रमाणें आत्म्यांत असलेले दोष व कर्में यांचाहि नाश होतो. रत्नत्रयाची प्राप्ति होणें हें या कर्में व दोषांच्या नाशाचें कारण आहे. रत्नत्रयामध्यें जशी जशी वृद्धि होत जाईल तसा तसा यांचा नाश होतो. जेव्हां रत्नत्रय पूर्ण दशेला पोहोचतें त्यावेळीं हे दोष व कर्में हीं आत्म्याचा संबंध सोडून देतात. ज्याच्या ठिकाणीं

रत्नत्रय पूर्णता होते व दोष आणि कर्मे यांचा अभाव होतो तो निष्कलंक झाला असें समजावें. असें निष्कलंक स्वरूप कपिल वगैरे ऋषींचें नाहीं. यास्तव हे पार्श्वनाथ जिनेश ! आपणच या निष्कलंक स्वरूपाचे धारक आहात ह्मणून आपणास सर्वज्ञ व देवाधिदेव असें ह्मणण्याला आह्मा बिलकुल दिक्कत वाटत नाहीं.

सूक्ष्म पदार्थ आह्मांस जरी प्रत्यक्ष होत नसले तरी ते कोणास तरी होत असले पाहिजेत व ज्यास हे पदार्थ प्रत्यक्ष होतात तो सर्वज्ञ होय असें समजावें. अनेकांत दृष्टि प्रत्यक्षादि प्रमणांनीं बाधित होऊं शकत नाहीं व एकांतदृष्टि प्रमाणांनीं बाधित होते हें ग्रंथकार या श्लोकांत सांगतात.

* सूक्ष्माद्यर्थः समक्षोऽनुमितिविषयतः कस्यचिद्वानलादिः।
स त्वं निर्धूतकर्मक्षितिधरनिवहो दृष्टनिःशेषसत्वः ॥
न्यायाबाध्यागमोर्हन्नसि खलु भवतः सा ह्यनेकांतदृष्टिः ।
प्रत्यक्षाद्यैरबाध्या भवति न नियतैकांतयुक्तिः प्रमाढ्या ॥३॥

**अर्थः**—परमाणूंना सूक्ष्म ह्मणतात. राम रावण वगैरे कालांतरित होत. हिमालय मेरू वगैरे देशांतरित होत. हे सर्व पदार्थ कोणाच्या तरी ज्ञानामध्यें प्रत्यक्ष होत असतील. जसें अग्नि परोक्ष असला तर अनुमानानें त्याचें ज्ञान करून घेता येतें यास्तव जसा अग्नि अनुमेय आहे. तसें हे सूक्ष्मादि पदार्थ देखील अनुमेय आहेत. जरी हें पदार्थ आह्मांस अग्निप्रमाणें अनुमेय आहेत तथापि हे सूक्ष्मादि पदार्थ

---

सूक्ष्मांतरितदूरार्थाः प्रत्यक्षाः कस्यचिद्यथा ।
अनुमेयत्वतोऽग्न्यादिरिति सर्वज्ञसंस्थितिः ॥५॥
स त्वमेवासि निर्दोषो युक्तिशास्त्राविरोधिवाक् ।
अविरोधो यदिष्टं ते प्रसिद्धेन न बाध्यते ॥६॥
वरच्या श्लोकांतील अभिप्राय या दोन पद्यांत सांगितला आहे.



त्याला स्पष्टपणें दिसत असतील त्याला सर्वज्ञ ह्मणावयास कोणती हरकत आहे ? हे जिनेश्वरा अशा रीतीचें सर्वज्ञत्व आपणामध्येंच आहे. आपण कर्मरूपी पर्वतांच्या समूहाचा नाश केला आहे. सर्व तत्वांचे स्वरूप आपणास स्पष्ट दिसत आहे. हे अरहंता आपला आगम प्रत्यक्षादि प्रमाणांनीं बाधित होत नाहीं. आपलें अनेकांत मत प्रत्यक्ष, अनुमान वगैरेनीं दूषित होत नाहीं. कपिलादि ऋषींचा एकांतवाद मात्र प्रत्यक्षादि प्रमाणांनीं दूषित होतो. ह्मणून तो कांतिहीन आहे.

प्रत्यक्ष प्रमाणानें अनेकांतवाद सिद्ध होतो हें आचार्य या श्लोकांत दाखवितात.

तावत्प्रत्यक्षमेव प्रथयति तदनेकांतवादप्रसिद्धिं ।
यद्वा स्कन्धस्य वर्णाद्यवकरनिचितैकात्मनः स्यात्प्रतीतिः ॥
अंतश्चित्तस्य सौख्यद्यनुमतचिदसंकीर्णभावस्य दृष्टेः ।
सामान्यं वा विशेषो यदि न हि घटतेन्योन्यविश्लेष्यवृत्या ॥

**अर्थः**—प्रत्यक्ष प्रमाणानेंच अनेकांतवादाची सिद्धि होते. अनेकांताची सिद्धि करण्याकरितां इतर प्रमाणें हुडकण्याची आवश्यकता नाहीं. आत्मा किंवा अचेतन पदार्थ यांच्याकडे आपण पाहिलें ह्मणजे यांत अनेक धर्म आहेत असें आढळून येईल. विरोध न येतां वस्तूमध्यें अनेक धर्म आढळणें यासच अनेकांत ह्मणतात. आपण उदाहरणाकरितां दिवा हा पदार्थ घेऊं. त्याच्यामध्यें पुष्कळ धर्म आढळतात. याचा रंग पिवळा आहे, स्पर्श उष्ण आहे. हा अंधाराचा नाश करितो व उजेड पाडतो, काजळ उत्पन्न करितो व तेलाचें शोषण करितो. आत्म्यामध्येंहि अनेक धर्म आहेत सुख, दुःख, ज्ञान, शक्ति वगैरे. आणि या धर्मांचा प्रत्येक आत्म्याला अनुभव येत असतोच. आत्मत्वाच्या अपेक्षेनें हे धर्म एक आहेत व प्रत्येक धर्माचें स्वरूप वेगळें वेगळें असल्यामुळें यांच्यांत अनेकत्वहि आहे. प्रत्येक पदार्थांतील सामान्य व विशेष

धर्म हे सर्वथा वेगळे नसतात तसें असतें तर अनेकांताची सिद्धिच झाली नसती.

अनेकांतात्मक वस्तुच अनेक कार्यें करूं शकते हें ग्रंथकार या श्लोकांत सांगतात.

तदनेकांतात्मकं यत्सदनुनयवशं सर्वमर्थक्रियाकृत् ।
प्रमितिप्रव्याप्तरूपं स्फुटनिजविषयाकारसंवित्तिवद्धा ॥
अपि वा सिद्धं त्रिकालत्रयसमयगतानंतपर्यायपुष्यत्--
परिणामे तत्प्रतीतात्मनि हृतनियतैकांतिकेऽध्यक्षसिद्धेः ॥

**अर्थः**—अनेक धर्मांना धारण करणाऱ्या सर्व वस्तु खऱ्या नयांच्या अपेक्षेनें अनेक कार्यें करूं शकतात. खोटे नय वस्तूमध्यें अनेक धर्म नाहींत असें दाखवितात ती एक धर्मात्मकच आहे असें सांगतात यामुळें एक धर्मात्मक वस्तु अनेक कामें करू शकत नाहीं. सर्व वस्तु प्रत्यक्ष अनुमान वगैरे प्रमाणांच्या द्वारें जाणिल्या जातात यास्तव सर्व वस्तूंना प्रमेय असें ह्मणतात. जसें ज्ञानामध्यें त्याचें स्वतःचें स्वरूप व पदार्थाचा आकार देखील असतो ह्मणून ज्ञान. हे अनेकांत धर्मात्मक असते तसे वस्तुमध्यें अनेक स्वभाव असतात ह्मणून त्याहि अनेक धर्मात्मक आहेत. प्रत्येक क्षणीं वस्तु उत्पाद व्यय ध्रौव्य युक्त आहे. अर्थात् वस्तुमध्यें अनंत धर्म आहेत व त्या प्रत्येक धर्मामध्यें प्रत्येक समयीं उत्पाद, व्यय, व ध्रौव्य हे होत असतातच. यावरून सर्वथा एकांत वस्तुमध्यें नाहीं हें प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध झालें आहे.

द्रव्य म्हणजे काय याचें स्पष्टीकरण आचार्य या श्लोकांत करितात-

स्यात्तादात्म्यमुपाश्रितैरधिगतानन्तैर्भविष्यद्भवद्भूतैः
सक्रमयौगपद्याविधिभिर्यत्पर्ययैर्वा गुणैः॥
संकीर्णागमदद्रवद्द्रवति वा द्रोष्यत्यथो द्रव्यमि-
त्येतद्धर्मिणि धर्मता तदपरेष्वेवं भवेत्प्रक्रिया ॥६॥



**अर्थ**—द्रव्यामध्यें गुण व पर्याय असतात. द्रव्याशीं यांचा कथंचित्तादात्म्यसंबंध झालेला आहे. अर्थात् हे द्रव्यापासून सर्वथा वेगळे हि नाहींत व त्याच्यांशीं सर्वथा अभिन्नपणानें हि रहात नाहींत. पर्यायांचें स्वरूप असें आहे कीं, ते द्रव्यामध्यें क्रमानें उत्पन्न होत असतात. व गुण हे द्रव्यामध्यें एकदम आढळून येत असतात. अर्थात् हमेशा ते द्रव्यामध्यें राहात असतात. ' गुण व पर्याय यांनीं द्रव्याचा प्रत्येक प्रदेश व्यापून टाकिला आहे अर्थात् द्रव्य हें गुणपर्यात्मक आहे. ' द्रव्य, या शब्दाची व्याख्या अशी आहे कीं जें गुणपर्यायांना प्राप्त झालें होतें, प्राप्त होत असते, व प्राप्त होईल त्यास द्रव्य ह्मणतात. वर सांगितलेला स्वभाव याचा असल्यामुळें याला धर्मि, असेंहि नांव आहे. जसें द्रव्य तिन्ही कालीं गुण व पर्यायांना प्राप्त होते. याचप्रमाणें त्याचे जे धर्म गुण व पर्याय यामध्यें हि असाच फरक होत असतो.

याचें विशेष स्पष्टीकरण या श्लोकांत आचार्य करितात.

नश्यत्युत्पित्सु तावद्भवति नशनवत्स्थास्नु संपद्यते वा ।
स्थास्यत्युत्पत्स्यते सा स्थितिरसकृदलं नंक्ष्यति स्थास्यतीत्थं ॥
नंक्ष्यत्युत्पत्स्यते तन्नशनमपि तथोत्पत्स्यते स्थास्यते य–
न्नंक्ष्यत्युत्पत्तिरेवं त्रिविधमिति भवेत्तत्त्वमर्हन्तवेष्टम् ॥७॥

**अर्थः**—पर्यायार्थिक नयाच्या द्वारें विचार केला तर वस्तु प्रत्येक क्षणीं अनंत पर्यायात्मक आहे. जी वस्तु नाहींशी होतें तीच उत्पन्नही होतें. अर्थात् वस्तुचा एक पर्याय नाहींसा झाला कीं लागलीच दुसरा उत्पन्न होतो. जसें एक मनुष्य दुःखी होता त्याच्या दुःखाचा नाश झाला कीं लागलीच तो सुखी होतो. जी वस्तु कथंचित् नाशवंत असते तिच्या ठिकाणींच स्थिरपणा असतो. सर्वथा नाश पावणाऱ्या वस्तुंत स्थिरता कशी राहू शकेल. जी वस्तु द्रव्यत्वाच्या अपेक्षेनें किंवा चेतन-

पणाच्या अपेक्षेनें स्थिर आहे तिच्या ठिकाणींच विशिष्ट पर्यायाच्या अपेक्षेनें उत्पाद मानिला जातो. वस्तूचा स्थिरतेशीं तादात्म्य संबंध मानून वस्तूलाच स्थिरता मानणें व तीच पुढें असू शकेल किंवा उत्पन्न होईल. उत्पादालाच वस्तु मानून तोच नाश पावतो व तोच स्थिर होतो असें मानणें. पदार्थाच्या नाशालाच पदार्थ मानून तोच नाश पावेल, उत्पन्न होईल असें ह्मणणें. तात्पर्य उत्पाद, व्यय, व ध्रौव्य या तिहींपैकीं एकेकामध्यें तिहींची कल्पना करणें व तीहि भूत, भविष्य, आणि वर्तमान काल यांच्या आधारानें करणें. अशा कल्पनेनें या उत्पाद वगैरे धर्मांचे ८१ भेद होतात. हे पार्श्वनाथ जिनेशा! उत्पाद, व्यय, व ध्रौव्य अशा तीन भेदांनीं युक्त अशा तत्वांचा आपण उपदेश केला आहे. हें तत्व आपणास मान्य आहे.

अपेक्षेनें पदार्थामध्यें अनेक धर्म सिद्ध होतात
हें आचार्य या श्लोकांत दाखवितात.

**तदतद्रूपाः पदार्थाः स्वपरविधिदिशापेक्ष्य सर्वस्य सर्वा-**
**करणात्क्षीराद्यवाप्तिं विदधदिह घटाद्यस्तु नैते पटाद्याः ॥**
**न च पौरस्त्यः स पश्चाद्भवति न च पुरा निर्व्यपेक्षस्वभावः ।**
**तदनेकाकारमेकं सदसदभिमतं तादृगेतन्न तादृक् ॥८॥**

अर्थः—स्वद्रव्य चतुष्टयानें पदार्थ तत्स्वरूपी आहे व परद्रव्य चतुष्टयानें अतत्स्वरूपी आहे. सर्व पदार्थामध्यें सर्व तऱ्हेचीं कार्यें करण्याची शक्ति नसतें ह्मणून देखील पदार्थांचें स्वरूप भिन्न आहे. घागरीमध्यें दूध, पाणी व इतर पदार्थ ठेवता येतात परंतु कपड्यामध्यें दूध किंवा पाणी राहू शकत नाहीं यावरून पदार्थामध्यें निरनिराळे स्वभाव आहेत हें दिसून येतें. पदार्थामध्यें जो पर्याय पुढें होणार असेल तो आपल्या योग्य कालींच होईल तो आधी कऱ्हांही होत नाहीं. याचें कारण असें आहे कीं पर्याय क्रमानें होत असतात यामुळें जो ज्या-



वेळीं व्हावयाचा असतो तो त्यावेळींच होतो पुढें किंवा मागें होत नाहीं पदार्थांतील हा क्रम निरपेक्ष नसतो. पदार्थ हा एकाकार व अनेकाकारहि आहे. द्रव्यदृष्टीनें पदार्थ एकाकार आहे व पर्यायदृष्टीनें अनेकाकार आहे. द्रव्य अनेक गुणांस धारण करितें ह्मणून तें अनेकाकार आहे व सर्व गुणांमध्यें द्रव्यत्व व्यापून राहतें ह्मणून द्रव्य एकाकार आहे. द्रव्य सत् व असत् आहे. घटाचें स्वरूप कपड्यासारखें नसतें ह्मणून कपड्याच्या दृष्टीनें घट [ घागर ] हा असत् आहे. परंतु तो स्वतःच्या स्वरूपानें सद्रूप आहे. द्रव्य दृष्टीनें सर्व पदार्थ समान आहेत व पर्याय दृष्टीनें सर्व पदार्थांच्या अवस्थामध्यें सारखेंपणा आढळून येत नाहीं ह्मणून विषमताहि आहे.

स्याद्वादानें वस्तूमध्यें अनेक धर्म सिद्ध होतात हें आचार्य
या श्लोकांत सांगतात.

**स्याद्वादे सप्तभंगीनयजुषि विधिनिर्धारणाभ्यां हि वस्त्वा- ।**
**रूढं सत्वेतरात्मक्रमनियमदिशा लक्ष्यतेर्थक्रियाकृत् ॥**
**स्वर्णादेर्वा कथंचित्सत इह भवति स्यात्स्वरूपान्तराप्तिः ।**
**प्रायः पूर्वोत्तराकृत्यपगमजननद्रव्ययुक्तं हि वस्तु ॥९॥**

अर्थः—स्याद्वाद हा 'स्यादस्ति, स्यान्नास्ति' इत्यादि भेदांनीं सात प्रकारचा आहे. अस्तित्व नास्तित्व यांच्याद्वारें वस्तु सद्रूप आणि असद्रूप आहे व ती अशी असल्यामुळेंच कार्यें करण्यास समर्थ होते. कोणतीही वस्तु स्वतःचें जें तिचें स्वरूप असतें त्याच्या दृष्टीनें ती कथंचित् सत् मानिली जाते. कोणतीहि वस्तु सर्वथा सत् किंवा सर्वथा असत् नसते. सर्वथा सत् अशा वस्तूंत कोणतेंहि स्थित्यंतर होत नाहीं. स्थित्यंतर झालें कीं तिच्यांतील सर्वथा सद्रूपपणा नाहींसा होईल, ती कथंचित् सत् आणि असत् झाली असें मानावे लागेल. सोनें जर सर्वथा सद्रूपच मानिलें तर त्याचे अंगठी, कुंडल इत्यादि डागिने बनविता आले नसते. परंतु त्याच्या अनेक अवस्था होत असलेल्या

प्रत्यहीं आपल्या पाहण्यांत येतात त्यावरून जगांतील सर्व वस्तु कथंचित् सत् व असत आहेत. पूर्वावस्था टाकून उत्तरावस्था स्वीकारणारें जें द्रव्य त्यासच वस्तु ह्मणतात अशा वस्तूंत अनेक धर्म आहेत हें स्याद्वाद सुचवित असतो.

स्याद्वाद हा सात प्रकारचा आहे हें आचार्य या श्लोकांत दाखवितात.

* स्यादस्ति स्वचतुष्टयादितरतः स्यान्नास्त्यपेक्षाक्रमात्
तत्स्यादस्ति च नास्ति चेति युगपत्सा स्यादवक्तव्यता ॥
तद्वत्स्यात्पृथगस्ति नास्ति युगपत्स्यादस्तिनास्त्याहिते
वक्तव्ये गुणमुख्यभावनियतः स्यात्सप्तभङ्गीविधिः ॥१०॥

अर्थ— घागर ही स्वतःच्या स्वरूपानें युक्त आहे ह्मणून ती, 'स्यादस्ति' स्वरूपाची आहे ती कपडा वगैरे भिन्नपदार्थांच्या स्वरूपाची नाहीं ह्मणून ती 'स्यान्नास्ति' स्वरूपाची आहे. क्रमानें तिच्या स्वरूपाचा व इतर पदार्थापासून तिच्या वेगळेपणाचा विचार केला तर ती 'स्यादस्ति नास्ति' स्वरूपाची आहे. वर सांगितलेल्या दोन्ही स्वभावांचा एकदम विचार केला तर ती 'स्यादवक्तव्य' स्वरूपाची आहे. तिच्या स्वतःच्या स्वरूपाबरोबर वर सांगितलेल्या दोन्ही स्वभावांचा विचार के-

---

* कथंचित्ते सदेवेष्टं कथंचिदसदेव तत् ।
तथोभयमवाच्यं च नययोगान्न सर्वथा ॥१४॥
सदेव सर्वं को नेच्छेत्स्वरूपादिचतुष्टयात् ।
असदेव विपर्यासान्न चेन्न व्यवतिष्ठते ॥१५॥
क्रमार्पितद्वयाद्द्वैतं सहावाच्यमशक्तितः ।
अवक्तव्योत्तराः शेषास्त्रयो भंगाः स्वहेतुतः ॥१६॥ आप्तमीमांसा.



ला तर ती 'स्यादस्ति अवक्तव्य' स्वरूपाची आहे. इतर पदार्थांपासून तिच्या वेगळेपणाचा व वर सांगितलेल्या दोन्ही स्वभावांचा एकदम विचार केला तर ती 'स्यान्नास्ति अवक्तव्य' स्वरूपाची आहे. क्रमानें तिच्या दोन्ही स्वभावाबरोबर एकदम तिच्या दोन्ही स्वभावांचा विचार करणें यास 'स्यादस्ति नास्ति अवक्तव्य, असें ह्मणतात. हा सातवा भंग आहे. अशा रीतीनें वस्तूंतील इतर स्वभावांचाहि विचार करितां येतो. वस्तूंतील धर्मांला गौण व मुख्य मानून वस्तूचें अशा रीतीनें वर्णन केलें जातें. या वर्णनाला सप्तभंगी ह्मणतात.

स्याद्वादाचें स्वरूप या श्लोकांत आचार्य सांगतात.

स्याद्वादः स्वपरावतारविषयेणोद्भाससत्वेतरा-
द्याकाराद्यदनंतधर्मनिलयस्योच्चैः सतो धर्मिणः ।
सम्यङ्न्यायबलात्समर्थवदनं यः सप्तभंगीनया-
पेक्षः प्रश्नवशाद्विधीतरकृतेरेकत्र निर्बाधतः ॥११॥

अर्थः—स्वचतुष्टय व परचतुष्टयाच्या द्वारें वस्तूंतील अस्तित्व, नास्तित्व, नित्यत्व, अनित्यत्व वगैरे धर्म प्रकट होतात. वस्तु अशा अनंत धर्मांनीं युक्त आहे. एका वस्तमध्यें विरोध येणार नाहीं अशा रीतीनें चांगल्या युक्तींचा आधार घेऊन व प्रश्नाला अनुसरून वस्तूमध्यें असलेल्या धर्मांची सत्ता किंवा असत्ता सात प्रकारानें सिद्ध करणें यास स्याद्वाद ह्मणतात.

जिनेश्वरांनीं स्याद्वादाचा प्रभाव जगामध्यें प्रगट केला, यास्तव जिनेश्वराचा भव्यांनीं आश्रय घेतला पाहिजे हें आचार्य या श्लोकांत सांगतात.

सम्यङ्न्यायमतोदयेन सुनयैस्तस्यैकदेशैरथो ।
निक्षेपैश्च तदर्पणार्पणपरैर्व्यक्तीकृतप्राभवः ॥

निःशेषावरणक्षयक्षणभवत्सर्वार्थसंपद्विभा-
भाजा नाथ जिन त्वयाध्यवसितः स त्वं समाश्रीयसे ॥१२

**अर्थः**–संपूर्ण ज्ञानावरणीय कर्माचा क्षय झाल्याबरोबर सर्व पदार्थांना जाणण्याचें सामर्थ्य ज्यांना प्राप्त झालें आहे अशा हे पार्श्वनाथ जिनेश ! आपण आपल्या ज्ञानानें व पदार्थांच्या एका अंशाला जाणणाऱ्या अशा नयांनीं नाम, स्थापना, द्रव्य आणि भाव अशा निक्षेपांनीं स्याद्वादाचा प्रभाव जगप्रसिद्ध केला आहे. व त्याचें स्वरूप स्वतः आपण फार उत्तम रीतीनें जाणिलें आहे. यास्तव भव्यजीव आपला आश्रय घेतात.

जिनेश्वराच्या मतांतच जीव, सुख, दुःख, पाप, पुण्य इत्यादिकांची सिद्धि होते हें आचार्य दाखवितात.

जीवः कर्माणि भावः शुभमशुभमतस्तत्फले पुण्यपापे ।
सौख्यं दुःखं तथादृक्स्वधिगमचरितान्यागमः शब्दवार्थौ ॥
हेयादेयौ प्रमेयः प्रमितिरधिकृतः कालदेशादिमोक्षः ।
सर्वं सिध्यै तवैव प्रभवति भगवन्शासनेऽतो भजामः ॥१३॥

**अर्थ**--जीव, ज्ञानावरणादि आठ कर्में, शुभ व अशुभ परिणाम व त्यापासून उत्पन्न होणारीं पुण्य पापरूपी फळें आणि त्यायोगें उत्पन्न होणारीं सुखं दुःखें, तसेंच सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्र, द्वादशांग श्रुतज्ञान, ग्राह्य व अग्राह्य पदार्थ [ प्रमेय ] आणि यांची सिद्धि करणारें ज्ञान, काळ, देश, धर्मादि द्रव्यें, मोक्ष या सर्व पदार्थांची सिद्धि हे पार्श्वनाथ जिनेश आपल्याच मतामध्यें होते. यास्तव हे स्वामिन् आह्मी आपली आराधना करितो.

जिनेश्वराशिवाय मोक्षाचा रस्ता दाखविण्यास दुसरा कोणी समर्थ नाहीं हें आचार्य या श्लोकांत दाखवितात.



देवः श्रीपुरपार्श्वनाथ ! भुवनाधीशार्च्यपादाम्बुज !
प्रध्वस्ताखिलकर्मजात ! विपुलज्ञान प्रभाभासुर !
श्रेयोमार्गनिदर्शने हि भवता नान्यो विनास्ति क्षमः ।
तस्माद्वन्द्यपदस्त्वमेव महतां निःशेषतत्वार्थवित् ॥१४॥

**अर्थ**–हे देवा पार्श्वनाथ जिना ! त्रैलोक्याधिपति असे इंद्र आपल्या पदकमलांची पूजा करीतात. हे जिना ! आपण सर्व कर्मांच्या समूहाचा नाश केला आहे. आपण केवल ज्ञानाच्या प्रभेनें अत्यंत तेजस्वी दिसता. हे जिनेन्द्रा ! मोक्षाचा रस्ता दाखविण्यास आपणाशिवाय दुसरा कोणीहि समर्थ नाहीं. यास्तव पूज्य अशा महर्षीकडूनहि आपलें पाय वंदिलें जातात. हे जिनेश ! आपण सर्व तत्वांना स्पष्टपणें जाणता.

* देवः श्रीमानशेषत्रिदशपरिवृढप्रार्च्यपादारविन्दो ।
बाह्यान्तर्विग्रहादिप्रभवदतिशयो धर्मतीर्थस्य नाथः॥
इत्येतद्वास्ति मायाविषु सुरविभुषु ख्यातबुद्धादिकेषु ।
देशाद्यावेशवत्सु प्रतिहतविषयान्योन्यवैतार्थवाक्षु ॥१५॥

**अर्थ**– हे देवा पार्श्वनाथ जिना ! आपल्या चरणकमलांची सर्व देवांचे अधिपति असे इन्द्र पूजा करितात. हे जिना ! आपण आध्यात्मिक व बाह्य अतिशयांनीं युक्त आहात. आपलें शरीर घामानें रहित आहे, तें तेजःपुंज आहे. प्रतिक्षणीं दिव्यपरमाणूंचा त्याच्या

---

* देवागमनभोयानचामरादिविभूतयः । मायाविष्वपि दृश्यन्ते नातस्त्वमसि नो महान् ॥ १ ॥
अध्यात्मं बहिरप्येष विग्रहादिमहोदयः दिव्यः सत्यो दिवौकस्स्वप्यस्ति रागादिमत्सु सः ॥ २ ॥ आप्तमीमांसा.

ठिकाणीं संचय होतो. हा सर्व आध्यात्मिक अतिशय आहे. गंधोदकवृष्टि, पुष्पवृष्टि सिंहासन वगैरे बाह्य अतिशय यांनीं आपण युक्त आहात. हे जिनेन्द्र आपण धर्म तीर्थाचे नेते आहात. परंतु हे सर्व अतिशय मस्करिपूरण वगैरे इंद्रजालिकामध्येंहि दिसून येतात. तसेंच ज्यांचीं वचनें परस्परांशीं विरुद्ध आहेत अशा बुद्ध, कपिल वगैरे ठिकाणींहि असले अतिशय दिसून येतात. व इन्द्रादिकामध्येंहि हे अतिशय आढळून येतात. तथापि या अतिशयांनीं त्यांच्या ठिकाणीं खरें देवत्व येत नाहीं. याचें कारण त्यांचीं वचनें युक्ति व आगमाला सोडून आहेत.

हेंच पुढील श्लोकांत ग्रंथकार व्यक्त करितात.

**त्वदन्येऽध्यक्षादिप्रतिहतवचोयुक्तिविषया ।**
**विलुप्ताभा लोकव्यपलपनसम्बन्धमनसः ॥**
**भजन्ते नाप्तत्वं तदिह विदिता वंचनकृतिः ।**
**विसंवादस्तेषां प्रभवति तदर्थापरिगतेः ॥ १६ ॥**

**अर्थ**--हे जिनेश ! कपिल, बुद्ध वगैरेचा उपदेश युक्तिला सोडून आहे. यामुळें आपल्या पुढें ते फिक्के पडतात. त्यांचें मन लोकांना आपल्या कपटयुक्तींनीं कसें फसवावें या विषयांत गुंतून गेलेलें असतें. त्यांच्या ह्या फसवेगिरीनें त्यांच्या ठिकाणीं खरें देवत्व नाहीं हें सिद्ध होतें. वस्तूंचें खरें स्वरूप त्यांना न समजल्यामुळें त्यांच्या ज्ञानामध्यें सत्यपणा उत्पन्न झालेला आढळून येत नाहीं. यावरून हे जिनेश ! सत्यवादीपणा आपल्या खेरीज इतरत्र आढळून येत नाहीं हें ठरतें.

वेदालाच प्रमाणता आहे असें मानणारा जैमिनि किंवा वेद या उभयतांनाहि प्रमाणता येऊ शकत नाहीं असें ग्रंथकार या श्लोकांत प्रतिपादन करितात.



**नात्यक्षे जैमिनिर्वा श्रुतिसमयबलः सम्यगर्थाविबोधात् ।**
**नैतादक्षस्य दोषावरणविगमनाभावतोऽतीन्द्रियार्थे ॥**
**ज्ञानं श्रुत्या सदर्थावगतिरथ ततः सत्यतेत्येष दोषो ।**
**न प्रामाण्यं स्वतोऽस्याः किल घटवदचैतन्यतः सिद्धमेतत् ॥ १७**

**अर्थः**— वेदाचें ज्याला पाठबळ मिळालें आहे अशा जैमिनीला यथार्थ ज्ञानादि गुणांच्या अभावामुळें अतींद्रिय सूक्ष्म परमाणु वगैरे पदार्थांचें ज्ञान होत नाहीं. जैमिनी सारखें जे बुद्धादिक आहेत त्यांनाहि अतींद्रिय पदार्थांचें ज्ञान होत नाहीं. याचें कारण हें आहे कीं रागद्वेष, अज्ञान वगैरे दोष व ज्ञानावरणादिक कर्मे यांचा त्यांच्या ठिकाणीं अभाव झालेला नसतो. जरी थोड्याशा दोषांचा किंवा थोड्याशा ज्ञानावरणादि कर्मांचा नाश झालेला असला तरी तेवढ्यानें अतींद्रिय पदार्थांचें ज्ञान होत नसतें. रागद्वेषांचा व ज्ञानावरणादि कर्मांचा पूर्ण क्षय झाल्यानें हें ज्ञान होत असतें. कदाचित् वेदापासून अतींद्रिय पदार्थांचें ज्ञान होऊ शकेल असें ह्मणणेंहि योग्य नाहीं. वेदामध्यें सत्य पदार्थांना जाणण्याचा गुण आहे हें सिद्ध झालें ह्मणजे त्यांच्या ठिकाणीं खरेपणा आहे हें सिद्ध होईल. व त्यांच्या खरेपणाची सिद्धि झाली ह्मणजे ते अतींद्रिय पदार्थांना जाणतात हें सिद्ध होईल. याप्रमाणें अन्योन्याश्रय दोष येतो. हा अन्योन्याश्रय दोष टाळण्यासाठीं वेदाला स्वतःच प्रमाण मानलें तर काय हरकत आहे असें ह्मणणेंहि अनुचित आहे. स्वतः वेदांना प्रमाणता येऊ शकत नाहीं कारण ते घागर कपडा वगैरे पदार्थाप्रमाणें अचेतन आहेत. यावरून वेदाला प्रमाणता नाहीं हें सिद्ध होतें.

वेदांचा कर्ता कोणी नाहीं, वेद अपौरुषेय आहेत असें ह्मणणाऱ्या मीमांसकास आचार्य उत्तर देतात.

**आप्तोक्तं चेत्प्रमाणं व्यपनयतु तदर्थावदानान्न साप्ता-**
**नुक्तेः स्यादुक्तदोषो यदि तदपगमान्नैवमित्यप्रतीतिः ॥**

क्वैवं सिद्धयेद्विभागो ऽभ्युपगमविगमैः पौरुषेयत्वमन्यत्
वा सुस्थं नैव कर्तृस्मरणविलयनान्नेति नाप्तत्वमन्यत् ॥१८॥

अर्थ—श्रीजिनेश्वरांनीं सांगितलेला आगम प्रमाण आहे. या आगमाच्या आश्रयानें केवलज्ञान उत्पन्न होतें आणि तें झालें ह्मणजे अतींद्रिय पदार्थांचें ज्ञान उत्पन्न होतें. परंतु वेदांना प्रमाण मानता येत नाहीं. याचें कारण हें आहे कीं, आप्तांनीं अर्थात् जिनेश्वरांनीं त्याचा उपदेश केला नाहीं. येथें मीमांसक असें ह्मणतात कीं, आह्मी वेदाचा कर्ता कोणी नाहीं असें मानतो. असें मानण्यांत आमचा अभिप्राय हा आहे कीं, वक्त्यामध्यें दोष आढळून येतात व अशा वक्त्यानें वेदाचा उपदेश केला असेल तर वेदामध्येंहि दोषांचा प्रवेश होईल. यास्तव आह्मीं वेदांचा कर्ताच कोणी नाहीं तो अपौरुषेय आहे असें ह्मणतो. व त्यामुळें त्याला प्रमाणता आली आहे. परंतु हें ह्मणणें योग्य नाहीं. आह्मीं वेदाला अपौरुषेय मानतो ह्मणून तो प्रमाण आहे; व बौद्ध वगैरे लोक स्वतःच्या आगमाचा कर्ता मानतात ह्मणून त्यांचा आगम अप्रमाण आहे हें ह्मणणें युक्तियुक्त दिसत नाहीं. केवळ असें ह्मणण्यानेंच प्रमाणता अप्रमाणता सिद्ध होत नसते. वेदाचा कर्ता कोण आहे याचें स्मरण होत नाहीं ह्मणून वेद अपौरुषेय व प्रमाण आहे असेंहि ह्मणणें जुळत नाहीं. हेंहि ह्मणणें वरच्या सारखेंच युक्तिशून्य आहे. आपण जरी वेद अपौरुषेय असें ह्मणतां तथापि वेदाला प्रमाण मानणारे तुमच्याच पैकीं कित्येक नैयायिक वगैरे लोक वेदांचा कर्ता ब्रह्मदेव आणि इतर ऋषि आहेत असें ह्मणतात. बौद्ध लोक अष्टक ऋषींनीं वेद बनविले आहेत असें सांगतात. यावरून तुमचें ह्मणणें खरें मानतां येत नाहीं.

जरी वेद अपौरुषेय किंवा अनादि आहेत असें स्वीकारिलें तरी ते प्रमाण आहेत हें कसें सिद्ध होणार? जें अनादि काळचें असतें तें सर्व प्रमाणच जर मानू लागलों तर चोरी वगैरे पातकें अनादिकाळापासून



चालू आहेत त्यांनाहि प्रमाणच मानावें लागेल! वास्तविक पाहिलें तर प्रमाणता जी आगमामध्यें येते ती वक्त्याच्या निर्दोषपणावर अवलंबून आहे. जो निर्दोष आहे तो खरें तेंच सांगेल. परंतु वक्त्याच्या ठिकाणीं दोषच असतात यास्तव आह्मी वेदाचा कर्ता कोणी मानीत नाहीं असें ह्मणणें मीमांसकाला शोभत नाहीं. यास्तव वेदाचा कर्ता आहे असें मानलें पाहिजे वेदाचा कर्ता सदोष होता ह्मणून वेदामध्यें जागोजागीं दोष भरलेले आढळून येतात.

ईश्वर सृष्टिकर्ता आहे असें ह्मणणाऱ्याचें आचार्य खंडन करितात.

सुखदुःखादिविचित्रभावनियतेनैकस्वभावेश्वरः ।
प्रभवो नैव भवो न कारणलवात्कार्यस्य नानाकृतिः ॥
यवबीजांकुरवत्तथाऽपरिणतेनार्थक्रियासम्भवः ।
स्वभवावस्थितदेशकालिकभिदाभाजां स कर्ता कथम् ॥ १९ ॥

अर्थ—जगाचा कर्ता ईश्वर नाहीं. जग हें सुख दुःख, पाप पुण्य, रागद्वेष इत्यादिक विचित्रतेनें भरलें आहे. व ईश्वरामध्यें अनेक स्वभाव नाहींत तो एक स्वभावाचा धारक आहे. कारणामध्यें अनेक स्वभाव असले तर त्या कारणापासून उत्पन्न झालेलें कार्य देखील अनेक स्वभावांनीं युक्त असें दिसून येईल. साळीच्या बियामध्यें साळीचा अंकुरच उत्पन्न करण्याची शक्ति आहे. तें एक स्वभावाचें आहे ह्मणून त्याच्यापासून साळीचा तेवढाच अंकुर उत्पन्न होतो. तसा ईश्वरहि एक स्वभावाचा असल्यामुळें अनेक स्वभावांनीं भरलेलें जग त्याच्या हातून उत्पन्न होणें शक्य नाहीं. ईश्वराला जर सर्वथा एक स्वभावाचा धारक आहे असें मानले तर त्याच्यामध्यें कोणताहि फेरबदल होणार नाहीं. ज्याच्यांत कोणताहि फेरबदल होत नाहीं असा ईश्वर सृष्टिची रचना तरी कशी करणार? ईश्वराचा एकच स्वभाव मानून तो नित्य किंवा क्षणिक आहे असें मानलें तरी जगांत सगळे पदार्थ नित्यानित्यधर्मात्मक

आहेत असले पदार्थ केवळ नित्य किंवा केवळ क्षणिक स्वभावाच्या ईश्वरापासून कसे बरें उत्पन्न होऊ शकतील ? प्रत्येक पदार्थांचे स्वभाव त्यांच्या अवस्था या वेगळ्या असतात. ते पदार्थ निरनिराळ्या ठिकाणीं उत्पन्न होतात. प्रत्येकांचा काल देखील एक नसतो. अशा अनेक विचित्रता पदार्थांत भरल्यामुळें या सर्वांचा कर्ता एक स्वभावाचा ईश्वर आहे हें ह्मणणें मोठें आश्चर्याचें व धाडसाचें आहे.

इच्छा वा नियतेतरा न लभते संबंधमीशेन तत्–
कर्मप्राभवतः सुखादिविभवः पर्याप्तमेतेन हि॥
भेत्ता कर्ममहीभृतां सकलविज्ञानादिसिद्धस्ततो ।
यत्काणा दहताक्षपादगादितं तत्स्यात्कथं श्रेयसे॥२०॥

**अर्थः**—ईश्वर जगाचा कर्ता नाहीं पण त्याची इच्छा हें जग उत्पन्न करिते; असें मानणें योग्य नाहीं. ईश्वराची इच्छा त्याच्यापासून भिन्न आहे कां अभिन्न आहे असें आह्मी त्यांना विचारतो. ती जर भिन्न असेल तर 'ईश्वराची इच्छा' अशीं संबंधाला दाखविणारी वाक्यरचना होणार नाहीं. व ती अभिन्न मानली तर ईश्वराप्रमाणें त्याची इच्छाहि जग उत्पन्न करूं शकणार नाहीं. जसा ईश्वर नित्य व एक स्वभावाचा आहे तशी इच्छा देखील नित्य व एक स्वभावाची मानल्यानें तिच्यांतहि जगत्कर्तृत्व येणें शक्य नाहीं. स्वतः ईश्वर नित्य फेरबदल रहित असल्यानें इच्छेमध्येंहि त्याला कोणताहि फेरबदल करितां येणार नाहीं. व त्यामुळें ती देखील जग बनविण्याच्या कामामध्यें निरुपयोगी ठरेल. ह्मणून इच्छेलाहि जगत्कर्तृत्व आहे असें मानू नये. मग जगाचा कर्ता आहे तरी कोण या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं कर्मामध्यें नानातऱ्हेचे स्वभाव आहेत. या कर्मांच्याद्वारें सृष्टींतील सर्व पदार्थांची रचना होते. कर्मांच्या अभावीं सृष्टीची रचना होणार नाहीं. ईश्वर शरीररहित असूनहि तो सृष्टिची रचना करितो असें आपण मानता



याप्रमाणें कर्म अचेतन असूनहि तें सृष्टिची रचना करितें असें मानण्याला कोणती हरकत आहे? ईश्वरच जर सृष्टि रचना करितो तर तो कुबडे, आंधळे, दरिद्री अशा प्राण्यांना कां उत्पन्न करितो? सर्व प्राणी चांगल्या स्थितीचे कां बनवित नाहीं? ज्यांचें जसें कर्म असेल त्यास तशी अवस्था तो प्राप्त करून देतो असें जर ह्मणाल तर ईश्वर असमर्थ आहे असें ह्मणणें भाग पडतें मग त्याला जगाचा कर्ता न मानता कर्मालाच जगाचा कर्ता मानणें बरें नाहीं काय?

जैन लोक ईश्वराला मानीत नाहींत असें नाहीं परंतु तो जगाचा कर्ता नाहीं; असें मात्र ह्मणतात. जैन ईश्वराचें स्वरूप असें मानतात कीं ईश्वर हा कर्मरूपी पर्वतांचा चुराडा करितो. त्यामुळें त्याला सर्व पदार्थ जाणण्यांची शक्ति प्राप्त होतें. परंतु तो नैयायिक किंवा वैशेषिकाच्या ईश्वरासारखा अनादि सिद्ध नाहीं. जैनांच्या ईश्वराला जिनेश्वर ह्मणतात. जिनेश्वरानें जो उपदेश केला तोच भव्यांचे कल्याण करणारा आहे. यावरून वैशेषिक व नैयायिकांनीं जें कांहीं वस्तूचें स्वरूप सांगितलें तें कल्याण करणारें नाहीं हें सिद्ध होतें.

आचार्य बौद्ध मताचा विचार करितात-

सत्सर्वं क्षणिकं यदिच्छति पृथक्कालक्षणानां यतः ।
कार्यं कारणमित्यतश्चिरतरातीतेषु वा वासनाः ॥
तच्च क्षितिकर्तृभोक्तृरचना सम्यक्त्वसंज्ञादिकं
जल्पन्सिद्धिपदं विशुद्धधिषणः शौद्धोदनिः स्यात्कुतः॥२१॥

**अर्थ**—सर्व पदार्थ क्षणिक आहेत प्रत्येकक्षणी नवीन नवीन पदार्थांची उत्पत्ति होते. असें बौद्धाचे मत आहे. परंतु सर्व पदार्थ क्षणिक आणि एका पदार्थाचा दुसऱ्या पदार्थाशीं कांहीं संबंध जर नसेल तर वस्तुमध्यें कार्यकारण भाव हा राहणार नाहीं. पूर्वींचा पदार्थ पुढच्या पदार्थास कारण आहे व पुढचा पदार्थ पूर्वींच्या पदार्थाचें का

आहे असें ह्मणणें योग्य नाहीं. कारण या दोन पदार्थांमध्यें तसा एकत्व दाखविणारा संबंध नाहीं असा संबंध नसताहि पूर्वीच्या पदार्थास पुढच्या पदार्थांचें कारण मानलें तर जगांतील सर्व पूर्वीचे पदार्थ त्याला कारण आहेत असें कां ह्मणत नाहीं ? यावरून पूर्वोत्तर पदार्थांमध्यें एकान्वयता मानली पाहिजे ह्मणजे पदार्थांमध्यें कार्यकारणता सिद्ध होते प्रत्येक पदार्थ क्षणिक मानला तर वासना कर्तृत्व, भोक्तृत्व, पृथ्वीची रचना वगैरेची सिद्धि होणार नाहीं. यावरून क्षणिक तत्वाच्या अभ्यासानें मोक्ष प्राप्त होतो असें म्हणणाऱ्या बुद्धाची बुद्धि निर्मळ नव्हती असें ठरतें.

सांख्याच्या मताचा आचार्य विचार करितात

*** यदयं सर्वत्र सर्वं प्रकृतिरविकृतिः सप्ततः स्याद्विकाराः ।**
**महदाद्याः षोडशोचैर्गण इति पुरुषस्तद्विकृत्यप्रयुक्तः ॥**
**स्वयमन्यो न प्रभूतिक्रममखिलकलाबंधहीनस्य जन्तोः ।**
**विलपन्मुक्तिः कुतः स्यात्स चपलकपिलो धीमतां देयभावः ॥ २२**

**अर्थः—**सांख्यांनीं दोन तत्वें मानलीं आहेत. एक प्रकृति तत्व व दुसरें आत्मतत्व. प्रकृतितत्व हें नित्य आहे. या तत्वापासून महान् या नांवाचें तत्व उत्पन्न झालें. महान् ह्मणजे पदार्थाला जाणण्याची बुद्धि, या बुद्धिपासून मी सुंदर आहे, मी श्रीमंत आहे अशा तऱ्हेचा अभिमान उत्पन्न होतो यासच अहंकार असेंहि ह्मणतात. अहंकारापासून पांच तन्मात्रा उत्पन्न होतात. त्यांचीं शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध अशीं नांवें आहेत. याच अहंकारापासून अकरा इंद्रियें उत्पन्न होतात. नाक, कान, डोळा, जीभ व स्पर्शन हीं पांच ज्ञानेंद्रियें. आणि वाणी,

* मूलप्रकृतिरविकृति महदाद्याः प्रकृतिविकृतयः सप्त ।
षोडशकश्च विकारो न प्रकृतिर्न विकृतिः पुरुषः ॥
प्रकृतेर्महांस्ततोहंकारस्तस्माद् गणश्च षोडशकः
तस्मादपि षोडशकात्पञ्चभ्यः पंच भूतानि ॥



हात, पाय, जननेंद्रिय व गुदद्वार यांना कर्मेंद्रियें ह्मणतात. व मन अशीं अकरा इंद्रियें होत.

पांच तन्मात्रापासून पांच भूतें उत्पन्न होतात, शब्दापासून आकाश, स्पर्शापासून वायु, रूपापासून तेज, रसापासून पाणी, व गंधापासून पृथ्वी. प्रकृतिपासून चोवीस तत्वें उत्पन्न होतात आणि आत्मा एक स्वतंत्र तत्व आहे. सर्व तत्वें २५ होतात.

प्रकृति तत्वाचेच बुद्धि, अहंकार, तन्मात्रा वगैरे विकार आहेत असें सांख्यांचें ह्मणणें अयुक्त आहे. कारण त्यांनीं स्वतः प्रकृतिला नित्य मानलें आहे. जो पदार्थ नित्य आहे त्याच्यांत विकार कसा होणार ? व तो न झाल्यामुळें त्याचे भेदप्रभेद कसे होतील ? प्रकृति तत्वापासून त्याचे विकार उत्पन्न झाले असें जरी क्षणभर मानलें तरी ते विकार त्या प्रकृतिचें स्वरूप मानलें तर प्रकृति कारण व विकार तिचीं कार्यें असें ह्मणतां येणार नाहीं जेथें वेगळेपणा बिलकुल दिसत नाहीं तेथें कार्यकारणपणा संभवत नाहीं. जें ज्याच्यापासून बिलकुल वेगळें असत नाहीं तें त्याचें कार्य किंवा कारण होऊं शकत नाहीं. यास्तव प्रकृतिला कथंचित् नित्यानित्यात्मक मानिलें पाहिजे. सांख्यांनीं प्रकृतिला ज्ञानवान् मानिलें आहे व आत्मा ज्ञानी नाहीं असें ते ह्मणतात. जर प्रकृतिच ज्ञानयुक्त मानली तर आत्मतत्वाची जरूरतच उरली नाहीं. जें अचेतन असतें त्यामध्यें केव्हांही ज्ञान आढळून येत नसतें. प्रकृति अचेतन आहे यास्तव ती ज्ञानी आहे असें ह्मणणें अगदीं अयोग्य आहे. चैतन्य हें आत्म्याचें स्वरूप आहे असें मानूनहि सांख्य त्यास अज्ञानी ठरवितात हें फार विचित्र आहे. प्रकृतिच ज्ञानी आहे व तीच मोक्षमार्गाचा उपदेश देतें असें जर असेल तर मोक्षही तिलाच झाला मग आत्म कल्पना व्यर्थ सांख्य आत्म्याला शुद्ध मानतात. जसें कमळाचें पान पाण्यांत राहून हि तें पाण्यापासून अलग राहतें. तसा आत्माहि निरुपलेप आहे. त्याला

बंध व मोक्ष नाहीं. बंध व मोक्ष यांचा संबंध प्रकृतीसच आहे. प्रकृति ही आत्म्याला शब्दादि विषयांचें ज्ञान करून देते व स्वतः मी तुझ्यापासून भिन्न आहे असें भेदज्ञानहि करून देते. जेव्हां मी प्रकृति-पासून भिन्न आहे असें आत्म्याला ज्ञान होतें तेव्हां ती प्रकृति त्याच्या-जवळ जात नाहीं; हें ह्मणणेंहि वरच्या प्रमाणेंच अयोग्य आहे. कारण ती स्वतः अचेतन आहे. व आपलें खरें स्वरूप आत्म्याला समजलें. आतां आपण आत्म्याजवळ राहूं नये हें तिला समजणार कसें? आत्मा जर स्वतः मुळापासूनच शुद्ध आहे तर तो कधींहि प्रकृतिशीं बांधला जाणार नाहीं. आत्म्यालाहि सांख्यांनीं नित्य मानलें आहे. यामुळें जर तो प्रकृतिशीं बद्ध झाला असेल तर तो सर्वदा बद्ध मानणेंच योग्य आहे व तसा नसेल अर्थात अबद्ध नसेल तर तो कधींहि बद्ध होणार नाहीं असें मानणेंच योग्य आहे. तसें न मानलें तर त्याची नित्यता राहणार नाहीं. वास्तव त्याला कथंचित् नित्यानित्य मानून जैनांनीं वर्णिलेली बंधमोक्षप्रक्रिया मानावी ह्मणजे कोणताहि दोष दिसत नाहीं. आत्मा बंधहीन आहे, तो ज्ञानी नाहीं, त्याला जन्मपरंपरा नाहीं असें वर्णन करून त्याला मोक्ष होतो असेंहि पुनः ह्मणणारा सांख्य धूर्त आहे वास्तव तो विद्वानांच्या आदराला कितपत पात्र होईल याचा विचार करण्याचें काम आह्मी वाचक वृंदावरच सोंपवितों.

ब्रह्माद्वैताचा आचार्य विचार करितात.

प्रतिभासे प्रतिभासतार्थविषया दृश्यं प्रपंचे सति ।
प्रतिबिंबादि तथा सदेव न हि निःपर्यायवस्तुस्थितिः
ननु कस्यादिगतिं रुणद्धि भुवने सिद्धां क्रियाकारक-
प्रकृतिव्युज्झितसाध्यसाधनगतिर्ब्रह्मा कथं भासत ॥२३॥

अर्थ—जगांतील सर्व पदार्थ ब्रह्मामध्येंच अन्तर्भूत होतात. गांव, बगीचा, घागर, कपडा वगैरे पदार्थ ब्रह्माचेच पर्याय आहेत



ब्रह्माशिवाय जगांत दुसरें कांहींच नाहीं. जसें एकाच मातीचे घागर, परळ, रांजण वगैरे पदार्थ आपणास आढळून येतात कारण त्या सर्व पदार्थांमध्यें मातीचा संबंध आहे. माती त्या सर्व पदार्थांना कारण आहे व ते सर्व पदार्थ मातीचीं कार्यें आहेत. याप्रमाणें हें जग एका कारणानें बनलें आहे व तें कारण ह्मणजे ब्रह्म होय. जसें कोळी नांवाचा प्राणी जाळें उत्पन्न करण्याला कारण आहे. चन्द्रकांत मणि जसा पाण्याचें कारण आहे. वडाच्या झाडाच्या मुळ्यांना जसें वडाचें झाड कारण आहे तसें सर्व पदार्थांना ब्रह्म कारण आहे.

ब्रह्म हें अदृश्य आहे, याचा विस्तार झाला ह्मणजे हें दृश्य होतें परंतु हें वेदांत्यांचें ह्मणणें अयोग्य आहे.

ब्रह्म ह्मणजे सामान्य व सामान्य हें केव्हांहि विशेषास धरून असतें केवळ सामान्य हें केव्हांहि दिसून येत नाहीं. जसें सशाचें शिंग हें केव्हांहि कोणाच्या दृष्टीस पडत नाहीं तद्वत् केवळ सामान्य हें असूं शकत नाहीं. जसें गाय ही काळी, पांढरी, तांबडी वगैरे रंगाची किंवा विशिष्ट आकाराची असते. जिला आकारहि नाहीं व कोणताहि रंग नाहीं अशी गाय कोठेंहि आढळत नाहीं तसें सामान्य हें कोणत्याहि स्थितींत कां असेना कांहीं तरी त्याच्यामध्यें विशेषता आढळून आलीच पाहिजे. विशेषता व सामान्य यांचा अविनाभाव संबंध आहे. हे एकमेकांना सोडून राहत नाहींत. सर्वथा ब्रह्म जर एकच मानिलें तर पर्यायांचा त्यांच्याशीं कोणता संबंध मानावा? कार्य कारण संबंध मानिला तर ब्रह्म अद्वैत आहे हें ह्मणणें योग्य दिसत नाहीं.

सर्व पदार्थ ब्रह्माचे पर्याय आहेत व ब्रह्म हें त्याचें कारण आहे या ह्मणण्यानेंच कारणकार्य भाव सिद्ध होतो. सर्वथा अद्वैत मानल्यानें कारक व्यवहार होणार नाहीं. जेथें अभेदच आहे तेथें प्रथमा द्वितीयादि विभक्तींची कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान वगैरे कारकप्रवृत्ति होणार नाहीं. ब्रह्म तेवढें सत्य व त्याचें पर्याय असत्य असें ह्मणणें

योग्य नाहीं कारण जें द्रव्य असतें तें हमेशा कांहीं तरी पर्यायानें सहित असतें. पर्यायरहित द्रव्य असत नाहीं. याचप्रमाणें ब्रह्म हमेशा पर्यायांनीं युक्त असतें व पर्यायांना सत्य मानलेंच पाहिजे.

ब्रह्म सिद्ध करण्याकरितां साधन कांहीं तरी मानलें पाहिजे व साधन मानिलें कीं, ब्रह्माला साध्य मानावें लागेल. आणि असें झालें ह्मणजे ब्रह्माद्वैत सिद्धि न होतां ब्रह्मद्वैत सिद्ध होईल. यावरून क्रियाकारकप्रवृत्तिरहित, साध्य साधनपणानें रहित असें ब्रह्म सिद्ध होत नाहीं हें ठरतें.

केवळ प्रत्यक्षच प्रमाण आहे. व सर्व तत्वें हीं उपप्लुत आहेत
अर्थात् कोणतेंहि तत्व सिद्ध होत नाहीं व सर्व तत्व
वर्णन करण्याला अयोग्य आहे असें ह्मण-
णाऱ्यांचें आचार्य खंडन करितात.

यदेकं वाध्यक्षे मितिरिति च निर्वाच्यमखिलम् ।
तथा तत्वं चोपप्लुतमिति विचारं न सहते ॥
प्रमाणादन्यस्मात्प्रथितवचनाद् युक्तिभजनात् ।
विना नैतात्सिद्धिर्विधिनियमयोरर्थनियतेः ॥२४॥

अर्थः—केवळ प्रत्यक्ष ज्ञानच प्रमाण मानावें; अनुमान, स्मृति, प्रत्यभिज्ञान वगैरे ज्ञानाला प्रमाण मानूं नये. सर्व तत्व अवक्तव्य आहे अर्थात् शब्दांनीं त्याचें वर्णन करितां येत नाहीं. व सर्व तत्वें व प्रत्यक्ष अनुमान वगैरे प्रमाण ज्ञानें हीं उपप्लुत आहेत अर्थात् कोणत्याहि तत्वाची व प्रमाणाची सिद्धि होत नाहीं इत्यादि ह्मणणें हें वास्तविक विचार करूं लागलें असतां युक्ति शून्य भासू लागतें. प्रत्यक्ष ज्ञान प्रमाण आहे तें खरें आहे सिद्ध करण्यासाठीं अनुमानं वगैरे ज्ञानाची जरूरत लागतें त्याशिवाय जेंमळा प्रत्यक्ष ज्ञान झालें तें खरें आहे किंवा



नाहीं याचा निर्णय होऊ शकत नाहीं. सर्व तत्व अवक्तव्य आहे असें म्हणणें म्हणजेच तें वक्तव्य आहे. अर्थात् अवक्तव्य या शब्दानें जर त्याचें वर्णन करितां येतें तर तें शब्दानें वक्तव्य नाहीं असें म्हणणें कसें शोभेल. कोणतेंहि तत्व व प्रमाण सिद्ध होत नाहीं असें म्हणण्यानेंच तत्व असिद्ध ठरत नाहीं. तें असिद्ध ठरविण्यासाठीं कांहीं तरी प्रमाण ज्ञानाचा स्वीकार केला पाहिजे व जर प्रमाणांचा स्वीकार केला तर तीं प्रमाणें ज्यांना विषय करितात अर्थात त्या प्रमाणापासून जे पदार्थ सिद्ध होतात तेहि निमुटपणें कबूल करावे लागणारच. अस्तित्व व नास्तित्व धर्म पदार्थाच्या स्वाधीन आहेत व या धर्मांची सिद्धि करण्यासाठीं प्रत्यक्षादि प्रमाणांची जरूरत लागते.

अनेकांताची अनेक प्रकारानें सिद्धि होते हें आचार्य दाखवितात-

भावो भावादभावः समयनियमतः सद्विवर्तादसद्वा ।
ग्राह्योक्तेर्द्वैतमुद्यद्गुणगुणिविवृतेरोघतो द्वैतबुद्धिः ॥
नित्यं पूर्वापरान्तात्क्षणिकमनुवृतेरैक्यमन्यत्ववृत्तेः ।
नानात्वं वृत्तिदोषान्न भवति भगवन्स्यादनेकान्तसिद्धिः ॥२५॥

अर्थः—जो पदार्थ पूर्वीं होता त्याचाच उत्तरक्षणीं नाश झालेला आपल्याला आढळून येतो. यावरून पदार्थामध्यें अनेक धर्म आढळून येतात असें सिद्ध होतें. आणि असे अनेक धर्म पदार्थांत राहून ते अनेकान्ताची सिद्धि करीत असतात. सत् पासून असत्‌ची उत्पत्ति होते अर्थात् जें पूर्वीं नव्हतें तें उत्पन्न होतें [ सत्पासून सर्वथा असत्‌ची उत्पत्ती होतें असें मात्र समजू नये. ] या पासूनहि अनेकान्त सिद्ध होतो. अभिन्न अशा एका पदार्थामध्येंहि पक्ष, हेतु वगैरेची सिद्धि होते व यायोगें हि अनेकांत पदार्थांत दिसून येतो. गुणि व गुणांचा समूह या कल्पनेनें द्वैत बुद्धि पदार्थांत उत्पन्न होते. पुढच्या व मागच्या पर्यायाच्या अपेक्षेनें पदार्थाला कथंचित्-

त्य व क्षणिक असें म्हणतात. या दोन पर्यायामध्यें पदार्थ हा गोव-ल्या प्रमाणें दिसतो यामुळें या दोन पर्यायामध्यें एकपणाहि आढळतो. या दोन पर्यायांचें स्वरूप भिन्न आहे या दृष्टीनें पाहिल्यास अनेकपणा हि पदार्थांमध्यें दिसेल. तात्पर्य पदार्थाकडे द्रव्य दृष्टीनें पाहिल्यास अभेद दिसतो व पर्याय दृष्टीनें पाहिल्यानें भेद नजरेला येतो. यावरून अनेकांताची सिद्धि होते. पदार्थामध्यें जो अनेकपणा आहे तो पर्याय दृष्टिनेंच आहे व तोहि कथंचित् आहे सर्वथा नाहीं. इतर नैयायिक वगैरे गुण गुणि हे सर्वथा भिन्न मानतात असा भिन्नपणा मात्र जैनांनीं मानलेला नाहीं हें लक्षांत ठेवावें. या सर्व उदाहरणांनीं अनेकांत कसा सिद्ध होतो हें लक्षांत येते.

अंत शब्दाचा अर्थ धर्म अथवा गुण अथवा शक्ति असा होतो. प्रत्येक पदार्थांतील शक्ति अनंत असतात. पण अनेकांत या शब्दामध्यें अनेक या शब्दाचा अर्थ इतर सापेक्षता असा होतो. अर्थात् कोणतेंहि विशेषण लावून एकाद विषयाचें वर्णन केलें तरी त्याहून दुसऱ्या तऱ्हेचें विशेषण देखील तेथेंच व त्याचवेळीं असतें हें विसरता कामा नये. ह्यासाठींच प्रत्येक वर्णनामध्यें अनेकांत शैलीचें अधिक महत्त्व आहे. जिनेश्वराची वाणी याच हेतुने इतरांच्या वाणीहून दिव्य मानिली आहे.

अनेकांत ह्मणजे पदार्थांतील अनेक धर्मांचें परस्पराशीं विरोध न येऊं देता वर्णन करणें अथवा तसें समजणें या अनेकांत शैलीचे इतर ग्रंथात फार महत्व सांगितलें आहे. या अनेकांतरूप वर्णनाचें अथवा समजण्याचे दोन भेद केले आहेत; एक प्रमाण, दुसरा नय या प्रमाण नयानें एकाच वस्तूला सत्रूपहि ठरवितात व असत्रूपहि ठरवितात तें असें—

स्वरूपचतुष्टयाच्या अपेक्षेनें जड चेतनरूप पदार्थांचें जें अस्तित्व असतें तें हमेशा पररूपचतुष्टयाच्या अपेक्षेनें ना-



स्तित्व धर्माशीं कथंचित्तादात्म्य संबंधानें जोडलेलें असतें. यास्तव नास्तित्वानें जोडलेल्या अस्तित्वास प्रमाण ह्मणतात. प्रमाण नास्तित्व व अस्तित्व या उभयतांस जाणतें.

पदार्थांतील सर्व धर्मांचें वर्णन प्रमाणज्ञान करतें; कारण 'सकलादेशः प्रमाणाधीनः' असें ह्मटलें आहे. अस्तित्व व नास्तित्व या दोहोंपैकीं कोणतें तरी मुख्य व गौण होतें त्यास नय असें ह्मणतात.

वस्तूमध्यें अस्तित्व व नास्तित्व हे दोन धर्म आहेत त्यापैकीं एक धर्म मुख्य व दुसरा गौण असतो असें समजू नये. तसें असतें तर जो धर्म मुख्य मानला जातो तो हमेशाच तसाच मानला जाईल व गौण धर्म हमेशा गौणच मानला जाईल. परंतु असें मानलें नाहीं. धर्मामध्यें अमुक गौण व अमुक मुख्य अशी जी कल्पना होते ती वक्त्याच्या अभिप्रायानें असतें. वक्ता ज्या धर्माचें वर्णन करतो त्यास मुख्यता प्राप्त होते व इतर धर्म गौण होतात. परंतु गौण धर्म मुख्य धर्माचें नियमन करण्यास कारण आहे. याप्रमाणें हें नयाचें स्वरूप समजावें. हें नय घटादि दृष्टांताचें समर्थन करीत असतात.

श्री पार्श्वनाथ जिनेश्वराच्या सर्वोत्कृष्ट वाणीचें ग्रंथकार वर्णन करितात.

एषोच्चैर्वा तव शिवपदावाप्तिनिःश्रेणिभूता।
धीमद्ध्येया जयति जनतानंदसंदानधीरा ॥
अस्माद्वातृप्रभृतिवचनाकर्णनाज्जातकम्पा।
शेषप्राणिप्रणयनविधौ जायते या शरण्या ॥२६॥

अर्थ—हे पार्श्वनाथ जिनेश ! आपली ही दिव्य वाणी मोक्ष स्थान प्राप्त करून देण्यास शिडीप्रमाणें भव्य लोकांना

वाटते. विद्वानांकडून आपल्या हृदयांत नेहमीं चिंतिली गेलेली व जगांतील भव्य लोकांना आनंद देण्यांत समर्थ असलेली ही वाणी सदा जयवंत राहो. ब्रह्मदेव, विष्णु, शंकर इत्यादिकांच्या उपदेशानें जीव अधोगतिला चालले आहेत हें पाहून जिला दया उत्पन्न झाली व शरण आलेल्या प्राण्यांचा पुढारीपणा जिनें स्वीकारला आहे अशी ही आपली दिव्यवाणी सदा जयवंत राहो. या दिव्य वाणीमध्यें दिव्यता कां येतें? याचें उत्तर असें आहे कीं दिव्यतेला कारण अनेकांत होय.

विदधदतिशयममितमतिमुनिनाथमान्यमनन्यभाङ् ।
नामितसुरविभुवनपरगुरुर्तीर्थकृत्वसनामयत् ॥
उदयपथगततदनुविसृतिरशेषतत्वविभासिनी ।
जयति जिन जिन विजितमनसिज भारती तव भासुरा॥२७॥

अर्थः—जगामध्यें फार मोठें माहात्म्य वाढविणारा विशाळ बुद्धि ज्यांची आहे अशा गणधरादि देवाकडून आदरणीय, व दुसऱ्यांना शरण न जाणारे असे देव व सूर्य ज्याला नमस्कार करितात व सर्व जगाचा जो गुरु आहे असा तो तीर्थंकरपणा सदा जयवंत होवो. आत्मोन्नतीच्या मार्गाला पोहोचलेल्या हे जिना! मदनाचा पराभव करणाऱ्या हे जिनेश्वरा! त्या तीर्थंकरत्व कर्माच्या उदयानें जगामध्यें जिचा विस्तार वाढला आहे व जी सर्व तत्वांचें निर्दोष स्वरूप विशेष रीतीनें भव्यांना दाखऊन देते अशी तुझी सदा प्रकाशमान असलेली वाणी सदा जयवंत असो. तात्पर्य—पार्श्वनाथ तीर्थंकरांच्या दिव्य वाणीनें जगावर फार मोठे उपकार करून ठेविले आहेत. या दिव्यवाणीनें आत्म्याचें व इतर पदार्थांचें खरें स्वरूप प्रगट करून संसारदुःखापासून भव्यांचा उद्धार केला. यास्तव ही वाणी



विजयी होवो. या वाणीच्या उत्पत्तीला तीर्थंकर नामकर्म कारण आहे म्हणून तेंहि हमेशा विजयी होवो.

जय जय जगतीनतश्रीपद श्रीपुरीनिलय ।
नियतभास्यतारुण्यकारुण्यपुण्याकर ॥
परमपुरुष पार्श्वनाथाधिनाथासनाथाहंसा
विनतवर दमाभिरक्षाजरक्षाघरक्षाक्षय ॥२८॥

अर्थः—सर्व जग ज्याच्या शोभिवंत पायांना नमस्कार करितें व श्रीपुर येथें ज्याचें निवास स्थान आहे अशा किंवा मोक्ष ज्याचें निवासस्थान आहे अशा हे परमपुरुषा पार्श्वनाथ जिना! आपला नेहमीं विजय असो. नेहमीं प्रकाशणारी अशी पूर्ण दया व पुण्य यांचा सांठा स्वतः जवळ बाळगणाऱ्या व निष्पाप अशा हे पार्श्वनाथ जिनपते! आपला नेहमीं विजय होवो. आपल्या चरणकमलीं नम्र झालेल्या प्राण्यांना इच्छित पदार्थ पुरविणाऱ्या हे जिनश्रेष्ठा! आपण माझें संरक्षण करा. आपल्याला पुनर्जन्म नाहीं यास्तव वारंवार जन्मण्यापासून माझें आपण संरक्षण करा. आपण अविनाशी आहात. अर्थात् आपण अविनाशी असें मोक्षस्थान प्राप्त करून घेतलें आहे. यास्तव मलाहि आपण मृत्युच्या मुखांतून सोडवा.

शरण्यं नाथार्हन्भव भव भवारण्यविगति—
च्युतानामस्माकं निरवकरकारुण्यनिलय ॥
यतोऽगण्यात्पुण्याच्चिरतरमपेक्ष्यं तव पदम् ।
परिप्राप्ता भक्त्या वयमचललक्ष्मीगृहमिदम् ॥ २९ ॥

अर्थः—हे जिनेश्वरा आपले पाय मोक्षरूपी लक्ष्मीचें घर होत. आपल्या पायांचें दर्शन होण्याला अगणित पुण्य पाहिजे.

थोडकेसें पुण्य ज्याचें आहे अशा लोकांना आपल्या पायाचें दर्शन होणें कठिन आहे. आह्मी आपल्या पायाकडे भक्तीनें धाव मारली आहे. हे जिनेश पार्श्वनाथ ! या संसाररूपी जंगलांतून कसें पार पडावें हें आह्मांस माहीत नाहीं–आह्मी या जंगलामध्यें खरा रस्ता कोणता हें विसरलों आहोत. व आपण दयेचें माहेरघर आहांत. आपण सर्व प्राण्यावर निरपेक्ष होऊन दया करिता. यास्तव, आह्मी आपणास शरण झालों आहों. आपण खरा मार्ग दाखऊन या संसाररूपी जंगलांतून आमची सुटका करा.

ग्रंथकाराचें शेवटचें वक्तव्य.

एभिः श्रीपुरपार्श्वनाथविलसन्माहात्म्यपुण्यत्सुधाऽ-
कूपारो हि निदर्शितः प्रविसरद्वाङ्मार्गचातुर्यतः ॥
तस्मात्स्तोत्रमिदं सुरत्नमिव यद्यत्नाद् गृहीतं मया।
विद्यानंदमहोदयाय नियतं धीमद्भिरासेव्यताम् ॥३०॥

अर्थः—माझ्या मुखांतून निघत असलेल्या वचनरूपी मार्गाच्या चातुर्यानें वर सांगितलेल्या तीस श्लोकांच्याद्वारें मी श्रीपुरपार्श्वनाथांचा शोभणारा माहात्म्यरूपी अमृतसमुद्र दाखविला आहे. या अमृतसमुद्रांतून उत्तम रत्नाप्रमाणें असलेलें हें स्तोत्र मी मोठ्या प्रयत्नानें 'विद्यानंदमहोदय' या नांवाचा ग्रंथ बनविण्याकरितां काढून घेतलें आहे. या स्तोत्राचें पठन पाठन विद्वान् लोकांनीं करावें ह्मणजे त्यांना विद्या व आनंद यांची उन्नति करून घेता येईल. अर्थात् या स्तोत्राच्याद्वारें त्यांना पूर्ण ज्ञान व पूर्ण सुख मिळेल.

तात्पर्य–आपल्याला समुद्राकडे जाण्याचा मार्ग माहीत असला ह्मणजे आपण तेथें जाऊन रत्न प्राप्त करून घेतो. तें रत्न



मिळाल्यानें आपणास आनंद उत्पन्न होतो व आपण श्रीमंत बनतो. तद्वत् या स्तोत्राच्या द्वारें विद्वानांच्या बुद्धिची वाढ होते व अपूर्व आनंद उत्पन्न होतो; यास्तव याचें विद्वानांनीं अवश्य अध्ययन करावें असें ग्रंथकार सांगतात.

इति श्रीमदमरकीर्तियतीश्वरप्रियशिष्यश्रीमद्विद्यानंदस्वामिविरचितश्रीपुरपार्श्वनाथस्तोत्रं समाप्तम् ॥

श्रीमान् अमरकीर्तिमुनीश्वरांचें प्रियशिष्य श्रीमान् विद्यानंद स्वामी यांनीं रचिलेलें हें श्रीपुरपार्श्वनाथस्तोत्र समाप्त झालें.

**शुभं भवतु ।**